स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

स्थापना १९३७

# महाराष्ट्र लोकसेवा आयोग

स्वसुख निरभिलाषः
खिद्यसे लोकहेतोः

स्थापना १९३७

# महाराष्ट्र लोकसेवा आयोग

स्वसुख निरभिलाषः
खिद्यसे लोकहेतोः

**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**
*स्वसुख निरभिलाषः खिद्यसे लोकहेतोः*

**संकल्पना, समन्वय, योगदान आणि मार्गदर्शन**
**श्री. किशोर दत्तात्रय राजे-निंबाळकर,** भा.प्र.से.
अध्यक्ष
महाराष्ट्र लोकसेवा आयोग

**डॉ. देवानंद बाबुराव शिंदे**
सदस्य
महाराष्ट्र लोकसेवा आयोग

**डॉ. अभय एकनाथ वाघ**
सदस्य
महाराष्ट्र लोकसेवा आयोग

**डॉ. सतीश माधवराव देशपांडे**
सदस्य
महाराष्ट्र लोकसेवा आयोग

**डॉ. दिलीप ज्ञानेश्वर पांढरपट्टे,** भा.प्र.से.
सदस्य
महाराष्ट्र लोकसेवा आयोग

**संकलन समिती**
**डॉ. देवानंद शिंदे**
सदस्य, महाराष्ट्र लोकसेवा आयोग
- समिती अध्यक्ष

**श्रीम. स्वाती म्हसे पाटील,** भा.प्र.से.
- समिती सदस्य

**डॉ. सुवर्णा खरात**
सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग
- समिती सदस्य

**श्री. हेमराज बागुल**
संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
- सदस्य

**श्री. अजय अंबेकर**
निवृत्त संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
- सदस्य

**श्री. डॉ. दिलीप बलसेकर**
कार्यकारी संचालक व सचिव, दर्शनिका विभाग
- सदस्य

**श्री. चंद्रशेखर पवार**
उपसचिव -सदस्य

**श्रीम. सुखदा अमृते**
सदस्य

**श्रीम. लीना भोसले**
सदस्य

**श्रीम. शरयू गुरव**
सदस्य

**विशेष साहाय्य**
**श्री. सुनील अवताडे**
**श्री. शैलेश हिंदळेकर**

**संकलन साहाय्य**
**१. श्रीम. दीपिका गांवकर**
**२. श्रीम. सायली वाळे**
**३. श्री. मनोज पाटील**
**४. श्री. महेंद्र आढाव**

**प्रकाशक**
सचिव
महाराष्ट्र लोकसेवा आयोग
त्रिशुल गोल्ड फिल्ड, प्लॉट क्र. ३४,
सेक्टर ११, सीबीडी बेलापूर,
नवी मुंबई ४००६१४

**निर्मिती साहाय्य**
**महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचा**
**अधिकारी व कर्मचारी वृंद**

**रचना व मुद्रण**
मीडिया आर अँड डी (इं) प्रा. लि.
मुंबई ४०००६७


**प्रथम आवृत्ती : २०२३**

© **महाराष्ट्र शासन**
**सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग**


**सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई यांच्या लेखी पूर्वपरवानगीशिवाय या पुस्तकाचा कोणताही भाग कोणत्याही संस्था/व्यक्ती यांजकडून कोणत्याही स्वरूपात उद्धृत/प्रकाशित केला जाणार नाही.**

**अंतर्गत वितरणार्थ**











सत्यमेव जयते

**राज्यपाल**
महाराष्ट्र राज्य
राज भवन,
मुंबई ४०००३५

## शुभेच्छा

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या स्थापनेला ८६ वर्षे पूर्ण झाल्याचे औचित्य साधून आयोगाच्या समग्र कामगिरीची माहिती देणाऱ्या कॉफी टेबल पुस्तकाचे प्रकाशन केले जाणार असल्याचे समजून आनंद वाटला.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने आपल्या पारदर्शक व गुणवत्तापूर्ण कार्याच्या माध्यमातून राज्याला उत्कृष्ट अधिकारी व कर्मचारी उपलब्ध करून देत राज्याच्या तसेच देशाच्या विकासात मोठे योगदान दिले आहे. आगामी काळात देखील आयोग राज्यासाठी उत्तम अधिकारी व कर्मचारी यांची निवड करून राज्याला प्रगतीच्या शिखरावर नेण्यामध्ये महत्त्वपूर्ण योगदान देत राहील, असा मला विश्वास वाटतो.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या ८६ वर्षपूर्तीनिमित्त मी आयोगाचे हार्दिक अभिनंदन करतो तसेच यानिमित्त प्रसिद्ध करण्यात येत असलेल्या कॉफी टेबल पुस्तकाला माझ्या शुभेच्छा देतो.

(रमेश बैस)





सत्यमेव जयते

**मुख्यमंत्री**
महाराष्ट्र राज्य
मंत्रालय,
मुंबई ४०००३२

## शुभेच्छा

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या स्थापनेच्या ८६ व्या वर्षानिमित्त कॉफी टेबल बुक प्रकाशित करण्यात येत आहे, हे समजून आनंद झाला. महाराष्ट्राच्या प्रशासकीय क्षेत्रात मागील ८६ वर्षापासून आयोगाचा अत्यंत महत्त्वाचा वाटा राहिला आहे.

होतकरू, कल्पक, हुशार उमेदवारांची निवड करून प्रशासकीय कामकाज उत्तमरीत्या पार पाडण्याकरिता चांगले अधिकारी व कर्मचारी मिळवून देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य आयोगाकडून केले जात आहे. देशातील अधिकांश क्षेत्रात आपले महाराष्ट्र राज्य अग्रस्थानी आहे. या यशस्वी वाटचालीत आयोगामार्फत निवड झालेले आणि राज्य शासनासाठी काम करणारे अधिकारी व कर्मचारी यांचा मोलाचा वाटा आहे.

आयोगाने बदलत्या काळाच्या अनुषंगाने अद्ययावत अशा माहिती तंत्रज्ञानाचा वापर करून भरती प्रक्रियेमध्ये मोठ्या प्रमाणात पारदर्शकता आणली आहे, याचा राज्याच्या सर्वच भागातील होतकरू उमेदवारांना लाभ होत आहे. त्याचबरोबर प्रशासनाला दर्जेदार अधिकारी, कर्मचारी मिळण्यासाठी महत्त्वपूर्ण मदत होत आहे. महाराष्ट्र शासनाने नुकताच राज्यातील शासकीय कार्यालयांमधील ७५ हजार जागा भरण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. या भरतीमध्ये महाराष्ट्र लोकसेवा आयोग महत्त्वपूर्ण अशी भूमिका बजावत आहे.

महाराष्ट्राच्या जडणघडणीमध्ये यापुढील काळातही महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून योगदान मिळत राहील अशी अपेक्षा व्यक्त करतो. लोकसेवा आयोगाच्या स्थापनेच्या ८६ वर्षानिमित्त आयोजित सर्व उपक्रमांना तसेच कॉफी टेबल बुकच्या प्रकाशनासाठी आणि पुढील वाटचालीसाठीही मनःपूर्वक शुभेच्छा!

**(एकनाथ शिंदे)**


मंत्रालय



सत्यमेव जयते

**उप मुख्यमंत्री**
महाराष्ट्र राज्य
मंत्रालय,
मुंबई ४०००३२

## शुभेच्छा

महाराष्ट्राला दर्जेदार अधिकारी, कर्मचारी देणाऱ्या महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या वाटचालीचा आढावा घेणारे कॉफी टेबल बुक प्रकाशित होत आहे याचा मला मनस्वी आनंद आहे. या स्तुत्य उपक्रमाला माझ्या हार्दिक शुभेच्छा!


महाराष्ट्र लोकसेवा आयोग ही राज्यामध्ये नेहमीच एक व्हायब्रंट संस्था म्हणून गणली गेली आहे. आपल्या स्थापनेपासूनच संस्थेने आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. या यशस्वी वाटचालीसाठी मी आयोगाचे अभिनंदन करतो. तरुणांची स्वप्नपूर्ती करणारी, त्यांची आशा व प्रेरणास्थान असलेली एमपीएससी ही गावागावातील युवकांसाठी प्रशासनामध्ये दाखल होण्याचा राजमार्ग आहे. उत्तम दर्जा व गुणवत्तेला कायम प्राधान्य देणाऱ्या या संस्थेमुळे राज्याच्या प्रशासनात उत्तमोत्तम अधिकारी, कर्मचाऱ्यांची निवड होत आली आहे. त्यामुळे देशामध्ये उत्तम प्रशासनाच्या बाबतीतही आपले राज्य अव्वल राहिले आहे. याचे श्रेय राज्य लोकसेवा आयोगाला द्यावे लागेल.

महाराष्ट्राच्या जडणघडणीमध्ये महत्त्वपूर्ण योगदान राहिलेल्या या संस्थेने विश्वसनीयतेचा नवा आदर्श निर्माण केला आहे. एमपीएससीच्या माध्यमातून गुणवत्तेच्या आधारावर आपली निवड नक्की होईल, असा विश्वास एमपीएससीची परीक्षा देणाऱ्या उमेदवारांना असतो आणि हेच या आयोगाचे मोठे यश आहे. राज्य शासनाने स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त ७५ हजार रिक्त पदे भरण्याचा कार्यक्रम हाती घेतला तो पूर्णत्वास नेण्यात एमपीएससीची महत्त्वपूर्ण भूमिका असणार आहे. उत्तम आणि दर्जेदार अधिकारी व कर्मचाऱ्यांची निवड करण्याची परंपरा आयोगाकडून यापुढेही अशीच सुरू राहील, याची खात्री आहे.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाला पुढील वाटचालीसाठी तसेच आयोगाच्या गौरवशाली परंपरेचा आढावा घेणाऱ्या कॉफी टेबल बुकसाठीही पुनश्च मन:पूर्वक शुभेच्छा!

**(देवेंद्र फडणवीस)**


मंत्रालय



सत्यमेव जयते

**उप मुख्यमंत्री**
महाराष्ट्र राज्य
मंत्रालय,
मुंबई ४०००३२

## शुभेच्छा

लोकसेवा आयोगाच्या स्थापनेपासून आतापर्यंतच्या प्रवासाची ८६ वर्षे आयोगाने नुकतीच पूर्ण केली असून त्यानिमित्ताने आयोगाच्या प्रदीर्घ वाटचालीच्या कामगिरीची समग्र, सचित्र माहिती देणारे कॉफी टेबल बुक प्रसिद्ध करण्यात येत असल्याचे समजून आनंद झाला.

राज्य शासनसेवेतील विविध संवर्गातील पदांवर नियुक्ती करण्याचे सांविधानिक कार्य आयोगाने आतापर्यंत यशस्वीपणे, पारदर्शकपणे पार पाडले आहे. आयोगाकडून विविध पदांकरिता घेण्यात येणाऱ्या परीक्षांना राज्यातील उमेदवारांकडून चांगला प्रतिसाद मिळत आहे. शासनाच्या निकडीनुसार उमेदवारांची स्पर्धा परीक्षा, सरळसेवा परीक्षा याद्वारे नियुक्ती केली जाते. या दोन्ही परीक्षा तसेच उमेदवारांच्या निवडीच्या प्रक्रिया आयोगाकडून सुरळीत, गोपनीय रीतीने पार पाडल्या जातात.

संगणकीकरण व माहिती तंत्रज्ञान यात झपाट्याने बदल होत असताना या तंत्रज्ञानाचा लाभ उमेदवारांपर्यंत पोहोचवण्यासाठी आयोग प्रयत्नशील आहे, ही बाब कौतुकास्पद आहे. आपल्या निष्ठापूर्ण कार्यातून आदराची प्रतिमा निर्माण करण्यात आयोगास यश मिळाले आहे. याकरिता मी आयोगाचे अभिनंदन करतो. आयोगाच्या कामगिरीचा, राज्याला, राज्यातील जनतेला अभिमान आहे. आयोगाच्या ८६ वर्षांच्या वाटचालीचा प्रवास कॉफी टेबल बुकच्या माध्यमातून सर्वांसमोर आणण्याच्या प्रयत्नांबद्दल आयोगाचे अभिनंदन.

राज्याच्या सर्वांगीण प्रगतीसाठी आणि विविध क्षेत्रात यशाचे शिखर गाठण्याकरिता कुशाग्र, प्रामाणिक, जनहिताची तळमळ असणाऱ्या उमेदवारांची आयोगाकडून प्रशासनात निवड व्हावी यासाठी तसेच कॉफी टेबल बुकच्या उपक्रमासाठी मनःपूर्वक शुभेच्छा.

**(अजित पवार)**

# अनुक्रमणिका

### मनोगत


श्री. किशोर दत्तात्रय राजे-निंबाळकर (अध्यक्ष).... १४
डॉ. देवानंद बाबुराव शिंदे (सदस्य)................. १५
डॉ. अभय एकनाथ वाघ (सदस्य).................. १६
डॉ. सतीश माधवराव देशपांडे (सदस्य) ............ १७
डॉ. दिलीप ज्ञानेश्वर पांढरपट्टे (सदस्य)............. १८
डॉ. सुवर्णा सिद्धार्थ खरात (सचिव) ............... १९


### लोकसेवा आयोगाची निर्मिती व इतिहास


भारतीय संघ लोकसेवा आयोग .................... २२
बॉम्बे-सिंध लोकसेवा आयोग ..................... २८
बॉम्बे लोकसेवा आयोग............................ ३०
महाराष्ट्र लोकसेवा आयोग.......................... ३२
स्वप्नपूर्तीच्या दिशेने वाटचाल ...................... ३८
संविधानातील तरतुदी.............................. ४२
आयोगाचे बोधचिन्ह ............................... ४३
''...एमपीएस्सी करतोय!'' ......................... ४४



### आयोगाचे ऐतिहासिक अभिलेख






अभिलेख १९३७-१९६२.......................... ४८
अभिलेख १९६२-१९७२.......................... ५१
अभिलेख १९७२-१९८७.......................... ५२
अभिलेख १९८७-१९९९.......................... ५४


### आयोगाचे अध्यक्ष व सदस्य


प्रथम ते आजतागायत अध्यक्ष...................... ६०
आयोगाचे सदस्य.................................. ६३





**आयोगाच्या वाटचालीतील महत्त्वाचे प्रशासकीय निर्णय व टप्पे** ......... ६६

**आयोगाची संरचना, कार्ये व संबंधित बाबी**

आयोगाची संरचना ................................ ७२

आयोगाचे विविध विभाग .......................... ७३

आयोगाची कार्ये.................................... ८०

आयोगाचे सांख्यिकी विवरण ...................... ८२

आयोगाची प्रकाशने ................................ ८५

**एकविसाव्या शतकाकडे वाटचाल**


पत्र/तार ते ट्विटर................................... ८८


टेक्नॉलॉजी तस्मै नमः .............................. ८९

आयोगाच्या परीक्षेचा (कोविड) काळ.............. ९०


**आयोगाच्या वाटचालीतील संस्मरणीय क्षण**................................ ९२

**मान्यवरांच्या भेटी व आयोगाचे विविध कार्यक्रम** .................. १०२





















सत्यमेव जयते

अध्यक्ष
महाराष्ट्र लोकसेवा आयोग



## मनोगत

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या स्थापनेस नुकतीच ८६ वर्षे पूर्ण झाली आहेत. आयोगाच्या वाटचालीमध्ये हा अत्यंत महत्त्वाचा टप्पा आहे. महाराष्ट्राच्या प्रशासकीय विकासामध्ये आयोगाने मोठे योगदान दिले आहे. बदलत्या काळानुसार आयोगाचे कामकाज अधिकाधिक डिजिटल करत आहोत. उमेदवारांच्या हिताच्या दृष्टीने वेळोवेळी वेगवेगळे निर्णय घेण्यात येत आहेत. परीक्षा पद्धतीमध्ये सुधारणा करताना नवीन तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येत आहे. यापुढील काळातही नव्या तंत्रज्ञानाचा वापर करत परीक्षा पद्धती अधिकाधिक सुलभ करणे, पारदर्शकता वाढविणे यावर आयोगामार्फत भर देण्यात येत आहे. आता आयोगाच्या ८६ वर्षपूर्तीच्या निमित्ताने या कालावधीत करण्यात आलेल्या विविध कामकाजासंदर्भात माहिती देणारे हे कॉफी टेबल बुक प्रकाशित करीत आहोत. आयोगाच्या वाटचालीतील सर्व महत्त्वाच्या टप्प्यांचा ऊहापोह यामध्ये करण्यात आला आहे. हे कॉफी टेबल बुक सर्वांसाठीच उपयुक्त ठरेल असा विश्वास आहे. यापुढील काळातही महाराष्ट्राच्या प्रशासकीय विकासामध्ये महाराष्ट्र लोकसेवा आयोग महत्त्वपूर्ण योगदान देत राहील, असा विश्वास या निमित्ताने व्यक्त करतो.

**(किशोर दत्तात्रय राजे-निंबाळकर)**

सत्यमेव जयते

सदस्य
महाराष्ट्र लोकसेवा आयोग



## मनोगत

भारताच्या संविधानातील अनुच्छेद ३१५ नुसार महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची निर्मिती झाली आहे. आयोगातर्फे प्रसिद्ध झालेले ऐतिहासिक अभिलेख, दरवर्षी प्रसिद्ध होणारे आयोगाचे वार्षिक अहवाल, आयोगाचे संकेतस्थळ, ट्विटर यातून आयोगासंबंधीची माहिती उपलब्ध आहे. तथापि, ती सलगरीत्या उपलब्ध व्हावी यासाठी या कॉफी टेबल बुकची निर्मिती करण्यात आली आहे. आयोगाच्या स्थापनेपासून आजतागायत आयोगाची वाटचाल, उमेदवारांच्या हिताच्या दृष्टीने आयोगाने वेळोवेळी घेतलेले निर्णय, परीक्षा पद्धतीमध्ये वेळोवेळी झालेल्या सुधारणा, नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून परीक्षापूर्व तसेच परीक्षोत्तर पद्धतीमध्ये केलेले बदल, कोविडसारख्या कठीण काळात आयोगाने आयोजित केलेल्या परीक्षा/ मुलाखती/ पोलीस उपनिरीक्षक पदासाठीच्या शारीरिक चाचण्या, नवीन तंत्रज्ञानाची मदत घेऊन यापुढील वाटचाल इत्यादीचा ऊहापोह या कॉफी टेबल बुकमध्ये करण्यात आला आहे. आयोगामार्फत यापुढील काळातही महाराष्ट्राच्या प्रशासकीय क्षेत्रात भरीव योगदान दिले जाईल. आयोगाच्या ८६ वर्षपूर्तीनिमित्त आयोगाचे माननीय अध्यक्ष, माननीय सदस्य, इतर अधिकारी व कर्मचारी या सर्वांचे अभिनंदन आणि पुढील वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा!

(डॉ. देवानंद बाबुराव शिंदे)



सत्यमेव जयते

सदस्य
महाराष्ट्र लोकसेवा आयोग

## मनोगत

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे नाव राज्यातील प्रमुख सांविधानिक संस्थांमध्ये अग्रक्रमाने घेतले जाते. आयोगाने नुकतेच ८७ व्या वर्षात पदार्पण केले असून ही गौरवपूर्ण व भूषणावह बाब आहे. आयोगाच्या स्थापनेपासूनच्या ८६ वर्षांच्या प्रदीर्घ व वैविध्यपूर्ण वाटचालीवर आधारित कॉफी टेबल बुक प्रसिद्ध होत आहे. आयोगाचे सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी आजतागायत आयोगाच्या जडणघडणीत अतिशय पारदर्शक, समर्पित व जबाबदारीपूर्ण भावनेने भरीव योगदान दिलेले आहे. सध्याच्या युगातील आव्हाने सक्षमपणे पेलण्यासाठी माहिती तंत्रज्ञानाचा सुयोग्य वापर करून वेळोवेळी विद्यार्थीभिमुख भूमिका घेऊन व आवश्यक ती कार्यप्रणाली राबवून समाजाच्या सेवेसाठी व प्रगतीसाठी उत्कृष्ट अधिकारी/प्रशासक व जागरुक नागरिक उपलब्ध करून देण्यामध्ये आयोगाने महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे व भविष्यातही देत राहील असा मला विश्वास आहे.

आजवरच्या ८६ वर्षांच्या प्रदीर्घ वाटचालीतील महत्त्वपूर्ण घटनांचा/प्रगतीचा या कॉफी टेबल पुस्तकामध्ये ऊहापोह असेल अशी माझी खात्री आहे. त्यामुळे या पुस्तकाच्या निर्मितीमध्ये सहभागी असणाऱ्या प्रत्येकाचे मी अभिनंदन करतो.

आयोगाच्या भविष्यकालीन कामगिरीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा!

**(डॉ. अभय एकनाथ वाघ)**



सत्यमेव जयते

सदस्य
महाराष्ट्र लोकसेवा आयोग

## मनोगत

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या स्थापनेस ८६ वर्ष पूर्ण झाल्याच्या निमित्ताने आयोगाच्या आजवरच्या वाटचालीवर आधारित कॉफी टेबल बुक प्रसिद्ध होत आहे, ही समाधानाची बाब आहे. यानिमित्ताने आयोगाशी संलग्न असलेल्या सर्वांचे अभिनंदन आणि शुभेच्छा. राज्याचा कारभार प्रभावीरित्या चालविण्यासाठी विविध पदांवर योग्य उमेदवारांची निवड करण्यासाठी आयोगाने अभूतपूर्व कामगिरी केली आहे. त्यांच्यामुळेच राज्याची वाटचाल सदैव प्रगतीच्या दिशेने होत आहे. राज्यामधील उमेदवारांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे, विविध समाजांचे उत्थान करणे आणि राज्यातल्या सुदूर भागांना जोडण्याच्या कामी आयोगाने महत्त्वपूर्ण कामगिरी पार पाडली आहे. त्यामुळे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या भविष्यकालीन वाटचालीस पुन्हा एकदा मनापासून शुभेच्छा!

Deshpande

**(डॉ. सतीश माधवराव देशपांडे)**

सत्यमेव जयते

**सदस्य**
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**



## मनोगत

महाराष्ट्र लोकसेवा आयोगास ८६ वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने 'कॉफी टेबल बुक' प्रसिद्ध होत आहे, ही समाधानाची बाब आहे. आयोगाच्या ८६ वर्षांच्या वाटचालीमध्ये घडून आलेल्या अनेक स्थित्यंतरांना या निमित्ताने उजाळा मिळणार आहे.

महाराष्ट्र राज्य हे देशातील अग्रगण्य व प्रगतीशील राज्य असून अशा राज्याच्या लोकसेवा आयोगासारख्या सांविधानिक संस्थेचा एक भाग असणे, हे माझ्यासाठी व कार्यालयातील सर्व अधिकारी/ कर्मचाऱ्यांसाठी अभिमानास्पद आहे. राज्याच्या विविध सेवांमध्ये सुयोग्य उमेदवारांची निवड करून राज्याचे प्रशासन बळकट करण्याचे अत्यंत महत्त्वाचे काम पारदर्शकरीत्या करणाऱ्या महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे यापुढील कामकाज देखील सतत आदर्शवत राहो, हीच शुभेच्छा!

**(डॉ. दिलीप ज्ञानेश्वर पांढरपट्टे)**

सत्यमेव जयते

**सचिव**
महाराष्ट्र लोकसेवा आयोग



## मनोगत

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या स्थापनेस नुकतीच ८६ वर्षे पूर्ण झाली आहेत. त्या पार्श्वभूमीवर आयोगाने आतापर्यंत केलेल्या ऐतिहासिक कामगिरीची माहिती देणारे हे कॉफीटेबल बुक प्रकाशित करीत असताना अत्यंत आनंद होत आहे.

महाराष्ट्राच्या प्रशासनामध्ये महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे अत्यंत महत्त्वपूर्ण असे योगदान राहिले आहे. आयोगाचे आतापर्यंतचे सन्माननीय अध्यक्ष, सदस्य यांच्यासह अधिकारी आणि कर्मचारी यांनी या वाटचालीत फार मोठे योगदान दिले आहे. या सर्व वाटचालीचा ऊहापोह या कॉफीटेबल बुकमध्ये करण्यात आला आहे. आयोगाचे आतापर्यंतचे महत्त्वाचे निर्णय, आयोगाच्या वाटचालीतील महत्त्वाच्या क्षणांची छायाचित्रे, आयोगाच्या कामकाजाचा आढावा, प्रशासकीय सुधारणा अशा विविध अंगांनी हे कॉफीटेबल बुक माहितीपूर्ण बनविण्यात आले आहे. हे कॉफीटेबल बुक सर्वांनाच आवडेल आणि उपयुक्त ठरेल, असा मला विश्वास वाटतो.

आयोगामार्फत यापुढील काळातही महाराष्ट्राच्या प्रशासकीय क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान दिले जाईल. भरतीप्रक्रिया अधिक गतिमान आणि अधिक पारदर्शक करण्यावर भर देण्यात येत आहे. यापुढील काळातही महाराष्ट्र शासनाला गुणवत्तापूर्ण अधिकारी मिळवून देण्यात आयोग महत्त्वाची कामगिरी बजावेल, असा विश्वास यानिमित्ताने व्यक्त करते. आयोगाच्या ८६ वर्षपूर्तीनिमित्त आयोगाचे सन्माननीय अध्यक्ष, सन्माननीय सदस्य, इतर अधिकारी व कर्मचारी या सर्वांचे अभिनंदन आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा...

**(डॉ. सुवर्णा सि. खरात)**



# लोकसेवा आयोगाची निर्मिती व इतिहास

# भारतीय संघ लोकसेवा आयोग



ईस्ट इंडिया कंपनीचे संचालक भारतात पाठवण्यात येणाऱ्या नागरी सेवकांसाठी शिफारस करत व त्यातून नियुक्ती केली जाई





पहिल्या महायुद्धानंतर परिस्थिती बदलली आणि मॉन्टेग्यू-चेम्सफोर्ड सुधारणांनंतर १९२२ पासून भारतीय नागरी सेवा परीक्षा भारतातही आयोजित केल्या जाऊ लागल्या



४ ऑक्टोबर १९२६ रोजी युनायटेड किंगडमच्या होम सिव्हिल सर्व्हिसचे सदस्य सर रॉस बार्कर हे भारतीय लोकसेवा आयोगाचे पहिले अध्यक्ष बनले

ईस्ट इंडिया कंपनीने भारतात जम बसवल्यावर तेथील कारभार पाहण्यासाठी नागरी सेवकांची आवश्यकता भासू लागली. ती पूर्ण करण्यासाठी कंपनीच्या संचालकांकडून उमेदवारांची शिफारस करण्यात येत असे. त्यातून नियुक्त झालेल्या उमेदवारांना लंडनमधील हेलीबरी कॉलेजमध्ये प्रशिक्षण देऊन भारतात पाठवण्यात येत असे. पुढे १८५७ च्या उठावानंतर भारताचा कारभार इंग्लंडच्या राणीच्या अधिकारात आला. भारतात पाठविण्यात येणाऱ्या नागरी सेवकांची निवड ब्रिटिश संसदेतर्फे करण्यात येऊ लागली. या निवड समितीला अधिक कार्यक्षम करण्यासाठी लॉर्ड मॅकॉले यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली. तिने दिलेल्या अहवालावर विचार होऊन सन १८५४ मध्ये भारतासाठी गुणवत्ता-आधारित आधुनिक नागरी सेवेची संकल्पना आकाराला आली. मेकॉले अहवालात भारतीय नागरी सेवकांच्या नियुक्तीसाठी ईस्ट इंडिया कंपनीच्या संचालकांनी केलेल्या शिफारशींपेक्षा स्पर्धात्मक परीक्षा घेण्याचा प्रस्ताव होता. त्यानुसार गुणवत्तेवर आधारित कायमस्वरूपी नागरी सेवा प्रणाली लागू करावी या हेतूने, सन १८५४ मध्ये लंडन येथे नागरी सेवा आयोगाची स्थापना करण्यात आली आणि १८५५ मध्ये स्पर्धा परीक्षा सुरू झाल्या.

सुरुवातीला भारतीय नागरी सेवेसाठीच्या परीक्षा फक्त लंडनमध्ये घेण्यात येत असत. त्यासाठी कमाल वय २३ आणि किमान वय १८ वर्षे अशी अट होती. अभ्यासक्रमाची रचना अशा प्रकारे करण्यात


भारतात नागरी सेवा पूर्ण केलेल्या ब्रिटिश अधिकाऱ्यांचे लंडनमधील वेस्टमिन्स्टर ॲबे येथील स्मारक




श्री. रवींद्रनाथ टागोरांचे थोरले बंधू श्री. सत्येंद्रनाथ टागोर हे नागरी सेवा परीक्षा उत्तीर्ण करणारे पहिले भारतीय



लोकसेवा आयोगाच्या संग्रहालयात जतन करण्यात आलेले विविध समित्यांचे अहवाल



आली होती की युरोपीय साहित्यासाठी जास्तीतजास्त गुण राखून ठेवले जावेत. यामुळे भारतीय उमेदवारांसाठी या परीक्षांमध्ये उत्तीर्ण होणे कठीण होत असे. तथापि, सन १८६४ मध्ये श्री. रवींद्रनाथ टागोरांचे थोरले बंधू श्री. सत्येंद्रनाथ टागोर हे नागरी सेवा परीक्षा उत्तीर्ण करणारे पहिले भारतीय ठरले. तीन वर्षांनंतर आणखी ४ भारतीयांनी या परीक्षेत यश संपादन केले. त्यानंतर या परीक्षा एकाच वेळी इंग्लंड व भारतातही घेतल्या जाव्यात असा आग्रह भारतीयांनी ब्रिटिश सरकारकडे धरला परंतु सुमारे ५० वर्षे ब्रिटिश सरकारने तो मान्य केला नाही. भारतीय नागरी सेवेत भारतीयांनी प्रवेश करावा अशी ब्रिटिश सरकारची इच्छा नव्हती.

परंतु पहिल्या महायुद्धानंतर परिस्थिती बदलली आणि मॉन्टेग्यू-चेम्सफोर्ड सुधारणांनंतर १९२२ पासून भारतीय नागरी सेवा परीक्षा भारतातही आयोजित केल्या जाऊ लागल्या. प्रथम अलाहाबादमध्ये आणि नंतर संघ लोकसेवा आयोगाच्या स्थापनेनंतर या परीक्षा दिल्लीत सुरू झाल्या. नागरी सेवा आयोगाद्वारे या परीक्षा लंडनमध्येही घेतल्या जात होत्या.

स्वातंत्र्यपूर्व भारतीय (रॉयल/ शाही) पोलिसांच्या उच्च पोलीस अधिकाऱ्यांची नियुक्ती राज्य सचिवांनी आयोजित केलेल्या स्पर्धा परीक्षेद्वारे केली जात होती. सेवेसाठी पहिली खुली स्पर्धा परीक्षा जून १८९३ मध्ये इंग्लंडमध्ये आयोजित करण्यात आली. त्यातून परिविक्षाधीन (प्रोबेशनरी) सहायक पोलीस अधीक्षक नियुक्त करण्यात येऊ लागले. पोलिसांमध्ये भारतीयांचा प्रवेश १९२० नंतर सुरू झाला आणि पुढच्या काळात सेवेसाठीच्या परीक्षा इंग्लंड आणि भारत या दोन्ही ठिकाणी घेतल्या जाऊ लागल्या. मात्र इस्लिंग्टन कमिशन आणि ली कमिशनच्या शिफारशींना डावलून पोलीस सेवेच्या भारतीयीकरणाचा वेग अतिशय मंद होता. १९३१ पर्यंत पोलीस अधीक्षकांच्या एकूण पदांपैकी केवळ २०% पदे भारतीयांकडे होती. तथापि, योग्य युरोपियन उमेदवारांच्या अनुपलब्धतेमुळे १९३९ पासून भारतीय पोलिसांमध्ये अधिक प्रमाणात भारतीयांची भरती केली जाऊ लागली.

वन सेवेच्या संदर्भात, ब्रिटिश भारतीय सरकारने १८६४ मध्ये शाही फॉरेस्ट डिपार्टमेंट सुरू केले व त्याच्या व्यवस्थापनासाठी १८६७ मध्ये शाही फॉरेस्ट सर्व्हिसची स्थापना करण्यात आली. १८६७ ते १८८५ पर्यंत शाही फॉरेस्ट सर्व्हिसमध्ये नियुक्त केलेल्या अधिकाऱ्यांना फ्रान्स आणि जर्मनीमध्ये प्रशिक्षण देण्यात आले. १९०५ पर्यंत त्यांना लंडनमधील कूपर्स हिल येथे प्रशिक्षण देण्यात आले. १९२० मध्ये शाही फॉरेस्ट सर्व्हिसमधील नियुक्ती इंग्लंड आणि भारतात थेट नियुक्तीद्वारे आणि भारतातील प्रांतीय सेवेतून पदोन्नतीद्वारे केली जाईल असा निर्णय घेण्यात आला. स्वातंत्र्यानंतर, भारतीय वन सेवेची स्थापना १९६६ मध्ये अखिल भारतीय सेवा कायदा १९५१ अंतर्गत करण्यात आली.

केंद्रीय नागरी सेवांच्या संदर्भात, ब्रिटिश राजवटीतील नागरी सेवांना त्यांचे स्वरूप, वेतनश्रेणी आणि नियुक्ती प्राधिकारावर आधारित कंत्राटी आणि गैर-कंत्राटी म्हणून वर्गीकृत करण्यात आले होते. १८८७ मध्ये, एचन्सन कमिशनने सेवांची पुनर्रचना नवीन पॅटर्नवर करण्याची शिफारस केली आणि सेवांना शाही, प्रांतीय आणि अधीनस्थ अशा तीन श्रेणींमध्ये विभागण्यात आले. शाही सेवांची भरती आणि नियंत्रणाचे अधिकार राज्य सचिवांकडे होते. सुरुवातीला या सेवांसाठी नियुक्त करण्यात आलेले बहुतांश अधिकारी ब्रिटिश होते. प्रांतीय सेवांसाठी प्रांतीय सरकारांकडून नियुक्ती आणि नियंत्रण केले जाई परंतु त्यासाठीचे नियम भारत सरकारच्या मान्यतेने तयार करण्यात आले होते. भारतीय कायदा १९१९ नुसार



**खुर्चीवर स्थानापन्न डावीकडून उजवीकडे**: १. श्री. फ्रँक अॅन्थनी, २. सेठ गोविंद दास, ३. दरभंगाचे महाराज, ४. श्री. खुर्शीद लाल, ५. श्री. एन. माधव राव, ६. श्रीम. रेणुका रे, ७. माननीय डॉ. जीवराज नारायण मेहता, ८. माननीय श्री. मोहनलाल सक्सेना, ९. श्री. के. एम. मुन्शी, १०. श्रीम. हंसा मेहता, ११. श्री. ओ
गाडगीळ, २१. माननीय श्री. एन. गोपालस्वामी अय्यंगार, २२. माननीय जयरणदास दौलतराम, २३. माननीय मौलाना अबुल कलाम आझाद, २४. माननीय डॉ. बाबासाहेब आंबेडकर, २५. माननीय श्री. एस. बलदेव सिंह, २६. माननीय डॉ. जॉन मथाई, २७. माननीय श्री. जी. व्ही. मावळणकर, २८. माननीय श्रीम. राजकुम
३७. माननीय श्री. बी. जी. खेर, ३८. श्री. अब्दुल हलीम गझनवी, ३९. माननीय पंडित रवीशंकर शुक्ला, ४०. माननीय श्री. गोपीनाथ बारडोलोई, ४१. श्री. टी. प्रकाशम, ४२. माननीय रेव्ह. जे. जे. एम. निकोलस रॉय, ४३. माननीय श्री. के. सी. निओगी, ४४. डॉ. बी. पट्टाभी सीतारामय्या, ४५. श्री. के. चेंगलराय रेड्डी, ४
५७. परलकीमेदीचे महाराज, ५८. श्री. बी. दास, ५९. श्री. जसपाल रॉय कपूर


**पहिल्या रांगेत**: १. माननीय श्री. के. बी. सहाय, २. श्री. श्यामनंदन साहाय, ३. श्री. तजमल हुसेन, ४. श्री. सारंगधर सिन्हा, ५. प्रो. एन. जी. रंगा, ६. डॉ. रघुनंदन प्रसाद, ७. काझी सय्यद करीमउद्दीन, ८. श्री. जाफर इमाम, ९. श्री. मोहम्मद ताहिर, १०. श्री. मोहम्मद हिफझुर रहमान, ११. श्री. लतिफुर रहमान, १२.
२३. श्री. ब्रजेश्वर प्रसाद, २४. मास्टर नंद लाल, २५. श्री. राम साहाय, २६. श्री. बी एन मुनावल्ली, २७. श्री. मैक्य लाल वर्मा, २८. श्री. आर. बी. विजयवर्गीय, २९. श्री. बलवंत सिन्हा मेहता, ३०. श्री. सीताराम जाजू, ३१. ठाकूर लाल सिंग, ३२. श्री. चंडिका राम, ३३. प्रा. यशवंत राय, ३४. डॉ. धरम प्रकाश, ३५. श्री
४७. श्री. गोकुळ लाल आसव, ४८. लाला अचिंत राम, ४९. श्री. जसवंत सिंगजी, ५०. श्री. गिरिजा शंकर गुहा, ५१. श्री. पी. डी. हिंमतसिंगका, ५२. श्री. एच. जे. खेडेकर, ५३. श्री. एस. नागप्पा, ५४. श्री. अरी बहादूर गुरांग, ५५. श्री. सी. एम. पूंछा, ५६. श्री. व्ही. रामय्या, ५७. एस. सी. मजुमदार, ५८. श्री. यु. श्रीनि

**दुसऱ्या रांगेत**: १. डॉ. पी. के सेन, २. श्री. सरदार सिंग जी बहादूर ऑफ खेत्री, ३. श्री. ए. थानु पिल्लई, ४. श्री. बनारसी प्रसाद झुनझुनवाला, ५. श्री. जगत नारायण लाल, ६. श्री. हुसेन इमाम, ७. श्री. किशोरी मोहन त्रिपाठी, ८. श्री. मोहम्मद अहमद काझमी, ९. श्री. अदफुर रौफ, १०. श्री. बी. एम. गुप्ते, ११. श्री. महे
सिंग, २३. श्री. एम. तिरुमुला राव, २४. श्रीमती जी. दुर्गाबाई, २५. श्रीमती कमला चौधरी, २६. श्रीमती दक्षयानी वेलायधन, २७. श्रीमती अम्मु स्वामीनंदन, २८. बेगम ऐझाझ रसुल, २९. श्री. टी. सिद्धलिंगय्या, ३०. श्री. मोहनलाल गौतम, ३१. श्री. बी. बाब. सोंधी, ३२. श्री. महावीर त्यागी, ३३. श्री. आर. एल. मालवीय
४५. आचार्य जुगल किशोर, ४६. चौधरी हैदर हुसेन, ४७. श्री. के.टी.एम. अहमद इब्राहिम, ४८. श्री. बी. पॉकर, ४९. श्री. जी. के. विजयवर्गीय, ५०. श्री. मोहम्मद इस्माईल साहिब, ५१. श्री. ओ. व्ही. अल्गेसन, ५२. श्री. सी. सुब्रमण्यम, ५३. श्री. हिरालाल शास्त्री, ५४. श्री. गोकुलभाई डी. भट्ट, ५५. श्री. लेफ्टनंट कर्नल

**तिसऱ्या रांगेत**: १. श्री. परनलाल ठाकुरलाल मुन्शी, २. श्री. कुलधर छलिहा, ३. श्री. मुकुट बिहारी लाल भार्गव, ४. श्री. विनायक राव बी. वैद्य, ५. सरदार हुकुम सिंग, ६. श्री. महबुब अली बेग, ७. चौधरी रणबीर सिंग, ८. श्री. नंदकिशोर दास, ९. श्री. ठाकुरदास भार्गव, १०. डॉ. जोसेफ अल्बन डिसोझा, ११. श्री. टी.
२२. श्री. ए. के. मेनन, २३. श्री. भवानी अर्जुन किमजी, २४. श्री. राम सहाय तिवारी, २५. श्री. मन्नुलालजी द्विवेदी, २६. श्री. के. के. देसाई, २७. श्री. के. एन. देसाई, २८. श्री. सी. के. शहा, २९. डॉ. वाय. एस. परमार, ३०. दरबार गोपालदास ए. देसाई, ३१. श्री. बलवंत राय गोपाल जी, ३२. श्री. जेसुखलाल हाथी,
कुसुम कांत जैन, ४५. श्री. राज भदुर, ४६. श्री. देशबंधु गुप्ता, ४७. श्री. बिस्वनाथ दास, ४८. श्री. एम. वीरबाहू, ४९. श्री. व्ही. नडिमुथू पिल्लई, ५०. श्री. टी. ए. रामलिंगम चेट्टियार, ५१. श्री. के. कामराज, ५२. श्री. गोविंद मालवीय, ५३. श्री. एस. निजलिंगप्पा, ५४. माननीय श्री. सत्यनारायण सिन्हा

**सर्वात वरच्या रांगेत**: १. श्री. जुगल किशोर खन्ना (उप सचिव), २. श्री. कमलापती तिवारी, ३. श्री. शिब्बन लाल सक्सेना, ४. (नाव अज्ञात), ५. श्री. मोतीराम बैग्रा, ६. मौलाना मोहम्मद सय्यद मसुदी, ७. मिर्झा एम. अफझल बेग, ८. श्री. सुंदर लाल, ९. श्री. सतीश चंद्र, १०. श्री. युधिष्ठिर मिश्रा, ११. श्री. अरुण सी.
२३. श्री. बी. शिवा राव, २४. माननीय श्री. राज कृष्ण बोस, २५. श्री. व्ही. आय. मुन्नस्वामी पिल्लई, २६. श्री. व्ही. एस. सरवटे, २७. डॉ. पी. आर. देशमुख, २८. श्री. गोपाल नरायण, २९. श्री. पी. आय. नरसिम्हा राजू, ३०. श्री. एल. एस. भाटकर, ३१. श्री. आर. एम. नलावडे, ३२. श्री. व्ही. डी. त्रिपाठी, ३३. श्री. अ
वेंकटराव, ४६. (पोलीस ६), ४७. श्री. नझिरुद्दीन अहमद, ४८. काका भगवंत रॉय

# भारतीय संविधान सभा, १९५० चे सदस्य



. पी. रामस्वामी रेड्डियार, १२. मिस ॲनी मॅस्कॅरेन, १३. श्रीम. पूर्णिमा बॅनर्जी, १४. माननीय श्री. अनुग्रह्यनारायण सिन्हा, १५. माननीय श्री. श्रीकृष्ण सिन्हा, १६. ए. व्ही. ठक्कर, १७. श्री. लक्ष्मीकान्त मैत्रा, १८. माननीय श्री. आर. आर. दिवाकर, १९. श्री. एम. अनंतसयनम अय्यंगार, २०. माननीय श्री. एन. व्ही.
ारी अमृत कौर, २९. माननीय श्री. जवाहरलाल नेहरू, ३०. डॉ. एच. सी. मुखर्जी, ३१. माननीय डॉ. राजेंद्र प्रसाद (राष्ट्रपती), ३२. श्री. व्ही. टी. कृष्णम्माचारी, ३३. माननीय श्री. सरदार वल्लभभाई पटेल, ३४. माननीय श्री. जगजीवन राम, ३५. माननीय श्री. रफी अहमद किडवई, ३६. माननीय डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी,
६. श्री. पी. गोविंद मेनन, ४७. श्री. दामोदर स्वरूप सेठ, ४८. प्रो. निबारण चंद्र लष्कर, ४९. डॉ. रघू वीर, ५०. माननीय श्री. के. संथानम्, ५१. डी. बी. मतारी, ५२. श्री. रोहिणी कुमार चौधरी, ५३. बाबू राम नारायण सिंह, ५४. श्री. लक्ष्मी नारायण साहू, ५५. श्री. आर. के. सिधवा, ५६. श्रीम. सुचेता कृपलानी

श्री. श्री नारायण मेहता, १३. माननीय बिनोदानंद झा, १४. श्री. गुप्तनाथ सिंग, १५. श्री. दीप नारायण सिन्हा, १६. श्री. जदूबन्स साहाय, १७. श्री. अमियो कुमार घोष, १८. श्री. शंतनु कुमार दास, १९. श्री. एल के भारती, २०. सरदार सोचेत सिंग, २१. श्री. उपेंद्र नाथ बर्मन, २२. श्री. बोनिफेस लाक्रा,
. परगी लाल, ३६. श्री. भगवान दिन, ३७. श्री. दयाल दास भगत, ३८. श्री. पी. कक्कन, ३९. श्री. देवेंद्र नाथ सामंत, ४०. ठाकूर छेदी लाल, ४१. श्री. राम चंद्र गुप्ता, ४२. श्री. व्ही. एन. तिवारी, ४३. श्री. के. सी. शर्मा, ४४. श्री. जय नारायण व्यास, ४५. श्री. कल्लुर सुब्बा राव, ४६. श्री. बी. एन. बियानी,
वास मल्लय्या, ५९. श्री. सुरेंद्र मोहन घोष
श प्रसाद सिन्हा, १२. कर्नल बी. एच. झैदी, १३. डॉ. पी. सुब्बरायन, १४. श्री. एस व्ही कृष्णमूर्ती राव, १५. श्री. आर. सी. उपाध्याय, १६. श्री. के. पी. यादव, १७. श्री. शंतनु कुमार दास, १८. ठाकुर कृष्ण सिंग, १९. श्री. एल. के. भारती, २०. श्री. व्ही. सी. केशव राव, २१. श्री. भागवत प्रसाद, २२. श्री. जसपाल
, ३४. श्री. रामप्रसाद पोतई, ३५. श्री. सारंगधर दास, ३६. श्री. के. हनुमंतय्या, ३७. श्री. एच. व्ही. कामत, ३८. श्री. एच. गुरुव रेड्डी, ३९. लाला राज कुंवर, ४०. सरदार रणजीत सिंग, ४१. श्री. पदमपत सिंघानिया, ४२. श्री. एम. ए. मुथिया चेट्टियार, ४३. श्री. सय्यद मोहम्मद सादुल्ला, ४४. श्री. टीजेएम विल्सन,
दलेल सिंग जी, ५६. पंडित हृदयनाथ कुंझरू, ५७. डॉ. बक्षी टेकचंद, ५८. श्री. सरदार दयाल सिंग
छन्निया, १२. कॅप्टन अवधेश प्रताप सिंग, १३. श्री. शंभू नाथ शुक्ला, १४. श्री. के. एम. जेढे, १५. श्री. एच. व्ही. पाटसकर, १६. श्री. आर. बी. कुंभार, १७. माननीय श्री. संजीव रेड्डी, १८. श्री. डी. गोविंदा दास, १९. सरदार भुपेंदर सिंग मान, २०. श्री. एच. सिद्धवीरप्पा, २१ श्री. पी. के. कुन्हिरामन,
३३. श्री. अजित प्रसाद जैन, ३४. सरदार जोगिंदर सिंग, ३५. श्री. बालकृष्ण शर्मा, ३६. श्री. एम. एल. चटोपाध्याय, ३७. श्री. हर गोविंद पंत, ३८. श्री. आर. व्ही. धुळेकर, ३९. श्री. मसुरया दिन, ४०. श्री. बन्सीधर मिश्रा, ४१. माननीय जी. एस. गुप्ता, ४२. श्री. बी. ए. मंडलोई, ४३. श्री. एस. टी. धर्माधिकारी, ४४. श्री.

गुहा, १२. श्री. व्ही. सुब्रमण्यम, १३. श्री. मोतुरी सत्यनारायण, १४. श्री. बी. के. दास, १५. श्री. सतीश चंद्र सामंता, १६. श्री. जसीमुद्दीन अहमद, १७. डॉ. मनमोहन दास, १८. (मार्शल), १९. श्री. पी. टी. चाको, २०. श्री. के. ए. मोहम्मद, २१. श्री. आर. शंकर, २२. श्री. पी. एस. नटराजा पिल्लई,
ल्लु रई शास्त्री, ३४. श्री. ए. धरम दास, ३५. श्री. एच. व्ही. त्रिपाठी, ३६. श्री. ग्यानी गुरमुख सिंग मुसाफिर, ३७. नवाब मोहम्मद इस्माईल खान, ३८. मौलाना हजरत मोहानी, ३९. श्री. लाल मोहन पती, ४०. (पोलीस १), ४१. (पोलीस २), ४२. (पोलीस ३), ४३. (पोलीस ४), ४४. (पोलीस ५), ४५. श्री. काल

भारतासाठी राज्य सचिवांच्या नेतृत्वाखालील शाही सेवा 'अखिल भारतीय सेवा' आणि 'केंद्रीय सेवा' या दोन भागांमध्ये विभागल्या गेल्या. केंद्रीय सेवांचा संबंध केंद्र सरकारच्या थेट नियंत्रणाखाली असलेल्या सेवांशी होता. केंद्रीय सचिवालयाव्यतिरिक्त, इतर महत्त्वाच्या सेवा म्हणजे रेल्वे सेवा, भारतीय पोस्ट आणि टेलिग्राफ सेवा आणि इम्पीरियल कस्टम सेवा. यापैकी काहींसाठी, राज्य सचिवांची नियुक्ती केली गेली. परंतु बहुतेक प्रकरणांमध्ये त्यांचे सदस्य भारत सरकारद्वारे नियुक्त आणि नियंत्रित केले गेले.

भारतातील नागरी सेवा आयोगाचा उगम ५ मार्च १९१९ रोजीच्या भारतीय घटनात्मक सुधारणांवरील भारत सरकारच्या पहिल्या परिपत्रकामध्ये आढळतो. त्यामध्ये सेवाविषयक बाबींचे नियमन करण्याची जबाबदारी सर्वस्वी सोपवता येईल असे कायमस्वरूपी कार्यालय स्थापन करण्याच्या गरजेचा उल्लेख करण्यात आला होता. मुख्यतः सेवाविषयक बाबींच्या नियमनासाठी आकारलेल्या संस्थेच्या या संकल्पनेला भारत सरकार कायदा, १९१९ मध्ये अधिक व्यावहारिक स्वरूप प्राप्त झाले. कायद्याच्या कलम ९६(क) मध्ये भारतातील सार्वजनिक सेवांच्या भरती आणि नियंत्रणाशी संबंधित अशा कार्यांसाठी लोकसेवा आयोगाची स्थापना करण्याची तरतूद करण्यात आली. या आयोगाद्वारे राज्य सचिवांनी निर्दिष्ट केलेल्या नियमांनुसार उमेदवारांची नियुक्ती केली जाणार होती.

भारत सरकार कायदा १९१९ संमत झाल्यानंतर, आयोगाच्या स्थापनेबाबत अनेक पातळ्यांवर दीर्घकाळ पत्रव्यवहार करूनही कोणताही निर्णय घेण्यात आला नाही. नंतर हे प्रकरण भारतातील उच्च नागरी सेवांवरील शाही कमिशनकडे (ज्याला ली कमिशन म्हणूनही ओळखले जाते) पाठविण्यात आले. ली कमिशनने १९२४ मध्ये आपल्या अहवालात, भारत सरकार कायदा, १९१९ अंतर्गत विचार केला जाणारा वैधानिक लोकसेवा आयोग कोणताही विलंब न करता स्थापन करण्याची शिफारस केली.




**पहिल्या महायुद्धानंतर भारतीय स्वातंत्र्य चळवळ तीव्र झाली**



**लोकसेवा आयोगाची आवश्यकता सांगणाऱ्या ली कमिशनचे अध्यक्ष आर्थर ली**

**मद्रास प्रांताने सन १९२९ मध्ये प्रथम कायदा पारित करून, प्रांतीय लोकसेवा आयोगाची स्थापना केली. आयोगाचे अध्यक्ष व सदस्य ▼**





**भारतीय संघ लोकसेवा आयोगाच्या अधिकाऱ्यांची शेवटची तुकडी –आयसीएस प्रशिक्षण संस्था डेहराडून (१९४४)**





भारत सरकार कायदा,
१९३५



**स्वातंत्र्योत्तर भारताचे पहिले नियंत्रक व महालेखा परीक्षक श्री. व्ही. नरहरी राव लोकसेवा आयोगाच्या गणवेशामध्ये.**

भारत सरकार कायदा, १९१९ च्या कलम ९६(क) च्या तरतुदी आणि १९२४ मध्ये ली कमिशनने लोकसेवा आयोगाच्या त्वरित स्थापनेसाठी केलेल्या भक्कम शिफारशींनंतर लोकसेवा आयोगाची स्थापना भारतात ४ ऑक्टोबर १९२६ रोजी झाली. या आयोगात एक अध्यक्ष आणि ४ सदस्य होते. युनायटेड किंगडमच्या होम सिव्हिल सर्व्हिसचे सदस्य सर रॉस बार्कर हे आयोगाचे पहिले अध्यक्ष बनले. लोकसेवा आयोगाच्या कार्यांचा भारत सरकार कायदा, १९१९ मध्ये उल्लेख नव्हता परंतु त्याची कार्ये कलम ९६(क) च्या उपकलम (२) अंतर्गत तयार केलेल्या लोकसेवा आयोग (कार्ये) नियम, १९२६ द्वारे नियंत्रित करण्यात आली होती.

याव्यतिरिक्त, भारत सरकार कायदा, १९३५ मध्ये संघ लोकसेवा आयोग आणि प्रत्येक प्रांत किंवा प्रांतांच्या गटासाठी प्रांतीय लोकसेवा आयोगांची कल्पना केली आहे. त्यामुळे भारत सरकार अधिनियम, १९३५ मधील तरतुदीनुसार एप्रिल १९३७ पासून लोकसेवा आयोग हे संघ लोकसेवा आयोग बनले. २६ जानेवारी १९५० रोजी भारताची राज्यघटना अमलात आल्यामुळे राज्यघटनेच्या कलम ३७८ च्या विभाग (१) नुसार अध्यक्ष आणि सदस्य यांच्यासह हा आयोग संघ लोकसेवा आयोग म्हणून ओळखला जाऊ लागला.

कार्यक्षम नागरी सेवेसाठी प्रत्येक राज्यासाठी लोकसेवा आयोग असणे आवश्यक आहे. सेवा भरती नियंत्रणासाठी प्रांतांनी स्वतःच्या लोकसेवा आयोगाबाबत कायदा करावा अशीही ली कमिशनने शिफारस केली होती. भारत सरकारसाठी १९२६ मध्ये संघ लोकसेवा आयोगाची (इम्पीरिअल सिव्हिल सर्विसेस - आयसीएस) स्थापना करण्यात आली. त्या अनुषंगाने मद्रास प्रांताने सन १९२९ मध्ये प्रथम कायदा पारित करून, प्रांतीय लोकसेवा आयोगाची स्थापना केली. ■



सार्वजनिक बांधकाम विभाग,जुने सचिवालय येथे बॉम्बे लोकसेवा आयोगाचे पहिले कार्यालय स्थापन करण्यात आले.




बॉम्बे सिंध बरोडा प्रांतांचे नकाशे



# बॉम्बे-सिंध लोकसेवा आयोग


ब्रिटिशांच्या ताब्यात असलेल्या भारतातील प्रदेशाची ब्रिटिश सरकारने प्रशासकीय प्रांतांमध्ये विभागणी केली होती. त्यापैकी एक म्हणजे बॉम्बे प्रांत. या प्रांतामध्ये सध्याच्या भारतीय प्रजासत्ताकाच्या पश्चिमेकडील गुजरात, महाराष्ट्राचा पश्चिम भाग, वायव्य कर्नाटक हे भूप्रदेश, सध्याच्या पाकिस्तानातील सिंध प्रांत या प्रदेशांचा समावेश होता.

ब्रिटिश राजवटीत भारतीयांकडून सतत होत असलेली स्वराज्याची आंदोलने व विरोध लक्षात घेऊन, ब्रिटिश सरकारने प्रशासकीय बाबींमध्ये काही सांविधानिक सुधारणा केल्या.

सन १९१९ मध्ये सचिव, भारत सरकार यांना उद्देशून भारत सरकारने संविधानिक सुधारणा बाबतचा प्रस्ताव पाठवला. त्यामध्ये पहिल्यांदाच लोकसेवा आयोगाचा विषय चर्चिला गेला आणि भारत सरकार कायदा १९१९ मधील कलम ९६ सी अन्वये लोकसेवा आयोगाच्या स्थापनेची तरतूद केली गेली. तरीसुद्धा सात वर्षे ही तरतूद कार्यान्वित झाली नाही. १९२३ मध्ये नियुक्त केलेल्या ली कमिशनच्या शिफारशींच्या अनुषंगाने भारत सरकारसाठी १९२६ मध्ये संघ लोकसेवा आयोगाची स्थापना झाली. आयोगाची आवश्यकता ली कमिशनकडून प्रभावी पद्धतीने मांडण्यात आली होती. त्यात विशेषकरून असे नमूद केले होते की कार्यक्षम नागरी सेवेसाठी तिला राजकीय व खासगी दबावापासून संरक्षण मिळणे आवश्यक आहे आणि त्याचकरिता राज्यांसाठी लोकसेवा आयोग असणे आवश्यक आहे. असे असले तरी, भारत सरकार कायदा १९१९ मध्ये प्रांतनिहाय लोकसेवा आयोगांच्या स्थापनेबाबत मौन पाळले होते. सेवा भरती नियंत्रणासाठी व राजकीय दबावाला आळा घालण्यासाठी प्रांतांनी स्वतःच्या लोकसेवा आयोगाबाबत कायदा करावा अशीही ली कमिशनने शिफारस केली होती.

त्या अनुषंगाने मद्रास प्रांताने सन १९२९ मध्ये प्रथम कायदा पारित करून प्रांतीय लोकसेवा आयोगाची स्थापना केली. त्यानंतर सन १९३७ मध्ये भारत सरकार कायदा १९३५ खालील कलम २६४ अन्वये बॉम्बे व सिंध या दोन प्रांतांसाठी संयुक्त असे लोकसेवा आयोग बॉम्बे-सिंध लोकसेवा आयोग या नावाने स्थापन झाले.

श्री. एच बी क्लेयटॉन यांनी आयोगाचे सर्वप्रथम अध्यक्षपद भूषविले होते. बॉम्बे-सिंध लोकसेवा आयोगाचे पहिले कार्यालय जुन्या सचिवालयाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या इमारतीमध्ये होते. बॉम्बे-सिंध लोकसेवा आयोगाचे वर्षातील बरेचसे कामकाज मुंबईत व काही गरजेनुसार सिंध प्रांतात होत असे. ■



Gratis

15 34

**BOMBAY-SIND PUBLIC SERVICE COMMISSION.**

**Secretary, Bombay Board of Film Censors.**

No. 342.—Applications in the prescribed form are invited from British subjects, or who being non-British subjects are persons in respect of whom a declaration of eligibility for service has been issued under section 262 (2) of the Government of India Act, 1935 (men and women), and who are "natives of the Province of Bombay" for the post of *Secretary to the Bombay Board of Film Censors*, which is a whole-time, non-pensionable and permanent post—(not paid from provincial revenues). The pay of the post is Rs. 300—50—500, with the benefit of a Provident Fund. Government servants are not eligible. The selected candidate will be on probation for one year, and his services will be liable to be terminated on a three months' notice. *Qualifications.*—A high class Honours degree in English or Education of the Bombay University or any other Indian or British University, preferably both, and proficiency in one of the regional languages of the Province [viz. Gujarati, Marathi, Kannada or Hindustani (Devanagari or Urdu script)]. *Age.*—Below 35 years on 1st July 1939. *Duties.*—To arrange meetings of the Board, to look after the proper transaction of the Board's business, to examine films or have them examined by an Examiner, and to visit periodically all places licensed under the Cinematograph Act, and perform other duties laid down in the rules made under section 8 of the Act. The selected candidate will be required to join his duties on or about the 1st July 1939.

Applicants should supply full details required in the printed prescribed form of application, copies of which can be had from the office of the Commission on payment (in cash or by *crossed Indian Postal Order only*) of Rupee one per copy, and enclosing a *self-addressed envelope* bearing a two-anna postage stamp. *Copies of certificates and testimonials* regarding age, nationality, domicile, character, qualifications, experience and past service, if any, should be submitted with the application. (*Note.—Original* certificates and testimonials should be produced only at the time of interview, and if forwarded with the application will *not* be returned.) *Any attempt, direct or indirect, to influence the Secretary or a Member of the Commission, will disqualify the candidate.* Applications *by registered post* should reach the Secretary, Bombay-Sind Public Service Commission, P. W. D. Secretariat, Bombay, not later than 20th May 1939.

J. B. FERNANDES,
Secretary, Bombay-Sind Public Service Commission.

Bombay, the 15th April 1939.

L Bk H 96

BOMBAY: PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.

१५ एप्रिल १९३९ रोजी बॉम्बे-सिंध लोकसेवा आयोगातर्फे बॉम्बे बोर्ड ऑफ फिल्म सेन्सॉर या विभागाच्या सचिव पदाकरिता काढण्यात आलेली जाहिरात

ब्रिटिशकालीन भारतातील कार्यालय





CORPORATI






बॉम्बे राज्याचे पहिले मुख्यमंत्री श्री. बी. जी. खेर सभेस संबोधित करताना



बॉम्बे राज्य १९४७


# बॉम्बे लोकसेवा आयोग

बॉम्बे व सिंध प्रांत यांच्यामध्ये झालेल्या करारातील तरतुदीनुसार दोन्ही प्रांतांकरिता कायमचे संयुक्त लोकसेवा आयोग होते. परंतु सन १९४७ च्या सुरुवातीस लोकसेवा आयोगाच्या कामात मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याने बॉम्बे शासनास स्वतंत्र आयोगाची आवश्यकता भासली. करार तोडण्याकरिता १२ महिन्यांची नोटीस आवश्यक होती. परंतु परस्पर सामंजस्याने ६ महिन्यांची नोटीस देऊन दि.३१.७.४७ रोजी करार संपुष्टात आला आणि दि.१.८.४७ पासून बॉम्बे लोकसेवा आयोग कार्यान्वित झाला.

बॉम्बे लोकसेवा आयोग कार्यान्वित झाल्यामुळे, बॉम्बे सिंध संयुक्त लोकसेवा आयोगाचे अस्तित्व नष्ट झाले. तसेच आयोगाच्या अध्यक्ष व सदस्यांच्या सेवाशर्ती व कर्मचाऱ्यांच्या सेवाशर्ती याबाबतचे बॉम्बेच्या राज्यपालांनी केलेले नियम देखील आपोआपच संपुष्टात आले. बॉम्बे-सिंध संयुक्त लोकसेवा आयोग संपुष्टात आल्यामुळे जो बदल करणे आवश्यक राहील, तेवढाच बदल करून इतर काही बदल न करता बॉम्बे लोकसेवा आयोगाचे विनियम तयार करण्यात आले.

आयोगाचे वाढीव काम व कर्मचारी वृंद यांच्या तुलनेत सार्वजनिक बांधकाम विभाग, जुने सचिवालय येथील जागा अपुरी व खूपच गैरसोयीची होऊ लागली म्हणून दिनांक २४ ऑक्टोबर १९५० पासून आयोगाचे कार्यालय बँक ऑफ इंडिया इमारतीत स्थलांतरित करण्यात आले. ■

# महाराष्ट्र लोकसेवा आयोग



संविधान मसुदा समिती

१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाले. २८ ऑगस्ट १९४७ रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली 'संविधान मसुदा समिती' ची स्थापना झाली. जवळपास दोन वर्षांच्या अथक प्रयत्नानंतर २६ नोव्हेंबर १९४९ रोजी संविधान मसुदा समितीने तयार केलेला संविधानाचा मसुदा संविधानसभेने स्वीकारला. त्यानंतर दोन महिन्यांनी म्हणजेच २६ जानेवारी १९५० रोजी भारतीय घटना पारित करण्यात आली. आणि भारत एक प्रजासत्ताक देश बनला.

स्वातंत्र्यानंतर भाषावार प्रांतानुसार भारताची विविध राज्यांमध्ये विभागणी करण्याचे धोरण आखण्यात आले. त्यानुसार १ नोव्हेंबर १९५६ रोजी, केंद्राने सौराष्ट्र, गुजरात, मराठवाडा, विदर्भ व मुंबई इलाख्यातील सर्व मराठी प्रदेश मिळून (परंतु बेळगाव-कारवार वगळून) विशाल द्विभाषिक राज्य स्थापले. परंतु या द्विभाषिक राज्याला महाराष्ट्र व गुजरात येथे कडाडून विरोध झाला. फाजल अली आयोगाच्या विरोधात महाराष्ट्रभर असंतोषाचा डोंब उसळला. नेहरूंनी त्यामुळे सौराष्ट्रासह गुजरात, विदर्भासह महाराष्ट्र व स्वतंत्र बॉम्बे अशी त्रिराज्य योजना जाहीर केली. या योजनेत महाराष्ट्रापासून



संविधान रचनेची बैठक



स्वातंत्र्योत्तर संसदीय अधिवेशन



२६ जानेवारी १९५० रोजी भारतीय घटना पारित करण्यात आली












'मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे' हे या आंदोलनाचे घोषवाक्य बनले. जाने-फेब्रु १९५६ रोजी केंद्रशासित बॉम्बेची घोषणा केल्यानंतर त्याला विरोध करण्यासाठी महाराष्ट्रात लोक रस्त्यावर उतरले.


प्रबोधनकार ठाकरे



डॉ. बाबासाहेब आंबेडकर



प्रह्लाद केशव अत्रे


श्रीपाद डांगे


सेनापती बापट


एस एम जोशी


शाहीर अमरशेख


भाई उद्धवराव पाटील


**भारताचे अर्थमंत्री सी.डी. देशमुख यांनी महाराष्ट्रावर होणाऱ्या अन्यायाच्या निषेधार्थ आपला राजीनामा दिला. या राजीनाम्यामुळे 'संयुक्त महाराष्ट्र' चळवळीला अधिक बळ मिळाले.**

मुंबई शहर वेगळे केल्यामुळे अन्यायाची भावना मराठीजनांत पसरली व संयुक्त महाराष्ट्र चळवळीने पेट घेतला.

'मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे' हे या आंदोलनाचे घोषवाक्य बनले. जाने-फेब्रु १९५६ रोजी केंद्रशासित मुंबईची घोषणा केल्यानंतर लोक रस्त्यावर उतरले. सेनापती बापट, एस.एम.जोशी, प्रल्हाद केशव अत्रे, श्रीपाद डांगे, शाहीर अमर शेख, भाई उद्धवराव पाटील, प्रबोधनकार ठाकरे हे चळवळीतील महत्त्वाचे नेते ठरले. हरताळ, सत्याग्रह, आंदोलन व मोर्चे सुरू झाले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचाही संयुक्त महाराष्ट्र चळवळीला सक्रीय पाठिंबा होता. भारताचे अर्थमंत्री सी.डी. देशमुख यांनी महाराष्ट्रावर होणाऱ्या अन्यायाच्या निषेधार्थ आपला राजीनामा दिला. या राजीनाम्यामुळे चळवळीला अधिक बळ मिळाले.


संयुक्त महाराष्ट्र आंदोलनात एकूण १०७ जणांनी आपल्या प्राणाची आहुती दिली. त्यांच्या स्मरणार्थ मुंबईच्या फ्लोरा फाउंटन भागात हुतात्मा स्मारक उभारले गेले. संयुक्त महाराष्ट्र समितीने दिल्ली येथे प्रचंड सत्याग्रह घडवून आणला.

काँग्रेस सरकारचे नेतृत्व या आंदोलनामुळे मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राला अनुकूल झाले आणि या सर्वांचा परिपाक म्हणजे १९६० सालच्या कामगार दिनी- १ मे रोजी महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली. महाराष्ट्र राज्य स्थापनेचा कलश महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या हस्ते दिल्लीहून आणला गेला. नव्या राज्याची मुंबई ही राजधानी व नागपूर उपराजधानी निश्चित झाली.

दि. १ मे १९६० रोजी बॉम्बे राज्याची महाराष्ट्र आणि गुजरात या नवीन राज्यांमध्ये विभागणी करण्यात आली. त्यामुळे मुंबई लोकसेवा आयोग हे गुजरात लोकसेवा आयोगासाठी असलेली चार पदे कमी करून उर्वरित बाबतीत जसेच्या तसे महाराष्ट्र लोकसेवा आयोग म्हणून अस्तित्वात आले.

दिनांक १ एप्रिल १९६२ रोजी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने आपला रजत महोत्सव साजरा केला. त्यावेळी महाराष्ट्राचे राज्यपाल श्री. श्रीप्रकाश अध्यक्ष म्हणून, श्री. यशवंतराव चव्हाण (मुख्यमंत्री) प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच महाराष्ट्र शासनाचे मुख्य सचिव, आयोगाचे निवृत्त सदस्य, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे सचिव आणि कर्मचारीवृंद देखील उपस्थित होते.

आयोगाच्या रजत महोत्सवाचा मुहूर्त साधून आयोगाचे अध्यक्ष श्री. एस.पी.पी.थोरात यांनी 'स्वसुखनिरभिलाषः खीद्यते लोकहेतोः' हे ब्रीदवाक्य स्वीकारल्याचे तसेच कला संचालक महाराष्ट्र राज्य यांनी आयोगासाठी तयार करून दिलेले चिन्ह, बोधचिन्ह म्हणून स्वीकारल्याचे घोषित केले. आपल्या वर्तणुकीने व कार्याने ते सार्थ करू असे आपल्या सर्व सहकाऱ्यांच्या वतीने राज्यपाल व मुख्यमंत्री यांना आश्वासन दिले. ■



१ मे १९६० रोजी, भाषावार प्रांतरचनेमुळे महाराष्ट्र व गुजरात या राज्यांची निर्मिती झाली. तेव्हापासून गुजरात राज्यासाठी गुजरात लोकसेवा आयोग व महाराष्ट्र राज्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोग अस्तित्वात आले.



The Times of India

MAHARASHTRA & GUJARAT CABINETS SWORN

STATE LANGUAGE TO BE MARATHI

Policy Announcement By Mr. Chavan

JUSTICE & FAIRPLAY FOR ALL ASSURED

Cabinet Of Thirteen For Gujarat

HISTORIC CEREMONY AT HARIJAN ASHRAM

CROWD SETS FIRE TO POST OFFICE

Mob Violence In Nagpur: Police Use Tear-Gas

MINISTERS OF GUJARAT

Distribution Of Portfolios








**१ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्य अस्तित्वात आले**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे कार्यालय फ्लोरा फाउंटन (सांप्रतचा हुतात्मा स्मारक चौक) जवळील बँक ऑफ इंडिया इमारतीमध्ये होते.

संविधानकर्त्यांनी संविधानातील तरतुदी तयार करताना, शासनाचे कामकाज करवून घेण्यासाठी सनदी अधिकाऱ्यांसह सामान्य कर्मचाऱ्यांची देखील आवश्यकता भासेल, ही बाब विचारात घेऊन, संविधानातील अनुच्छेद ३१५ ते ३२३ मध्ये लोकसेवा आयोगाबाबतच्या तरतुदी केल्या. या तरतुदी विचारात घेऊन प्रत्येक राज्यांनी आपापल्या राज्याकरता लोकसेवा आयोगाची निर्मिती केली, जेणेकरून त्या त्या राज्यातील शासकीय कार्यालयाकरिता निकड असलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांची भरती करण्यात यावी. संविधानातील या तरतुदींचा अंगीकार करून महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे काम पार पाडण्यात येत आहे.

१ एप्रिल १९३७ रोजी स्थापन झालेल्या लोकसेवा आयोगाच्या इवल्याशा रोपट्याचे आता एका विशाल वटवृक्षामध्ये रूपांतर झाले आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोग म्हणजे एक Vibrant संस्था, तरुणाईचे स्फूर्तीस्थान. आयोगाद्वारे लाखो तरुण, स्पर्धा परीक्षांद्वारे आपली योग्यता आजमावत असतात. काही होतकरू गरीब उमेदवार, जिद्दीने बुद्धीच्या आणि मेहनतीच्या बळावर, मोठी पदे मिळवतात. आयोगाची कार्यपद्धती, नवीन तंत्रज्ञानाचा वापर, निकालातील अचूकता आणि पारदर्शकता यामुळे उमेदवारांचा आयोगावर प्रचंड विश्वास आहे. उमेदवारांच्या मनातील आयोगाचे हे स्थान निश्चितच कायम अबाधित राहील आणि आयोगाचा देखील कायम असाच प्रयत्न राहील. ■

# स्वप्नपूर्तीच्या दिशेने वाटचाल

## आयोगाच्या कार्यालयासाठी स्वतःच्या मालकीची वास्तू

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या ८७व्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून आयोगाच्या बेलापूर सीबीडी येथील कार्यालयाचे उद्घाटन दि. १ एप्रिल २०२३ रोजी अपर मुख्य सचिव नितीन गद्रे यांच्या हस्ते झाले.
यावेळी आयोगाचे अध्यक्ष श्री. किशोर राजे-निंबाळकर, सदस्य डॉ. प्रताप दिघावकर, डॉ. दिलीप पांढरपट्टे, सचिव डॉ. सुवर्णा खरात, सहसचिव सुनील अवताडे आदी उपस्थित होते.



स्वातंत्र्यपूर्व काळात अस्तित्वात असलेले मुंबई आणि सिंध लोकसेवा आयोग यांचे कार्यालय जुन्या सचिवालयाच्या सार्वजनिक बांधकाम विभाग इमारतीमध्ये होते. आयोगाचे वर्षातील बरेचसे कामकाज मुंबईत व काही गरजेनुसार सिंध प्रांतात होत असे.

भारताच्या स्वातंत्र्यानंतर अस्तित्वात आलेल्या मुंबई इलाख्यासाठी, मुंबई लोकसेवा आयोगाचे कार्यालयदेखील जुन्या सचिवालयाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या इमारतीमध्ये होते. मात्र आयोगाचे वाढीव काम व कर्मचारीवृंद यांच्या तुलनेत सार्वजनिक बांधकाम विभाग, जुने सचिवालय येथील जागा अपुरी व खूपच गैरसोयीची होऊ लागली म्हणून दिनांक २४ ऑक्टोबर, १९५० पासून मुंबई लोकसेवा आयोगाचे कार्यालय बँक ऑफ इंडिया इमारतीत स्थलांतरित करण्यात आले.

भाषावार प्रांतरचना झाल्यानंतर दिनांक १ मे १९६० रोजी अस्तित्वात आलेल्या महाराष्ट्र राज्यासाठीचे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे कार्यालय देखील बँक ऑफ इंडीया इमारतीमध्येच होते.


अपुरी जागा व स्वतःचा परीक्षा हॉल नसणे या दोन मोठ्या समस्या आयोगापुढे होत्या. आयोगाची परीक्षा हॉलची गरज मे १९६६ मध्ये भागविली गेली. शासनाने आयोगाला माझगाव येथील विक्रीकर भवनाच्या इमारतीमधील ९ व्या मजल्यावरील १०,८०० चौरस फूट जागा उपलब्ध करून दिली.

बँक ऑफ इंडियाच्या इमारतीमधील तिसऱ्या मजल्यावर असलेले आयोगाचे कार्यालयही वाढीव काम व कर्मचारीवृंदामुळे अपुरे पडू लागले होते. बाजूलाच असलेले धर्मादाय आयुक्तांचे कार्यालय तेथून हलविल्यानंतर शासनाने १९७१ मध्ये ती जागा तसेच त्यानंतर फिशरीज डेव्हलपमेन्ट कॉर्पोरेशनची जागाही आयोगाच्या कार्यालयासाठी उपलब्ध करून दिली. दिवसेंदिवस आयोगातर्फे घेण्यात येणाऱ्या परीक्षांच्या संख्येमध्ये वाढ झाल्याने ही जागा देखील कमी पडू लागली.

दरम्यान माझगाव येथील विक्रीकर भवनातील ९ व्या मजल्यावरील आयोगाचे कार्यालय व परीक्षा हॉल रिक्त करून देण्याबद्दल शासनामार्फत सूचना करण्यात आल्याने, आयोगाचे कार्यालय व परीक्षा हॉल एकाच ठिकाणी राहील अशी स्वतंत्र जागा आयोगास उपलब्ध करून देण्याबाबतचा प्रस्ताव शासनास पाठविण्यात आला होता. त्यावेळी शासनाने आयोगासाठी सोयीस्कर होईल अशी जागा निवडून त्यांच्या सर्व कायदेशीर बाबी तपासून प्रस्ताव पाठविण्यास सांगण्यात आले होते. त्यानुसार आयोगाने वर्तमानपत्रात जाहिरात देऊन वेगवेगळ्या संस्थांकडून जागा दाखवून त्याबाबतचे देकार मागविले होते.

त्यातील एका संस्थेने माहीम येथे दाखविलेली जागा आयोगाने परीक्षा कक्षासाठी घेण्याचे ठरविले. परंतु ती जागा औद्योगिक विभागात असल्याने आयोगाच्या परीक्षा कक्षासाठी घेणे योग्य नाही, असे शासनाने कळविले. त्यामुळे आयोगाचे कार्यालय व परीक्षा हॉलसाठी जागेबाबत प्रश्न प्रलंबितच राहिला.

आयोगाच्या कार्यालयासाठी स्वतःची जागा नाही. सन २०१३ पासून आयोगाचे मुख्य कार्यालय, कुपरेज येथील महानगर टेलिफोन निगम लिमिटेड इमारत, कुपरेज फुटबॉल ग्राउंड समोर, महर्षी कर्वे रोड, मुंबई येथे स्थलांतरित करण्यात आले. त्या इमारतीमध्ये आयोगाचे मुख्य कार्यालय होते. फोर्ट-मुंबई येथील बँक ऑफ इंडिया इमारतीत आयोगाच्या कार्यालयाचा परीक्षा पूर्व विभाग, नियुक्ती विभाग, विभागीय परीक्षा आणि लेखा शाखा हे



आयोगाचे पहिले
कार्यालय जुन्या
सचिवालयाच्या
सार्वजनिक
बांधकाम विभागाच्या
इमारतीमध्ये होते

विभाग होते. (माझगाव येथील परीक्षा कक्षाची जागा विक्रीकर विभागाने स्वतःच्या ताब्यात घेतली.) त्यामुळे आयोगाचे कामकाज दोन वेगवेगळ्या ठिकाणाहून चालू होते. ही दोन्ही कार्यालये भाडे तत्वावरील होती. वेगवेगळ्या ठिकाणी कार्यालये असल्याने निर्णय घेताना, कामकाजामध्ये गतिमानता आणताना अडचणी येत होत्या.

महाराष्ट्रासारख्या प्रगत राज्यातील लोकसेवा आयोगाच्या कार्यालयासाठी स्वतंत्र अशी जागा असणे अत्यंत आवश्यक असताना हा प्रश्न कित्येक वर्षांपासून शासनाकडे प्रलंबित होता.

मात्र आयोगाने स्वतःच्या जागेबद्दल सन २०१७-१८ पासून शासनाकडे पाठपुरावा करण्यास सुरुवात केली. २०१८ मध्ये हिवाळी अधिवेशनात हा विषय सभागृहात प्रथम मांडला गेला. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे मुख्यालय होणे किती महत्त्वाचे आहे हे लक्षात घेता, त्यावेळचे मंत्री मा.श्री.चंद्रकांत दादा पाटील यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या स्वतंत्र मुख्यालयासाठी इमारत करणार असल्याची घोषणा केली. त्यानंतर महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या मुख्यालयाची जागा कुठे असावी यासाठी दोन पर्याय समोर आले.

१) मुंबई विद्यापीठाच्या आवारात व

२) बेलापूर, सीबीडी, नवी मुंबई येथे. यापैकी बेलापूरची जागा अंतिम करण्यात आली.

मात्र आता पुढचा प्रवास अतिशय खडतर होता. विविध विभागाच्या तांत्रिक मान्यता घेण्यासाठी खूप वेळ गेला. या सर्व तांत्रिक मान्यता घेण्यात व त्यांचा पाठपुरावा करण्यात श्री.सु. ह. अवताडे, सहसचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग यांचा वाटा मोलाचा आहे. त्यावेळचे अध्यक्ष मा. चंद्रशेखर ओक यांनी महत्त्वाची भूमिका निभावली आहे. तसेच श्री. अशोक शिनगारे (तत्कालीन सह व्यवस्थापकीय संचालक, सिडको) यांनी यात खूप मदत केली. तत्कालीन राज्यमंत्री श्री. मदन येरावर यांनी देखील यात खूप महत्त्वाची मदत केली. त्यासोबत मा.श्री.अजित दादा पवार (मा.उप मुख्यमंत्री) यांनी यात व्यक्तिशः लक्ष घालून रखडलेल्या कामास मान्यता मिळवून देण्यात मोठा पुढाकार घेतला.

मा. किशोर राजे-निंबाळकर (अध्यक्ष, महाराष्ट्र लोकसेवा आयोग) मा.देवानंद शिंदे (सदस्य, महाराष्ट्र लोकसेवा आयोग), नितीन गद्रे (अतिरिक्त मुख्य सचिव, सा.प्र.वि, सेवा) यांच्या पाठपुराव्यामुळे हा विषय मार्गी लागण्यास मदत झाली आहे.

विशेष करून मा.श्री.चंद्रकांत दादा पाटील (उच्च व तंत्र शिक्षण मंत्री), मा.मनुकुमार श्रीवास्तव (मुख्य सचिव), मा.देवेंद्र फडणवीस (उप मुख्यमंत्री) मा.एकनाथ शिंदे (मुख्यमंत्री) यांनी हा महत्त्वपूर्ण निर्णय घेऊन आयोगाच्या मुख्यालयासाठी निधी मंजूर केलेला आहे.


आयोगाच्या कार्यालयासाठी बेलापूर नवी मुंबई येथे देण्यात आलेल्या भूखंडावर लवकरच बांधकाम सुरू होईल आणि आयोगाचे स्वतःच्या वास्तूचे स्वप्न पूर्ण होईल. अर्थात्, बांधकाम, अंतर्गत सजावट यासाठी अजून काही कालावधी लागेल. त्यानंतरच स्वतःच्या स्वतंत्र वास्तूमध्ये आयोगाच्या कार्यालयाचे स्थलांतर होईल. देशातील सर्वात मोठे व सर्व सोयी सुविधांनी सुसज्ज असणारे असे हे मुख्यालय असेल. स्वप्नपूर्तीच्या दिशेने आता दमदार वाटचाल सुरू झाली आहे! ■

**दिनांक २४ ऑक्टोबर १९५० पासून आयोगाचे कार्यालय बँक ऑफ इंडियाच्या इमारतीत स्थलांतरित करण्यात आले.**







**सन २०१३ मध्ये महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे मुख्य कार्यालय कुपरेज येथील महानगर टेलिफोन एक्सचेंजच्या इमारतीत स्थलांतरित करण्यात आले.**






आयोगाच्या कार्यालयासाठी प्रस्तावित जागेची पाहणी करताना आयोगाचे मा. अध्यक्ष श्री. किशोर राजे-निंबाळकर




# संविधानातील तरतुदी


**अनुच्छेद ३१५ :** लोकसेवा आयोगाची निर्मिती, संघराज्याकरिता एक लोकसेवा आयोग व प्रत्येक राज्याकरिता एकेक लोकसेवा आयोग



**अनुच्छेद ३१६ :** सदस्यांची नियुक्ती आणि पदावधी



**अनुच्छेद ३१७ :** लोकसेवा आयोगाच्या सदस्यांस पदांवरून दूर करणे किंवा निलंबित करणे



**अनुच्छेद ३१८ :** आयोगाच्या सदस्य आणि कर्मचारी वर्ग यांच्या सेवाशर्तीबाबत विनिमय करण्याचा अधिकार




**अनुच्छेद ३१९ :** आयोगाच्या सदस्यांना सदस्यत्व समाप्त झाल्यावर पदे धारण करण्याबाबत मनाई



**अनुच्छेद ३२० :** लोकसेवा आयोगाची कार्ये



**अनुच्छेद ३२१ :** लोकसेवा आयोगाच्या कार्याचा विस्तार करण्याचा अधिकार




**अनुच्छेद ३२२ :** लोकसेवा आयोगाचे खर्च




**अनुच्छेद ३२३ :** लोकसेवा आयोगाचा अहवाल



# आयोगाचे बोधचिन्ह



विजयतां देवः ।

स्वसुखनिरभिलाषः खिद्यसे लोकहेतोः
प्रतिदिनमथवा ते वृत्तिरेवंविधैव ।

दिनांक १ एप्रिल १९६२ रोजी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने आपला रजत महोत्सव साजरा केला. हा मुहूर्त साधून आयोगाच्या अध्यक्षांनी 'स्वसुखनिरभिलाषः खिद्यसे लोकहेतोः' हे ब्रीदवाक्य स्वीकारल्याचे, तसेच कला संचालनालय महाराष्ट्र राज्य यांनी आयोगासाठी तयार करून दिलेले चिन्ह बोधचिन्ह म्हणून स्वीकारल्याचे घोषित केले. आपल्या वर्तणुकीने व कार्याने ते सार्थ करू असे आपल्या सर्व सहकाऱ्यांच्यावतीने राज्यपाल व मुख्यमंत्री यांना आश्वासन दिले.



दि. १ एप्रिल १९६२ रोजी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या रजत महोत्सवाच्या वेळी मा. मुख्यमंत्र्यांनी आयोगाच्या अध्यक्षांना बोधचिन्ह असलेले चांदीचे तबक भेट दिले. डावीकडून : श्री. यशवंतराव चव्हाण मुख्यमंत्री, श्री. श्रीप्रकाश राज्यपाल ले.ज.(निवृत्त) श्री. एस. पी.पी.थोरात अध्यक्ष, महाराष्ट्र लोकसेवा आयोग.





# “...एमपीएस्सी करतोय!”

**– हेमराज बागुल**
संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय

**राज्यातील लाखो तरुणांच्या भावविश्वात ‘एमपीएससी’ हा शब्द एखाद्या पासवर्डसमान आहे. सहज कुणाला प्रश्न विचारला, ‘काय करतोस?’ तर ‘...एमपीएस्सी करतोय!’ असं उत्तर सध्या सर्वमान्य झालं आहे!**

महाराष्ट्र लोकसेवा आयोग हा जनमानसात पूर्ण नामाभिधानाऐवजी ‘एमपीएससी’ या चार अक्षरांच्या संक्षेपी नावाच्या माध्यमातूनच जास्त परिचित आहे. राज्य लोकसेवा आयोगासारखी एक सांविधानिक संस्था देशातील अन्य कोणत्याही राज्यात इतकी चिरपरिचित नसावी एवढी ती आपल्या महाराष्ट्रातील घराघरात-मनामनात स्थान मिळवून आहे! महाराष्ट्र शासनाच्या प्रशासकीय यंत्रणेस अधिकारी-कर्मचाऱ्यांची निवड करून देणारी संस्था एवढी मर्यादित ओळख एमपीएससीची नाही. तिची प्रतिमा त्यापलीकडे खूप काही वेगळी आणि वैशिष्ट्यपूर्ण अशी आहे.

मुळात महाराष्ट्र हे साक्षरतेच्या बाबतीत अग्रेसर असलेलं शिक्षणप्रधान राज्य. उत्तम नोकरी, मध्यम व्यापार आणि कनिष्ठ शेती या त्रिसूत्रीला ललामभूत मानणाऱ्या आधुनिक महाराष्ट्रात सरकारी चाकरी लाभणं म्हणजेच आयुष्याचं इप्सित साध्य होणं हा समज चांगलाच रुढ आहे. या समजातून निर्माण झालेलं शासकीय सेवेचं

अप्रूप फार मोठं आहे. आणि शासकीय सेवाप्राप्तीचा मार्ग एमपीएससीच्या माध्यमातून जात असल्याने एमपीएससीची परीक्षा जणू साऱ्या आकांक्षांची पूर्ती करणारा अल्लाउद्दीनचा चिराग आहे! हा चिराग प्रत्येक इच्छुक प्राणपणानं घासून आपल्या मनोकामनांची पूर्तता करण्यासाठी धडपडत असतो. त्यामुळे सर्वसामान्यांसाठी अनेक आयोगांपैकी एखादा आयोग म्हणून 'सामान्य नामा'सारखं याचं महत्त्व मर्यादित असलं तरी एमपीएससी परीक्षार्थींसाठी हे 'विशेष नाम', 'क्रियाविशेषण', 'क्रियापद' आणि अगदी 'भाववाचक नाम' म्हणूनही विविध शब्द प्रकारात व्याकरणाच्या पलीकडे जाऊन समाविष्ट होऊ शकतं!

शासकीय सेवेतील अधिकारीपदाची प्राप्ती आणि त्या अनुषंगाने पूर्ण होणाऱ्या विविध आकांक्षा म्हणजेच एमपीएससी परीक्षेतील यश ही मनोभूमिका इथल्या विद्यार्थ्यांच्या मनामनात फिट्ट बसली आहे. राज्यातील लाखो तरुणांच्या भावविश्वात 'एमपीएससी' हा शब्द एखाद्या पासवर्डसमान आहे. सहज कुणाला प्रश्न विचारला, 'काय करतोस?' तर '...एमपीएस्सी करतोय!' असं उत्तर सध्या सर्वमान्य झालं आहे!

स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून शासकीय सेवेत येऊ पाहणाऱ्या तरुणांचा एमपीएससी हा धर्म झाला आहे. काहींसाठी ते ध्येयासक्त मिशन झालं आहे. काहींसाठी तो विश्वास तर काहींसाठी ती श्रद्धा आहे. ही श्रद्धा आणि विश्वास इतका मोठा आहे की वर्षानुवर्षे काही लाख विद्यार्थी प्रचंड निष्ठेनं आयोगाच्या परीक्षांची तयारी करत असतात. एका परीक्षेत अपयश आलं तरी पुढच्या परीक्षेतील यशाची आस बाळगून हतबल न होता प्रचंड चिकाटीनं त्यांची धडपड सुरू असते. या विद्यार्थ्यांसोबतच त्यांची कुटुंबंही एमपीएससी या नावाशी जोडली जातात.

एमपीएससी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी प्रोत्साहनपर वातावरण देण्यासाठी काही शहरांमधील शैक्षणिक संस्था नावारूपाला आल्या आहेत. अशा संस्थांमधील प्रवेशासाठी होणारी धडपड, विविध प्रकाशन संस्थांची पुस्तकं - नियतकालिकं, त्यांच्या विक्रीसाठी प्रसिद्ध असलेली विशिष्ट दुकानं, स्पर्धा परीक्षांसाठी मार्गदर्शन करणारे कोचिंग क्लासेस, काही शहरात भाड्याने दिल्या जाणाऱ्या रूम्स, अशा भागातील खाणावळी, समृद्ध अभ्यासिका, तयारी करणाऱ्या मुलांचे ग्रुप्स या साऱ्यांच्या समावेशातून एमपीएससी परीक्षा हा केंद्रबिंदू असणारं एक वेगळंच वैशिष्ट्यपूर्ण वर्तुळ तयार झालं आहे. या वर्तुळाच्या परिघात केवळ विद्यार्थीच नव्हे तर त्यांच्याशी जोडले गेलेले खूप सारे आनुषंगिक घटकही समाविष्ट झालेले आहेत.

'एमपीएससी'च्या भरवशावर लाखो विद्यार्थी आयुष्याचा डाव मांडून बसलेली असतात. ही त्यांची अगतिकता नाही तर हा आयोगाच्या पारदर्शक कार्यपद्धतीवरचा अतूट असा विश्वास आहे. 'आपण प्रामाणिकपणे प्रयत्न केले म्हणजे यश मिळेलच,' या विश्वासातूनच त्यांची ही अविरत धडपड सुरू असते. राज्यातील गेल्या तीन पिढ्या लोकसेवा आयोगाच्या माध्यमातून होणाऱ्या नोकरभरतीच्या साक्षीदार असल्या तरी विशेषत: गेल्या पंचवीस-तीस वर्षांत एमपीएससी जनमानसात अधिकच रुजली आहे. तिच्याशी वेगवेगळ्या पद्धतीने जोडल्या गेलेल्या जनतेची संख्या वाढती आहे. अलिकडच्या काळात खासगी क्षेत्रातला रोजगार आणि संधी मोठ्या प्रमाणावर उपलब्ध होत असल्या तरी आयोगाच्या माध्यमातून शासकीय सेवेत अधिकारी पदावर दाखल होण्याची महत्त्वाकांक्षा वाढती आहे. या महत्त्वाकांक्षेचं सकारात्मक संगोपन होण्यात लोकसेवा आयोगाचं योगदान मोठं आहे. 'आपल्या बुद्धिमत्तेला आयोगाच्या माध्यमातूनच न्याय मिळू शकेल,' हा विश्वास मोठा आहे.

लोकसेवा आयोग महाराष्ट्राच्या विकासाशी अप्रत्यक्षपणे मोठ्या प्रमाणावर जुळला आहे. आयोगाच्या पारदर्शक आणि गुणात्मक कार्यपद्धतीमुळे महाराष्ट्राचा राज्यशकट चालवण्यासाठी लागणारं अतिशय योग्य आणि पात्र असं मनुष्यबळ पुरवलं गेलं आहे. महाराष्ट्र हे देशातील एक आघाडीचं राज्य आहे. त्याचं अग्रेसरत्व आणि प्रागतिकता जोपासण्यात प्रशासनानं दिलेलं योगदान अजोड असंच आहे. आणि अर्थातच हे श्रेय सर्वस्वी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचंच आहे! ■




GOVERNMENT OF MAHARASHTRA
Historical Record
1937-1962
HISTORICAL
RECORD
1962-72
ऐतिहासिक
अभिलेख
HISTORIC
RECORD
1972–87


# महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे
# ऐतिहासिक अभिलेख




# अभिलेख १९३७-१९६२

१९३७ ते १९६२ या पहिल्या पंचवीस वर्षाच्या कालावधीतील ऐतिहासिक घडामोडींचा आढावा घेऊन मा. अध्यक्ष एस.पी. पी. थोरात यांच्या कारकिर्दीमध्ये महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचा ऐतिहासिक अभिलेख भाग-१ दिनांक ७ जून १९६६ रोजी प्रसिद्ध करण्यात आला. त्यात पुढील मुद्दे होते.

- वशिला लावण्यास प्रतिबंध
- आयोगाचा सल्ला स्वीकारण्याबाबत
- निवड सूची तयार करण्याबाबत
- परीक्षोत्तर कार्यपद्धतीत सुधारणा
- काळी यादी ठेवणे
- वार्षिक अहवाल
- बृहन्मुंबई महानगरपालिकेची पदे आयोगाच्या कार्यकक्षेत घेण्याबाबत
- आयोगाच्या कामाचे वाटप
- उपलब्ध पद संख्येच्या तुलनेतच शिफारस
- गुणवत्ता क्रमांकानुसार ज्येष्ठता



## वशिला लावण्यास प्रतिबंध

आयोगाच्या पहिल्या काही कार्यवाहीपैकी एक म्हणजे अगदी पहिल्या बैठकीत आयोगाने प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष वशिला लावण्याचा प्रयत्न करणाऱ्या उमेदवारास अपात्र ठरविण्याचा निर्णय घेतला. त्यास वृत्तपत्रातून पुरेशी प्रसिद्धीही देण्यात आली व दहा उमेदवारांना सदर निर्णयाच्या आधारे अपात्रही ठरवण्यात आले. ही उपाययोजना परिणामकारक ठरून एका चांगल्या परंपरेस सुरुवात झाली.



## आयोगाचा सल्ला स्वीकारण्याबाबत

आयोगाने दिलेला सल्ला शासनाने सर्वसाधारणपणे स्वीकारलाच पाहिजे अशी सुरुवातीपासून प्रथा होती. शासकीय विभागांनी आयोगाशी करावयाच्या व्यवहारासंबंधी सूचनांमध्ये सदर सूचना होती. ती सुधारित करून आयोगाचा सल्ला स्वीकारता येत नसेल तर त्याच्या कारणमीमांसेसह ती बाब शासनापुढे ठेवली पाहिजे अशी सूचना समाविष्ट करण्यात आली.



## निवड सूची तयार करण्याबाबत


आयोगाचा सल्ला घेण्याच्या कार्यवाहीमध्ये होणारा विलंब टाळण्यासाठी व शासनाला कमी कालावधीसाठी अस्थाई नेमणुका करणे सुलभ होण्यासाठी भविष्यात रिक्त होणारी पदे विचारात घेऊन आगाऊ निवड सूची तयार करण्यात यावी अशी सूचना आयोगाने केली व शासनाने ती मान्य केली.

## परीक्षोत्तर कार्यपद्धतीत सुधारणा

विभागीय परीक्षांना बसलेल्या उमेदवारांकडून




संबंधित परीक्षकांकडे वशिला लावण्याचा प्रयत्न होत असल्याची जाणीव झाल्यामुळे आयोगाने परीक्षकांकडे उत्तरपत्रिका पाठवण्याच्या पद्धतीमध्ये सुधारणा केली. उत्तरपत्रिकेतील उमेदवाराचे नाव व बैठक क्रमांक असलेला भाग काढून व सांकेतांक टाकून उत्तर पत्रिका परीक्षकांकडे पाठवण्यास सुरुवात झाली. तद्नंतर ही पद्धत स्पर्धा परीक्षांच्या बाबतही अवलंबण्यात आली. या उपाययोजनेचा चांगला परिणाम दिसून आला.



## काळी यादी ठेवणे

अर्जात खोटी माहिती देणे, वशिला लावण्याचा प्रयत्न करणे असे गैरप्रकार करणाऱ्या उमेदवारांना, जरी ते शासन सेवेत नसले तरी, काळ्या यादीत टाकण्याचे व शासन सेवेसाठी त्यांना अयोग्य ठरवण्याचा आयोगाने निर्णय घेतला. उमेदवार शासन सेवेत असल्यास विभागीय कार्यवाही करण्याचे प्रस्तावित केले. शासनाने सदर बाब मान्य करून आयोगाने काळ्या यादीत टाकलेल्या उमेदवारांना शासन सेवेकरिता अयोग्य ठरविले.




## वार्षिक अहवाल

आयोगाच्या कामकाजाचा वार्षिक अहवाल आयोगाने राज्यपालांकडे सादर करावा व जेथे आयोगाचा सल्ला स्वीकारण्यात आला नसेल तेथे कारण मीमांसा नमूद करून सदर अहवाल विधिमंडळात सादर करण्यात यावा अशी संविधानात तरतूद करण्यात आली.



## बृहन्मुंबई महानगरपालिकेची पदे आयोगाच्या कार्यकक्षेत घेण्याबाबत

मासिक किमान वेतन रु. ३०० किंवा अधिक असलेल्या पदावरील नेमणुकांबाबत कायदा पारित करून ही पदे आयोगाच्या कार्यकक्षेत आली. प्रत्येक स्वतंत्र पदाकरता रु. १५० सेवाशुल्क व जाहिरातीचा प्रत्यक्ष खर्च महानगरपालिकेने द्यावा असे निश्चित झाले.



## आयोगाच्या कामकाजाचे वाटप

प्रारंभी आयोगापुढे येणारे सर्वच काम संपूर्ण आयोग बघत असे. परंतु कामातील सातत्याने झालेली वाढ, त्यामुळे आयोगाच्या सदस्यांवर पडणारा जादा ताण व परिणामी कार्यवाहीस विलंब इत्यादी बाबी विचारात घेऊन निरनिराळ्या कामांकरिता निरनिराळ्या समित्या नेमून त्यायोगे जलद काम करण्याचे आयोगाने ठरविले. समितीच्या निर्णयावर संपूर्ण आयोगाने मान्यता दिल्यावरच कार्यवाही करण्यात यावी असेही ठरले. या नवीन पद्धतीमुळे सामूहिक सल्ला देण्याच्या पद्धतीला बाधा न येता कामाची गती वाढली.



## उपलब्ध पदसंख्येच्या तुलनेत शिफारस

पूर्वी, प्रत्यक्ष उपलब्ध पदसंख्येपेक्षा जास्त उमेदवारांची शिफारस करण्याची मागणी शासकीय विभागांकडून होत असे. या पद्धतीमुळे या ना त्या प्रकारे आयोगाचा सल्ला शासन विभागांकडून अस्वीकृत होण्याची शक्यता वाढत असे. आयोगाच्या अध्यक्षांच्या बैठकीत यावर ऊहापोह

होऊन, प्रत्यक्ष जेवढी पदे उपलब्ध असतील तेवढीच शासन विभागाने मागणी करावी व आयोगानेही त्याप्रमाणेच उमेदवारांची शिफारस करावी असा ठराव झाला. यावर शासनाशी एका प्रकरणी पत्रव्यवहार झाला तरी शेवटी काळाच्या ओघात हे तत्त्व मान्य झाले व अशाप्रकारे एकदा आयोगाने शिफारस केली की नियुक्ती प्राधिकाऱ्यास तुलना करण्यास वाव राहिला नाही व तसेच विशेष कारण असल्याशिवाय, नियुक्ती अधिकाऱ्यांच्या मर्जीनुसार आयोगाचा सल्ला अस्वीकृत होईनासा झाला.


## आयोगाने शिफारस केलेल्या उमेदवारास तत्काळ नियुक्ती देण्याबाबत

आयोगाने शिफारस केलेल्या उमेदवारास शिफारस पत्र मिळाल्याच्या तारखेपासून १५ दिवसांच्या आत नियुक्ती द्यावी आणि त्याकरिता गरज भासल्यास वैद्यकीय व पोलीस तपासणी तार अथवा दूरध्वनीद्वारे करावी, असे शासनाने परिपत्रक काढले. पोलीस व वैद्यकीय तपासणी तसेच उच्च प्रारंभ वेतनाची मागणी इ.बाबी एकाच वेळी तपासण्यास सुरुवात करावी अशी सूचनाही पुढे समाविष्ट करण्यात आली.

## गुणवत्ता क्रमांकानुसार ज्येष्ठता

विशिष्ट मुदतीत रुजू होणाऱ्या उमेदवारांची ज्येष्ठता आयोगाने कळविलेल्या पसंतीक्रमानुसार (गुणवत्ताक्रमानुसार) व मुदतीनंतर रुजू होणाऱ्यांची ज्येष्ठता त्यांच्या नियुक्तीच्या दिनांकापासून निश्चित केली जाईल, असे परिपत्रक शासनाने पारित केले. विशिष्ट कारणासाठी मुदत वाढवून घेण्याची विनंती मान्य झाल्यास उमेदवारांकरिता वरील नियम शिथिल करण्याची तरतूदही त्या परिपत्रकात करण्यात आली.






# अभिलेख
## १९६२-१९७२

१९६२ ते १९७२ या कालावधीतील घडामोडींचा आढावा घेऊन, माननीय अध्यक्ष डॉ. डी.वाय.गोहोकर यांच्या कारकिर्दीमध्ये महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचा ऐतिहासिक अभिलेख दिनांक ८ मार्च १९७३ रोजी प्रसिद्ध करण्यात आला. त्यात पुढील मुद्दे होते.

- आयोगाच्या परीक्षांसाठी माझगाव येथील विक्रीकर भवनाच्या इमारतीतील जागा उपलब्ध करणे
- महाराष्ट्र विद्युत पुरवठा व परिवहन उपक्रमातील पदे आयोगाच्या कार्यकक्षेत घेण्याबाबत,
- आयोगाच्या शिफारशींवर कार्यवाही करण्यासाठीचा कालावधी,
- आयोगाच्या परीक्षेमध्ये उमेदवारांना मराठीतून उत्तरे लिहिण्याची मुभा देण्यास सुरुवात,
- आयोगाच्या सचिवांना विभाग प्रमुखाचा दर्जा,
- आयोगाच्या कार्यपद्धतीचे नियम करण्यासाठी आयोग सक्षम असल्याचे शासनास कळवून पूर्वीचे नियम रद्द करण्यात आले.
- स्पर्धा परीक्षेप्रमाणेच सरळ सेवेतील पदांसाठी अर्ज करताना अर्जासोबत छायाचित्र लावणे अनिवार्य करण्यात आले.

### मराठीचा वापर

इ.स. १९६५ मधील परीक्षांपासून उमेदवारांना मराठीतूनही उत्तरे लिहिण्याची मुभा देण्यात आली.

### आयोगाच्या आस्थापनेवर 'परीक्षा नियंत्रक' या राजपत्रित पदाची निर्मिती

ऑक्टोबर १९७० मध्ये आयोगाच्या आस्थापनेवर परीक्षा नियंत्रक (नंतर उपसचिव व परीक्षा नियंत्रक) हे एक राजपत्रित दर्जाचे पद निर्माण केले.

### आयोगाच्या सचिवांना विभाग प्रमुखांचा दर्जा


मार्च १९७१ पासून आयोगाच्या सचिवांना विभाग प्रमुखांचा दर्जा देण्यात आला.

### धोरणात्मक बदल

आयोगाच्या कार्यपद्धतीचे नियम करण्यासाठी आयोग सक्षम असल्याने तसे कळवून पूर्वीचे नियम रद्द करण्याबाबत शासनास कळविले. त्यानुसार शासनाने पूर्वीचे नियम रद्द केले.

### सरळ सेवेतील पदांसाठी अर्ज करताना अर्जासोबत छायाचित्र जोडणे

पूर्वीच्या पद्धतीप्रमाणे स्पर्धा परीक्षेसाठी अर्ज करताना अर्जासोबत स्वतःचे छायाचित्र लावणे आवश्यक होते. परंतु मुलाखतीद्वारे निवडीकरिता अर्जासोबत छायाचित्राची आवश्यकता नव्हती. दोन्ही प्रकरणात नियुक्तीकरिता शिफारस करताना उमेदवारांचे अर्ज संबंधित प्राधिकाऱ्यांकडे न पाठविता आयोगाच्या कार्यालयात ठेवण्यात येत असत. या पद्धतीमुळे नियुक्ती प्राधिकाऱ्यांना उमेदवारांच्या नियुक्तीच्या वेळी उमेदवारांची ओळख पटविणे शक्य नव्हते. सप्टेंबर १९७१ मध्ये नवीन पद्धती सुरू करण्यात आली. त्यानुसार मुलाखतीद्वारे निवडीकरिता अर्ज करताना अर्जासोबत पासपोर्ट आकाराची २ छायाचित्रे जोडणे आवश्यक ठरविण्यात आले. तसेच नियुक्तीकरिता उमेदवारांची शिफारस करताना शिफारस करण्यात आलेल्या सर्व उमेदवारांचे अर्ज शिफारसपत्रासोबत नियुक्ती प्राधिकाऱ्यांकडे पाठविण्यात येऊ लागले.



अभिलेख १९३७ ते १९६२

# अभिलेख १९७२-१९८७

१९७२ ते १९८७ या कालावधीतील घडामोडींचा आढावा घेऊन, माननीय अध्यक्ष श्रीम. सुमती पाटील यांच्या कारकिर्दीमध्ये महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचा ऐतिहासिक अभिलेख दिनांक ५ मे १९९० रोजी प्रसिद्ध करण्यात आला. त्यात पुढील बाबी होत्याः

- महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे अध्यक्ष व सदस्यांचे सेवानिवृत्तीचे वय ६२ वर्षांपर्यंत वाढवण्यात आले.
- मुलाखतीसाठी निवड झालेल्या उमेदवारांना त्यांची नियुक्तीसाठी शिफारस झाली किंवा नाही हे कळवण्याची प्रथा अमलात आली.
- आयोगातर्फे घेण्यात येणाऱ्या स्पर्धा परीक्षांसाठी उमेदवारांची संख्या वाढल्याने पारंपरिक पद्धतीऐवजी वस्तुनिष्ठ स्वरूपाच्या परीक्षा घेण्यास सुरुवात.
- महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे घेण्यात येणाऱ्या परीक्षांचे शुल्क कोर्ट फी स्टॅम्प स्वरूपात स्वीकारण्यास सुरुवात.
- उमेदवारांची वाढती संख्या विचारात घेऊन अर्जाचा नमुना जाहिरातीत प्रसिद्ध करण्यास सुरुवात.
- आयोगातर्फे घेण्यात येणाऱ्या परीक्षांचे काम संगणकावर करण्यास सुरुवात.
- आयोगाच्या परीक्षांसाठी अर्ज केलेल्या सर्व उमेदवारांना त्यांची पात्रता नंतर तपासण्याच्या अधीन राहून परीक्षेस प्रवेश देणे सुरू.
- संघ लोकसेवा आयोगाच्या धर्तीवर राज्यसेवा परीक्षांसाठी चाळणी (पूर्व) परीक्षा सुरू.
- आयोगाच्या कार्यालयातील कामाचे स्वरूप विचारात घेऊन परीक्षा विभाग, सरळ सेवा प्रवेश विभाग आणि नियुक्ती विभाग असे तीन विभाग करण्यात आले.

### शिफारस न झालेल्या उमेदवारांना कळविण्याबाबत

१९७६ पर्यंत आयोगाकडे अर्ज करणाऱ्या उमेदवारांना मुलाखतीकरिता निवड झाली किंवा नाही हे पत्राने कळविण्यात येत असे. परंतु ज्यांची मुलाखत झाली आहे, अशांना अंतिम निवड झाली किंवा नाही ते कळविण्यात येत नसे. या पद्धतीचे पुनर्विलोकन करण्यात आले व दि.१.१.७७ पासून नियुक्तीकरिता शिफारस झाली किंवा नाही हे उमेदवारांना कळविण्याची प्रथा आयोगाने अमलात आणली.

### स्पर्धा परीक्षा पारंपरिकऐवजी वस्तुनिष्ठ स्वरूपाच्या घेण्याबाबत

आयोगातर्फे घेण्यात येणाऱ्या स्पर्धा परीक्षांसाठी

उमेदवारांची संख्या वाढल्याने पारंपरिक पद्धतीऐवजी वस्तुनिष्ठ परीक्षा घेण्यास सुरुवात झाली.

### आयोगातर्फे घेण्यात येणाऱ्या परीक्षांचे शुल्क कोर्ट फी स्टॅम्प स्वरूपात घेण्याबाबत

आयोगाकडून अर्जासोबत भारतीय पोस्टल ऑर्डरच्या स्वरूपात शुल्क स्वीकारण्यात येत असे. परंतु उमेदवारांची संख्या वाढत गेली, त्यामुळे या पद्धतीत सुधारणा करून सोपी सुटसुटीत अशी कोर्ट फी स्टॅम्पची पद्धत सुरू केली.

### अर्जाचा नमुना जाहिरातीत प्रसिद्ध करण्याबाबत

जाहिरातीस अनुसरून अर्ज करणाऱ्या उमेदवारांची वाढीव संख्या विचारात घेऊन अर्जाचा नमुना जाहिरातीत प्रसिद्ध करण्याची पद्धत सुरू करण्यात आली.

### परीक्षेच्या कामाचे संगणकीकरण

आयोगातर्फे घेण्यात येणाऱ्या परीक्षांचे काम बाहेरील संस्थांच्या मदतीने संगणकावर करण्यास सुरुवात केली.

### परीक्षेस तात्पुरता प्रवेश

उमेदवारांची वाढती संख्या विचारात घेऊन सर्व उमेदवारांची पात्रता तपासण्याऐवजी ज्यांचे अर्ज परिपूर्ण आहेत अशा उमेदवारांनाच पात्रतेनंतर तपासण्याच्या अटीच्या अधीन राहून परीक्षेस प्रवेश देणे सुरू केले.

### आयोगाच्या कार्यालयातील उपविभाग


आयोगाच्या कार्यालयातील कामाचे स्वरूप विचारात घेऊन कार्यालयाचे तीन विभाग करण्यात आले.

(१) परीक्षा विभाग

(२) सरळ सेवा प्रवेश विभाग

(३) नियुक्ती विभाग





अभिलेख १९८७ ते १९९९

# अभिलेख १९८७-९९

१९८७ ते १९९९ या कालावधीतील घडामोडींचा आढावा घेऊन माननीय अध्यक्ष श्री.बी.बी.शिंदे यांच्या कारकिर्दीमध्ये महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचा ऐतिहासिक अभिलेख दिनांक १२ जुलै १९९९ रोजी प्रसिद्ध करण्यात आला. त्यात पुढील बाबी होत्याः


- स्पर्धा परीक्षेसाठी जाहिरातीत अर्जाचा नमुना देण्यास सुरुवात.
- वस्तुनिष्ठ स्वरूपाच्या परीक्षेसाठी प्रश्नांचे पुनर्विलोकन व प्रश्नपेढीचे समृद्धीकरण आणि संगणकीकरण.
- अस्थाई नियुक्त्या पुढे चालू ठेवण्याच्या सर्व प्रस्तावांना मान्यता नाकारण्यात आली.
- अस्थाई नियुक्तीद्वारे संबंधितांची झालेली प्रदीर्घ सेवा लक्षात घेऊन मानवतेच्या दृष्टिकोनातून काही संवर्गातील अधिकाऱ्यांच्या नेमणुका नियमित करण्यासाठी समावेशन परीक्षा घेण्यात आली.
- विधी कक्षाची स्थापना झाली.
- सर्व सेवा प्रवेश प्रवेशाच्या ज्या प्रकरणी मुलाखतीसाठी उमेदवारांची संख्या सीमित करण्यासाठी लावण्यात आलेले निकष उमेदवारांना कळविण्यास सुरुवात.
- आयोगाच्या कार्यालयातील संगणक यंत्रणेची उभारणी.
- वस्तुनिष्ठ स्वरूपाच्या प्रश्नपुस्तिका परीक्षेनंतर उमेदवारांना देण्यास सुरुवात.
- आयोगाच्या परीक्षांच्या प्रश्न पुस्तिकांची छपाई शासकीय मध्यवर्ती मुद्रणालयाकडून करण्याऐवजी खासगी मुद्रणालयाकडून करून घेण्यास सुरुवात.
- आयोगातर्फे घेतल्या जाणाऱ्या परीक्षांमध्ये गैरकृत्य करणाऱ्या कर्मचारी/ व्यक्तींविरुद्ध 'महाराष्ट्र प्रिव्हेन्शन ऑफ माल प्रॅक्टिसेस अ‍ॅक्ट युनिव्हर्सिटी बोर्ड अँड अदर स्पेसिफाईड एक्झामिनेशन १९८२' आयोगाच्या परीक्षांसाठी लागू करण्यात आला.
- आयोगाशी पत्रव्यवहार करताना शासनाने घ्यावयाच्या दक्षतेबाबत.

### वस्तुनिष्ठ स्वरूपाच्या परीक्षेसाठी प्रश्नपेढीतील प्रश्नांचे पुनर्विलोकन व प्रश्नपेढीचे समृद्धीकरण, प्राश्निक सूची, परीक्षोत्तर माहितीचे विश्लेषण

प्रश्नपेढी समृद्ध करण्यासाठी विविध विषयांचे आवश्यक तितके वस्तुनिष्ठ प्रश्न मागविण्यात आले.

प्राश्निकांनी तसेच उमेदवारांनी केलेल्या अभ्यासपूर्ण तक्रारी विचारात घेतल्यानंतर आयोगास त्यांच्या प्रश्नपेढीतील वस्तुनिष्ठ प्रश्नांमध्ये काही दोष व त्रुटी आढळून आल्या. त्या अनुषंगाने केलेल्या विश्लेषणावरून काही प्रश्नांमध्ये दोष व त्रुटी आहेत या गोष्टीस दुजोरा मिळाला.

यामुळे प्रश्नपेढीतील प्रश्नांचे व दरवर्षी नव्याने येणाऱ्या प्रश्नांचे पुनर्विलोकन करण्याची निकड निर्माण झाली. यास्तव प्रश्नपेढीतील सर्व प्रश्नांचे पुनर्विलोकन करण्याबाबत सन १९८८-८९ पासून ठरले. ह्या निर्णयाच्या अनुषंगाने सदर काम दरवर्षी टप्प्याटप्प्याने पार पाडण्यात आले.
सन १९८७ पासून पूर्वीच्या प्रश्न विश्लेषण पद्धतीमध्ये सुधारणा करून एक अद्ययावत पद्धत सुरू करण्यात आली. १९८७-८८ या वर्षांत निरनिराळ्या विषयतज्ज्ञांचा दर्जा व अनुभव याआधारे अद्ययावत नवीन प्राश्निक सूची तयार करण्यात आली. तसेच १९८७ - ८८ या वर्षापासून प्रत्येक स्पर्धा/ चाळणी परीक्षेच्या परीक्षोत्तर माहितीचे विश्लेषण करण्याची पद्धत सुरू करण्यात आली.



## विधि कक्षाची स्थापना

आयोगाच्या स्पर्धा परीक्षांच्या तसेच आयोगामार्फत सरळ सेवा प्रवेशाने भरती करावयाच्या उमेदवारांच्या संख्येत लक्षणीय वाढ झाली. स्पर्धा परीक्षा तसेच सरळ सेवा प्रवेशासाठी अर्ज केलेले उमेदवार कोणत्या ना कोणत्या कारणास्तव न्यायालयात याचिका दाखल करत. न्यायालयीन प्रकरणांत दिवसेंदिवस वाढ होत असल्यामुळे आयोगाच्या कार्यालयात 'विधि कक्ष' निर्माण करण्यात यावा व त्यात विधि अधिकारी या पदावर कक्ष अधिकाऱ्यांच्या दर्जाचे दोन विधि अधिकारी व कायद्याची पदवी धारण करणारे दोन सहायक व दोन लिपिक यांचा समावेश असावा असा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आला.
शासनाने क्र.म.लो.आ.१०९३/९३७/प्र.क्र.३०/ ९३/आठ, दि. ४.८.९४ च्या शासन निर्णयानुसार अतिरिक्त पदे तत्काळ निर्माण करण्यास मान्यता दिली. त्यानुसार आयोगाने क्र. ७/१९९४, दि. १४.१०.९४ च्या कार्यालयीन आदेशान्वये विधि कक्ष निर्माण केला व त्यामध्ये एक कक्ष अधिकारी, एक सहायक, एक लिपिक व एक उच्च श्रेणी लघुलेखक (इंग्रजी) यांच्या नेमणुका करण्यात आल्या.



## उमेदवारांना निकष कळविणे

सरळ सेवा प्रवेश प्रकरणी उपलब्ध पदसंख्येच्या तुलनेने प्रथमदर्शनी अर्हताप्राप्त उमेदवार मोठ्या प्रमाणात उपलब्ध असल्यास मुलाखतीसाठी बोलाविण्यास उमेदवारांची संख्या मर्यादित करण्यासाठी विहित शैक्षणिक अर्हता व अनुभव याच्या आधारे निकष ठरविला जातो.
या निकषांच्या आधारे मुलाखतीस बोलाविण्यास अपात्र उमेदवारांना मुलाखतीस का बोलाविले नाही याची कल्पना येत नसे. तसेच उमेदवारांना मुलाखतपत्रे/ना-निवडपत्रे पाठविताना निकष काय आहे याची कल्पना नसल्याने त्यांना अनुभवाचे योग्य व सुस्पष्ट प्रमाणपत्र सादर करण्यात अडचणी येतात हे निदर्शनास आल्याने आयोगाच्या दि.८.९.९६ च्या आदेशान्वये उमेदवारांना पत्रासोबत निकषाची प्रत पाठविण्यास सुरुवात झाली.



## आयोगाच्या कार्यालयासाठी संगणक यंत्रणेची उभारणी

उमेदवाराची निवड करण्याकरता आयोगाकडून मोठ्या प्रमाणावर स्पर्धा परीक्षा व चाळणी परीक्षा घेण्यात येतात. या परीक्षांना बसणाऱ्या उमेदवारांची संख्या प्रतिवर्षी वाढत असल्याने, परीक्षांचे निकाल विहित वेळात लावणे आयोगास जड जात होते. यावर मात करण्यासाठी बहुतेक परीक्षांचे स्वरूप बहुपर्यायी प्रश्नपद्धती करण्यात आले. तसेच १९८२ सालापासून परीक्षा- पूर्व व परीक्षोत्तर कामे संगणकावर करावयाचे ठरविले.
सुरुवातीला माध्यमिक शालांत परीक्षा मंडळ, पुणे, यांची तद्नंतर राज्य शासनाच्या अर्थ व सांख्यिकी संचालनालयाची मदत घेण्याचा प्रयत्न केला. परंतु आयोगाच्या परीक्षांचे मोठ्या प्रमाणावरील डाटावर्क विचारात घेता व डाटावर्कच्या नोंदणीसाठी मनुष्यबळाची मर्यादा असल्याने या दोन्ही संस्थांनी हे काम पार पाडण्यास असमर्थता कळविली.
त्यामुळे आयोगाने परीक्षांचे संगणक संस्करणाचे

काम खासगी संस्थांकडून करून घेण्याचे ठरवले. तथापि, अचूकता आणि गोपनीयता यामध्ये कोणतीही तडजोड न करता परीक्षांच्या कामाच्या नियोजित वेळापत्रकानुसार परीक्षांच्या संगणक संस्करणाचे काम खासगी संगणक संस्थांकडून करून घेणे कठीण झाले. आयोगाच्या प्रतिष्ठित समजल्या जाणाऱ्या व संवेदनाक्षम परीक्षांपैकी एका परीक्षेच्या प्रकरणी निकाल तयार करण्यात एका खासगी संस्थेकडून गंभीर चूक झाल्याने आयोगास तो निकाल सुधारित करावा लागला. परिणामी, आयोगास न्यायालयीन प्रकरणे व वृत्तपत्रीय टीकेस तोंड द्यावे लागल्याने आयोगाची परिस्थिती मोठी अवघड झाली होती.




या गोष्टीचा गंभीरपणे विचार करून आयोगाच्या कार्यालयात स्वतःची संगणक यंत्रणा उभारण्याचे काम विनाविलंब करण्याचे आयोगाने ठरविले. त्यासाठी आवश्यक असलेल्या निधीकरिता १९९३ मध्ये शासनाकडे आयोगाने प्रस्ताव पाठविला. शासनाने एकूण ३२.८३ लाखांचा निधी १९९४-९५ १९९५-९६ व १९९६-९७ या तीन टप्प्यांमध्ये खर्च करण्यासाठी उपलब्ध करून दिला. आयोगाने राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र (प.वि.) पुणे, यांच्या तांत्रिक सल्ल्यानुसार आवश्यक यंत्रसामुग्री व आवश्यक सॉफ्टवेअर्स खरेदी केली. तेव्हापासून संगणक यंत्रणेचा वापर आयोगाच्या परीक्षांच्या कामासाठी केला जात आहे. त्याची व्याप्ती वाढवून आयोगाच्या कार्यालयातील सरळसेवा विभाग, नियुक्ती विभाग, सेवाप्रवेश नियम विभाग, लेखा विभाग इत्यादी विभागांसाठीही संगणक यंत्रणेचा उपयोग करण्याचे आयोगाने ठरविले आहे. त्यामुळे आयोगाच्या कार्यालयातील कामकाजामधील विलंब कमी होऊन कामाची गती वाढेल.



## वस्तुनिष्ठ स्वरूपाच्या प्रश्नपुस्तिका उमेदवारांना देण्यासंबंधी

आयोगाकडून घेण्यात येणाऱ्या स्पर्धा परीक्षा अथवा चाळणी परीक्षांच्या प्रश्नपत्रिका वस्तुनिष्ठ स्वरूपाच्या असतात. अशा प्रश्नपुस्तिका गोपनीय ठरविण्यात आल्या असल्याने परीक्षा झाल्यावर त्या उमेदवारांकडून परत घेण्यात येत असत. या पद्धतीप्रमाणे प्रश्नपुस्तिका आयोगाच्या कार्यालयात आणण्यासाठीचा वाहन खर्च व त्याची मोजणी यावर मोठ्या प्रमाणावर होणारा खर्च तसेच सदरहू पद्धत अवलंबूनही आयोगाचा उद्देश साध्य होत नाही असा अनुभव आल्याने आयोगाच्या ज्या परीक्षांसाठी वस्तुनिष्ठ स्वरूपाच्या प्रश्नपत्रिका उमेदवारांना देण्यात येतात, त्या उमेदवारांकडून परत न घेता संघ लोकसेवा आयोगाच्या पद्धतीनुसार उमेदवारांना घेऊन जाण्यास परवानगी देण्यात यावी असा आयोगाने निर्णय घेतला. या सुधारित पद्धतीच्या अनुषंगाने उमेदवारांना देण्यात येणाऱ्या सूचनांमध्ये आवश्यक त्या सुधारणा करण्यात आल्या.



## प्रश्नपत्रिका छपाई

स्पर्धा परीक्षा घेण्यास सुरुवात केल्यापासून आयोगाकडून विविध स्पर्धा परीक्षांच्या प्रश्नपत्रिका शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, चर्नी रोड येथून छापून घेण्यात येत होत्या.

परंतु जिल्हा केंद्रावर पेपरफुटीबाबत आयोगाकडे उमेदवारांच्या तक्रारी आल्या. १९९५ मध्ये घेण्यात आलेल्या सहायक/ विक्रीकर निरीक्षक/ पोलीस उपनिरीक्षक परीक्षा - १९९५ मध्ये प्रश्नपत्रिका फुटी प्रकरणी पोलीस विभागाने केलेल्या चौकशीमध्ये त्या परीक्षेच्या आधी काही प्रश्नपत्रिका मिळाल्याचे व त्या प्रकरणात शासकीय मुद्रणालयातील काही कर्मचाऱ्यांचा सहभाग असल्याचे पोलिसांना आढळून आले. त्यामुळे आयोगाला ती परीक्षा रद्द करावी लागली.

१९९५ पासून आयोगाने पुढील सर्व स्पर्धा परीक्षा व चाळणी परीक्षांच्या प्रश्नपत्रिका खासगी मुद्रणालयाकडून छापून घेण्याचा निर्णय घेतला.

त्यासाठी सर्वंकष चौकशी करून प्रश्नपत्रिका

छपाईबाबतची सर्व कार्यवाही निश्चित करून ती कार्यवाही पूर्ण करण्याची जबाबदारी उप सचिव व परीक्षा नियंत्रक यांच्यावर सोपविली. तेव्हापासून घेण्यात आलेल्या परीक्षांच्या प्रश्नपत्रिका छपाईचे काम उप सचिव व परीक्षा नियंत्रक यांच्या नियंत्रणाखाली पूर्ण करण्यात येत आहे.

प्रश्नपत्रिकांच्या छपाईसोबतच प्रश्नपत्रिकांची सीलबंद पाकिटे सीलबंद लोखंडी पेट्यांमध्ये आयोगाच्या कार्यालयात पोलीस बंदोबस्तात ठेवण्यात येतात व जिल्हा केंद्रावरील प्रश्नपत्रिकांची सीलबंद पाकिटे उपकेंद्रनिहाय सीलबंद लोखंडी पेट्यांतून आयोगाच्या कर्मचाऱ्यांमार्फत/ अधिकाऱ्यांमार्फत जिल्हा केंद्रावर पाठवून त्या जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकाऱ्यांच्या समक्ष जिल्हा कोषागार अधिकारी यांच्या ताब्यात देण्यात येतात. त्या लोखंडी पेट्या परीक्षेच्या दिवसापर्यंत जिल्हा कोषागारात ठेवण्यात येतात. मुंबई केंद्रावरील प्रश्नपत्रिकांच्या सीलबंद पेट्या आयोगाच्या कार्यालयातील स्ट्राँग रूममध्ये दिवस-रात्र पोलीस बंदोबस्तात ठेवण्यात येतात. या सीलबंद लोखंडी पेट्या परीक्षेच्या दिवशी सकाळी आयोगाच्या अधिकाऱ्यांमार्फत मुंबईतील परीक्षा केंद्रांवर पोहोचविण्यात येतात. प्रश्नपत्रिकांच्या छपाई तसेच प्रश्नपत्रिकांच्या पेट्या जिल्हाकेंद्रावर पोहोचविण्याच्या सुधारित कार्यपद्धतीमध्ये प्रश्नपत्रिका फुटीच्या गैरप्रकारांना संपूर्णपणे आळा घालण्यात आयोगाला यश आले आहे.

## गैरकृत्यांना आळा घालण्यासाठी नियम

आयोगातर्फे घेतल्या जाणाऱ्या परीक्षांमध्ये गैरकृत्ये करणाऱ्या कर्मचारी/ व्यक्तीविरुद्ध कारवाई करण्यासाठी निश्चित स्वरूपाचा कायदा किंवा अधिनियम अस्तित्वात नसल्याने आयोगाला त्यांच्याविरुद्ध कायदेशीर कारवाई करताना अडचणी येत होत्या. ही बाब लक्षात घेता परीक्षेमधील गैरकृत्यांना आळा घालण्यासाठी निश्चित स्वरूपाचा कायदा किंवा अधिनियम अस्तित्वात असणे याबाबतची निकड लक्षात घेऊन 'महाराष्ट्र प्रिव्हेन्शन ऑफ माल प्रॅक्टिसेस ॲक्ट युनिव्हर्सिटी बोर्ड अँन्ड अदर स्पेसिफाईड एक्झामिनेशन्स ॲक्ट, १९८२' या अधिनियमाची व्याप्ती वाढवून तो आयोगाच्या परीक्षांसाठी लागू करावा असा प्रस्ताव आयोगाने शासनास सादर केला. त्यानुसार सदर अधिनियमाच्या कलम २ खंड (ब) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये महाराष्ट्र शासनाने दिनांक २६ फेब्रुवारी, १९९६ ची अधिसूचना, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, क्रमांक मलोआ-१०९६/ (१३) (९६) विशि-३ अन्वये, महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे घेण्यात येणाऱ्या परीक्षा सदर नियमाच्या कक्षेत समाविष्ट केल्या आहेत.

## आयोगाशी पत्रव्यवहार करताना शासनाने घ्यावयाची दक्षता

शासन परिपत्रक क्रमांक मलोआ- १०९३/ मुस -४८/ प्र.क्र.६५/९३/८, दिनांक २० डिसेंबर, १९९३ नुसार आयोगाशी पत्रव्यवहार करताना तो अतिशय काळजीपूर्वक योग्य भाषेत केला जाईल, याबाबत दक्षता घेण्याचे आणि आयोगाशी पत्रव्यवहार करताना आयोगाचा अधिक्षेप होणार नाही, याची दखल घेण्याबाबत सर्व मंत्रालयीन विभागांना आदेश प्रसृत केले होते. तसेच आयोगाशी पत्रव्यवहार करताना अन्य विभागांनी सामान्य प्रशासन विभागाच्या सेवा उपविभागाकडून आयोगाकडे पाठवावयाच्या पत्राच्या प्रारूपास मान्यता घ्यावी व तसे केल्याचे आयोगाकडे पाठवावयाच्या पत्रात स्पष्ट नमूद करावे असेही आदेश दिले होते. एका प्रकरणी शासनाच्या महसूल व वन विभागाकडून सदर आदेशाचे पालन झालेले नाही आणि शासन प्रस्तावास आयोगाची मान्यता ही केवळ औपचारिकता आहे असे समजून भारतीय संविधानाने आयोगाला दिलेल्या अधिकारात अधिक्षेप केला. याबाबत आयोगाने शासनाकडे तीव्र नाराजी व्यक्त केली आणि प्रस्तुत प्रकरणाची आयोगाच्या १९९६-९७ च्या वार्षिक अहवालात नोंद घेण्याचे ठरविले व तसे शासनास कळविले.










# महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे अध्यक्ष व सदस्य

# प्रथम ते आजतागायत अध्यक्ष



१

**श्री.एच.बी.क्लेयटॉन,** *आय.सी.एस.*
*अस्केवेअर सी.आय.ई.एम.ए.(ऑक्झॉन)*

२३.०२.१९३७ ते १.४.१९४२



२

**श्री.जे.ए.मदन,** *आय.सी.एस.*
*सी.एस.आय.सी.आय.ई.,*

०१.०४.१९४२ ते १५.७.१९४७



३

**श्री.वाय.ए.गोडबोले,** *आय.सी.एस.*
*सी.एस.आय.सी.आय.ई.*

०१.०८.१९४७ ते ११.०६.१९५२



४

**डॉ.के.बी.भरूचा**
*पीएच.डी.(लंडन)*
*बॅरिस्टर ॲट लॉ*

१२.०६.१९५२ ते १२.०६.१९५८



५

**महाराज श्री.दुलीप सिंहजी**
*बी.ए.(कंटाब)*

१३.०६.१९५८ ते ०५.१२.१९५९



६

**श्री.बी.डी. देशमुख**
*बी.ए. एल.एल.बी.*

०३.०६.१९६० ते ०१.१०.१९६१



७

**श्री. एस.पी.पी.थोरात**
*ले.ज.(निवृत्त) अशोकचक्र II,पद्मश्री*

०२.१०.१९६१ ते १९.६.१९६६



८

**श्री.एल. एम. पाटील**
*बी.ए.एल.एल.बी.*

२०.०६.१९६६ ते १३.०३.१९६७



९

**डॉ. डी.वाय.गोहोकर**
*एम. ए.एल.एल.बी.,बी. एस. एफ. एस. डिलीट*

१४.०३.१९६७ ते १३.०३.१९७३



१०

**डॉ.एम. एन.वानखेडे**
*एम.ए.ए.एम.(यु.एस.ए.), पीएच. डी. (यु.एस.ए.)*

१४.०३.१९७३ ते ३०.०४.१९७८



११

**डॉ. के.जी. देशमुख**
*एम. एससी., पीएच.डी.*

०९.०६.१९७८ ते ०३.०८.१९८३



१२

**डॉ एम. व्ही. सूर्यवंशी**
*एम. एससी., पीएच.डी.,*

०४.०८.१९८३ ते ०३.०८.१९८९



१३

**श्रीम. एस.पी.पाटील**
*एम.ए.*

०४.०८.१९८९ ते २३.७.१९९३



१४

**डॉ. बी बी शिंदे**
*एम.एससी.,पी एच.डी*

२४.०७.१९९३ ते २३.०७.१९९९



१५

**डॉ. एस.डी.कर्णिक**
*एम.ए.एल.एल.बी. पी एच.डी*

२४.०७.१९९९ ते १७.०९.२००१



१६

**श्री. पी. डी वाणी**
*बी.इ.,डी.एस.एम.,एम. एस. एम*

१८.०९.२००१ ते ०६.१०.२००२



१७

**श्री.जी. सी.वर्मा,** *भा.पो.से.*


०८.१०.२००२ ते ०७.०६.२००३



१८

**श्री. सी.डी. सिंग,** *भा.प्र.से.*

०७.०६.२००३ ते २९.०९.२००३



१९

**श्री. ए. एम. वर्टी,** *भा.प्र.से.*

०१.१०.२००३ ते २४.०८.२००५



२०

**श्री. व्ही. एन.देशमुख,** *भा.पो.से.*

०२.०९.२००५ ते ०२.०४.२००७



२१

**श्री.बाबुराव सुंदरराव सोळुंके**
*एम. कॉम. पीएच.डी.*

०३.०४.२००७ ते ०७.०५.२००७



२२

**डॉ.वसंत गणपत बनसुडे**
*एम.ए.एम.(यु.एस.ए.) पीएच. डी. (यु.एस.ए.)*

०८.०५.२००७ ते १०.०६.२००७



२३

**श्री.एम. एन. कोकाटे,** *भा.प्र.से.*

११.०६.२००७ ते १४.०६.२०११



२४

**डॉ.डी.बी.येडेकर**
*एम.एससी. पीएच.डी. एल.एल.बी.*


१५.०६.२०११ ते १६.०५.२०१२



**२५**

**श्री.सुधीर दे. ठाकरे,** *भा.प्र.से.*
*एम एससी.एल. एल.बी*

१७.०५.२०१२ ते १८.०५.२०१४



**२६**

**श्री.प्रकाश ज.ठोसरे,** *भा.प्र.से.*
*एल.एल.बी.*

१९.०५.२०१४ ते २७.०६.२०१४



**२७**

**श्री.विठ्ठल ना मोरे,** *भा.प्र.से.*
*एम. ए. एम. फील.*

२८.०६.२०१४ ते ३०.०५.२०१८



**२८**

**श्री.चंद्रशेखर वसंत ओक,** *भा.प्र.से.*
*एम. ए. एम. फील.*

०१.०६.२०१८ ते १४.०९.२०१९



**२९**

**श्री.सतीश एम गवई,** *भा.प्र.से.*
*बी.एससी. फिजिक्स आणि*
*मास्टर इन प्रोफेशनल स्टडीज, कॉर्नेल–यूएस,*


१४.०९.२०१९ ते २९.०८.२०२१



**३०**

**श्री.देवानंद बाबुराव शिंदे**
**(प्रभारी अध्यक्ष)**
*एम. एससी., पीएच.डी.*

३०.०८.२०२१ ते २४.११.२०२१



**३१**

**श्री. किशोर राजे–निंबाळकर,** *भा.प्र.से.*
*एम.एससी. (कृषि)*

२६.११.२०२१ ते २७.०७.२०२३



**३२**

**डॉ. दिलीप ज्ञानेश्वर पांढरपट्टे,** *भा.प्र.से.*
**(प्रभारी अध्यक्ष)**
*बी.एस्सी, बी.एड, एल.एल.एम, एम.बी.ए, पीएच.डी.*

२८.०७.२०२३ ते ०८.०८.२०२३



**३३**

**श्री. किशोर राजे–निंबाळकर,** *भा.प्र.से.*
*एम.एससी. (कृषि)*

०९.०८.२०२३ ते १९.०९.२०२३

# आयोगाचे सदस्य

**श्री. शाह नवाज खान गुलाम अली मूर्तजाखान भूट्टो**
*नाईटहूड, सी.आय.ई.,ओ.बी.ई.*
०१.०३.१९३७ ते १६.०२.१९४७

**सी.डब्लू.ई. अर्बेटनॉट**
*एस्केअर*
*सी.आय.ई.,बी.ई., बी.ए. (आर.यू.आय.), आय.एस.ई.*
०१.०४.१९३७ ते ०१.०४.१९४२

**श्री.एच.व्ही. हॅम्प्टन**
*एम.ए. (डी.यू.बी.), आय.ई.एस.*
०१.०४.१९४२ ते ३१.०३.१९४७

**श्री.एस. एन. मूस**
०२.०२.१९४७ ते ३१.०३.१९४७

**श्री.पी. जी. शाह**
*सी.आय.ई.,एम.ए., बी.एसई., आय.ए. आणि ए.एस.*
०१.०४.१९४७ ते ०१.०४.१९५२

**श्री.खान बहादूर मोहम्मद**
*दायमाए सिदीकी*
०१.०४.१९४७ ते ०१.०८.१९४७

**श्री.ए.ए.ए. फेझी**
*एम.ए. (कॅनटब),*
*एल.एल.बी. बॅरिस्टर ॲटलॉ*
०१.०८.१९४७ ते ०१.०४.१९५२

**डॉ. के. बी. भारुचा**
*पीएच.डी. (लंडन), बॅरीस्टर ॲट लॉ*
२५.११.१९४९ ते ११.०६.१९५२

**श्री. एम. एस. पाटील**
*बी. ए., एलएल.बी.*
०१.०४.१९५२ ते १२.०२.१९५७

**श्री.आर. एन. वेलींगकर**
*बी.ए. (ऑक्सन)*
०१.०४.१९५२ ते २४.०२.१९५६

**श्री.आर. बी. घोरपडे**
*बी.एससी. (न्यूयॉर्क)*
१२.०६.१९५२ ते १६.०३.१९५८

**महाराज श्री. दुलीप सिंह जी**
*बी.ए. (कॅनटब)*
०१.११.१९५६ ते १३.०६.१९५८

**श्री.टी. एल. शाह**
*बी.ए. आय.ए.एस.*
०१.११.१९५६ ते ०६.१०.१९५७

**श्री.बी. डी. देशमुख**
*बी.ए. एल.एल.बी.*
१३.०२.१९५७ ते ०२.०६.१९६०

**श्री. एन. एल. अहमद**
*बी.ए. (अलीगढ) बी.लिट. (ऑक्सन)*
०७.१०.१९५७ ते २५.०४.१९६२

**श्री. पी. एस. लवाळे,** *भा.प्र.से.*
*एम.ए. एलएल.बी.*
३१.०३.१९५८ ते २६.०५.१९६३

**श्री. एस. एन. माने**
*बी.ए. बॅरिस्टर ॲट लॉ*
१५.०७.१९५८ ते १४.०७.१९६४

**श्री. आर. टी. लेऊवा**
*बी.एससी. एल.एल.बी.*
१४.०३.१९६० ते ०१.०५.१९६०

**श्री. एल. एम. पाटील**
*बी.ए. एल.एल.बी*
१८.१२.१९६१ ते १९.०६.१९६६

**श्री.बी. ए. बंबवाले,** *आय.सी.एस.*
*एम.ए., (कॅनटब)*
०७.०९.१९६२ ते ०२.११.१९६३

**श्री.डी. वाय. गोहोकर**
*एम.ए., एल.एल.बी., बी.एस.एफ.एस. डी.लिट.*
०९.०८.१९६३ ते १३.०३.१९६७

**श्री.डब्लू. जी. सुभेदार,** *भा.प्र.से.*
*बी.एससी., एलएल.बी.,*
०१.०२.१९६४ ते ०४.०७.१९६५

**श्री .डी. व्ही. चौव्हान**
*बी.ए. एल.एल.बी.*
११.०५.१९६४ ते ०५.१०.१९७०

**ब्रिगेडीअर एन. डी. बिलीमोरीआ**
०१.०९.१९६५ ते ३०.१२.१९७०

**श्री. एस. व्ही. चव्हाण,** *भा.प्र.से.*
*एम.ए., एलएल.बी.*
०३.०५.१९६७ ते २४.१०.१९७२

**डॉ. एम. एल. शहारे**
*एम.एससी, पीएच.डी*
०६.०५.१९६७ ते १२.०२.१९६८

**डॉ. एम. एन. वानखेडे**
*एम.ए.ए.एम. (यू.एस.ए.) पीएच.डी. (यू.एस.ए.)*
०६.०३.१९६८ ते १३.०३.१९७३

**श्री. सी. जे. व्ही. मिरांडा,** *भा.प्र.से.*
*बी.ए. (कॅनटब)*
१०.०४.१९६९ ते ०९.०१.१९७१

**श्री. एस. एन. ए रझवी,** *भा.प्र.से.*
१५.०२.१९७१ ते १६.०६.१९७६

श्री. व्ही. के. चौधरी, भा.प्र.से.
एम.ए. (कॅनटब)
२०.०२.१९७१ ते ११.०६.१९७३

श्री. जसजीत सिंग, भा.प्र.से.
एम.ए, (कॅनटब)
२५.१०.१९७२ ते १२.०९.१९७४

डॉ. के. जी. देशमुख
एम.एससी., पीएच.डी.
०७.०६.१९७३ ते ०८.०६.१९७८

श्री. एम. जी. माने
बी.ए., बॅरिस्टर ॲट लॉ
१२.११.१९७३ ते ११.११.१९७९

श्री. एन. व्ही. खुरसाळे
बी.ई. एम.आय.ई. (इंडिया) एएम.एएस.सी.ई. (यू.एस.ए)
३१.१२.१९७३ ते २१.८.१९७५

श्री. डी. जे. जाधव, भा.प्र.से.
१८.०९.१९७४ ते १६.०६.१९७६

श्री. एल. एस. सुंदरराजन
बी.ई. (मेक.) (इंडिया)
१६.०६.१९७६ ते २८.११.१९७९

श्री. बी. ए. अन्सारी
बी.ई. (मेक.) एम.आय.ई. (इंडिया)
२२.०६.१९७६ ते २१.०६.१९८२

श्री. एन. एस. देवधर, भा.प्र.से.
११.०५.१९७७ ते २१.११.१९८१

श्री. एम. जी. गवई, भा.पो.से.
०२.०४.१९७९ ते २०.०३.१९८३

श्री. पी. जी. पाटील
एम.एडी.ए, (लंडन), बॅरिस्टर ॲट लॉ
२०.११.१९७९ ते ०२.०७.१९८३

डॉ. एम. व्ही. सूर्यवंशी
एम.एससी., पीएच.डी.
२९.११.१९७९ ते ०३.०८.१९८३

डॉ. बी. आर. भोसले
एम.एससी., पीएच.डी., डी.एसई.
एफ.एन.एएस.सी., एफ.एम.एएस.
०४.०५.१९८२ ते ०६.०५.१९८५

श्री. एस. एच. ठक्कर, भा.प्र.से.
एम.ए.
२५.१०.१९८२ ते २९.०४.१९८७

श्री. एन. आर. माने
बी.ए. डिप. एस.एस.ए (टी.आय.एस.एस.)
२१.०३.१९८३ ते ०३.०४.१९८५

श्री. जी. टी. गोटखिंडे
बी.ए., एल.एल.बी.
०४.०८.१९८३ ते ०६.१२.१९८४

श्रीम. एस. पी. पाटील
एम.ए.
२४.०४.१९८५ ते ०३.०८.१९८९

श्री. जी. बी. कदम
एम.ए.
२६.०४.१९८५ ते १२.०९.१९८९

श्री. के. पी. मेढेकर, भा.पो.से.
बी.एससी.
०१.०५.१९८५ ते ३१.०१.१९८९

श्री. ए.ए.ए. सिद्दीकी
बी.एससी., बी.ई.एफ.आय.ई.(इंडिया)
०१.०८.१९८६ ते १२.०३.१९९१

श्री. एस. पी. सिंग, भा.पो.से.
एम. ए., बी.एससी., पीएच.डी.
०१.०३.१९८९ ते २८.०१.१९९३

श्री. आर. एस. बसाखेत्रे
बी.ए, एलएल.बी., एस.ई.एम.
२०.०४.१९८९ ते ०९.०८.१९९१

डॉ. बी. बी. शिंदे
एम.एससी., पीएच.डी.
०८.०८.१९८९ ते २३.०७.१९९३

डॉ. एम. डी. तावडे
एम.ए, पीएच.डी.
१२.०१.१९९० ते ११.०१.१९९६

श्री. जे. जी. कांगा, भा.प्र.से.
एम.ए (हार्वर्ड) एल.एल.बी.
०८.०७.१९९१ ते ११.०१.१९९३

श्री. व्ही. जी. खेडकर, भा.प्र.से.
एम. ए. (सोशल वर्क)
१४.१०.१९९१ ते ०४.०८.१९९५

श्री. एस. के. बापट, भा.पो.से.
बी.कॉम.
०१.०२.१९९३ ते ३१.०१.१९९९

श्री. जी. एन. उबाळे, भा.पो.से.
बी.ए, एलएल.बी.
१२.०७.१९९३ ते २७.०२.१९९८

डॉ. टी. ए. शिवारे
एम.कॉम., पीएच.डी.
१२.०१.१९९४ ते ११.०१.२०००

श्री. वाय. एल. राजवाडे, भा.प्र.से.
बी. एससी. (इकॉनॉमिक्स)
१०.१०.१९९५ ते १४.०६.१९९९

श्री. ए. एस. चिटणीस
एम.ए., बी.एड.
०१.०३.१९९६ ते १७.०२.२०००

**श्री. पी. डी. वाणी**
*बी.ई. (सिव्हिल), डी.एस.एम.एम.ए.एम.*
०१.०४.१९९८ ते १७.०९.२००१

**श्री. जी. सी. वर्मा,** *भा.पो.से.*
*एम. ए.*
०३.०२.१९९९ ते ०७.१०.२००२

**श्री. सी. डी. सिंग,** *भा.प्र.से.*
*एम. ए. (पॉलिटिक्स)*
२१.०९.१९९९ ते ०७.०६.२००३

**डॉ. बी. एस. सोळुंके**
*एम. एससी., एम. फील., पीएच. डी.*
०८.०५.२००१ ते ०२.०४.२००७

**श्रीम. सा. स. जोशी**
*बी. कॉम.*
०८.०५.२००१ ते १२.०३.२००४

**श्री. अजित एम. वर्टी,** *भा.प्र.से.*
०७.०६.२००३ ते ३०.०९.२००३

**श्री. वसंत गणपत बनसुडे**
*एम. कॉम., पीएच.डी.*
२९.०८.२००३ ते ०७.०५.२००७

**श्री. भुजंग एस. मोहिते,** *भा.पो.से.*
०१.१०.२००३ ते १६.०९.२००५

**श्री. श. श. मोमीन**
*बी.ई.(स्ट्रक्चरल)*
०४.०३.२००५ ते ३१.१२.२००७

**डॉ. डी. बी. येडेकर**
*एम. एससी. पीएच. डी. (जिऑलॉजी), एल.एल.बी.*
२१.०१.२००८ ते १५.०१.२०१४

**डॉ. एन. बी. पासलकर**
*बी.ई., एम.ई., पीएच.डी., एफआयईटीई, एलएमआयएसटीई*
११.०३.२००८ ते १९.१२.२०११

**डॉ. अब्दुल करीम अब्दुल वाहीद**
*एम.डी. (आयुर्वेद), पीएच.डी. (आयुर्वेद शरीररचना)*
१२.०३.२००८ ते १२.०३.२०१४

**श्री. के. एस. जांगडे**
*बी.ई. (सिव्हिल), टेक. (स्ट्रक्चरल), एफआयई, एलएम–आयआरसी, आयआयबीई*
२८.०५.२००८ ते १९.०५.२०११

**श्री. डी. एन. जाधव,** *भा.पो.से.*
*एम.एससी.*
११.०८.२००८ ते ११.११.२००९

**श्री. एस. पी. एस. यादव,** *भा.पो.से.*
*एम.एससी. (फिजिक्स), एल.एल.बी.*
१६.११.२०११ ते १५.०१.२०१३

**श्री. प्रकाश ठोसरे,** *भा. व. से.*
०५.०२.२०१३ ते १७.०८.२०१४

**श्री. हमीद बा. पटेल**
*बी.एससी. बी.ए. (इंग्रजी साहित्य), एल.एल.बी.*
२७.०६.२०१४ ते १७.०६.२०१८

**डॉ. अरुण दि. अडसूळ**
*एम.एससी., एम.फिल., पी.एच.डी.*
०७.०७.२०१४ ते १०.०२.२०१५

**श्री. गजानन दा. जांभुळकर**
*स्थापत्य अभियांत्रिकी पदविका,*
*एम.एस.सी.आय.टी.,*
३०.०१.२०१५ ते ०९.०६.२०१६

**श्री. अनिल द. काळे,** *भा.प्र.से.*
*बी. एससी. (रसायनशास्त्र, जीवशास्त्र, प्राणीशास्त्र),*
*बी.एड., एल.एल.बी*
१३.०५.२०१५ ते ३१.०५.२०१६

**श्री. रूपराव न. देशमुख**
*एम.एससी. (भौतिकशास्त्र)*
२९.११.२०१६ ते ३०.०६.२०१७

**श्रीम. शैला मु. अपराजित**
*एम.एससी. (सांख्यिकी)*
२४.१२.२०१४ ते २५.०५.२०१८

**श्री. ज्ञानेश्वर स. राजुरकर,** *भा.प्र.से.*
*एम.ए. (सांख्यिकी), एम.फिल.*
०१.०७.२०१६ ते ०८.०६.२०१८

**श्री. दयानंद एस मेश्राम**
*बी.ई.(मेकॅनिकल), एम.ई. (प्रॉडक्शन)*
*पी.जी.डी.बी.एम.बी.जे.*
०३.११.२०१७ ते ०७.११.२०२१

**श्री. राजीव रणजीत जाधव,** *भा.प्र.से.*
*एम.टेक.(फूड सायन्स)*
०६.०८.२०२१ ते २४.१०.२०२२

**डॉ. देवानंद बाबुराव शिंदे**
*एम. एससी, पीएच.डी,*
०६.०८.२०२१ ते ०५.०२.२०२५

**डॉ. प्रताप रामचंद्र दिघावकर,** *भा.पो.से.*
*बी.ए ,एम.बी.ए,पीएच.डी*
०९.०८.२०२१ ते २९.०४.२०२३

**डॉ. अभय एकनाथ वाघ**
*एम.ई.(इलेक्ट्रॉनिक्स इंजि.),पीएच.डी.*
०२.०२.२०२३ ते १३.०५.२०२८

**डॉ. सतीश माधवराव देशपांडे**
*एम. एससी., बी.एड., पीएच.डी*
०२.०२.२०२३ ते ०१.०२.२०२९

**डॉ. दिलीप ज्ञानेश्वर पांढरपट्टे,** *भा.प्र.से.*
*बी.एससी, बी.एड., एल.एल.एम, एम.बी.ए., पीएच.डी.*
०१.०३.२०२३ ते ०६.०२.२०२५


LEAVE
A+

# वाटचालीतील महत्त्वाचे प्रशासकीय निर्णय व टप्पे

**उमेदवाराभिमुख प्रयोग**
उमेदवारांच्या निवडप्रक्रियेतील सहभाग हा केवळ परीक्षार्थी म्हणून न ठेवता 'उत्तरतालिका' प्रसिद्ध करून त्यावर आक्षेप मागविण्याचा उमेदवाराभिमुख प्रयोग आयोगाने सन २००३ पासून सुरू केला. ही पद्धती आजतागायत सुरू आहे.

## २००३

## २००७

**उत्तरपत्रिकेच्या प्रती**
बदलत्या काळाबरोबरच उमेदवारस्नेही धोरण राबवून आयोगाने उमेदवारांना उत्तरपत्रिकेच्या प्रती (कार्बनलेस) त्याच वेळेस पुरविण्याचा अभिनव उपक्रम २००७ पासून अमलात आणला. ही कार्यपद्धती राबविणारा आयोग म्हणून महाराष्ट्र आयोगाचे नाव सर्वश्रुत झाले.



**अंतिम निकालासाठी संगणकाचा वापर**
महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून सुयोग्य उमेदवारांच्या निवडीसाठी परीक्षा/मुलाखती आयोजित केल्या जातात. सन १९९० च्या दशकांपर्यंत ही कामे मनुष्यबळाचा वापर करून मुख्यतः पार पाडली जात. परिणामी काही अडचणींमुळे विहित वेळेत निवडप्रक्रिया पार पाडण्यात अडचणी येत असत. त्यामुळे बदलत्या काळानुसार संगणक तंत्रज्ञानाचा वापर करणे गरजेचे बनले. उमेदवाराचे विदा संस्करण करून अंतिम निकाल तयार करण्यासाठी संगणकाचा वापर खासगी कंपन्यांच्या साहाय्याने सन २००७ पासून सुरू करण्यात आला. परिणामी लाखोंच्या संख्येने परीक्षेस उपस्थित राहणाऱ्या उमेदवारांचा निकाल कयार करून कार्यमर्यादेत तो जाहीर करण्यास फार मोठा हातभार लागला.



## २०१०

**आयोगाचे संकेतस्थळ**
सध्याच्या माहिती तंत्रज्ञानाच्या युगात इंटरनेटचे महत्त्व ओळखून आयोगाने स्वतःचे संकेतस्थळ सन २०१० मध्ये सुरू केले.



**ऑनलाइन जाहिराती**
माहितीच्या महाजालाचा उपयोग करून आयोगाने संकेतस्थळ विकसित करून जाहिरात निवडप्रक्रियेविषयक माहिती अंतिम निकाल तर त्याद्वारे उमेदवारांपर्यंत पोहचवलेच परंतु ऑनलाईन जाहिराती प्रसिद्ध करून आवेदनपत्रे स्वीकारण्याची कार्यपद्धती विकसित केली. अशी पद्धती यशस्वीपणे राबविणारी महाराष्ट्र लोकसेवा आयोग ही देशातील पहिली संस्था ठरली.



## २०२०

**नकारात्मक गुण**
वस्तुनिष्ठ बहुपर्यायी परीक्षांकरिता नकारात्मक गुणांच्या अंमलबजावणी संदर्भात

**माहितीचे जतन**
माहितीच्या जतनाबाबत व उत्तरपत्रिकांच्या स्कॅन इमेजेस उमेदवारांच्या प्रोफाईलमध्ये उपलब्ध करून दिल्या.



**निवडप्रक्रियेतून बाहेर पडण्याचा विकल्प**
निवडप्रक्रियेतून बाहेर पडण्याचा विकल्प उमेदवारांना देण्याचा क्रांतीकारी निर्णय आयोगाने सन २०२१ पासून घेतला आहे.

## २०२१




**२०२२**

**संगणकाचा वैविध्यपूर्ण वापर**
सर्वसाधारण गुणवत्ता यादी प्रसिद्ध करणे, उमेदवारांचा पसंतीक्रम मागविणे तसेच भरती प्रक्रियेतून बाहेर पडण्याचा पर्याय उपलब्ध करून दिला.

**२०२२**

**संगणक आधारित परीक्षा**
विविध चाळणी परीक्षेच्या आयोजनाकरिता अभ्यासक्रम निश्चित करणे, प्रश्नपत्रिका तयार करून घेणे व संगणक प्रणालीवर आधारित परीक्षांचे आयोजन करण्यात आले.





**२०२२**

हळूहळू संगणकाचा वापर कार्यालयीन कामकाजात वाढून संपूर्ण कार्यालयात संगणक पुरविण्यात येऊन परीक्षेतील कामांबरोबर इतर प्रशासकीय कामे संगणकाच्या साहाय्याने पार पाडली जाऊ लागली.



**२०२२**

**पेपरलेस कार्यालयाकडे वाटचाल**
सध्याच्या संगणकीय व माहिती तंत्रज्ञानाच्या युगात उमेदवारस्नेही कार्यपद्धती राबवून आयोगाचे कार्यालय कागदविरहित (पेपरलेस) करण्याकडे आयोगाची वाटचाल सुरू आहे.



**२०२२**

**त्वरित निवडयादी**
मुलाखतीच्या शेवटच्या दिवशीच सर्वसाधारण गुणवत्तायादी व तात्पुरती निवडयादी प्रसिद्ध करण्याची कार्यपद्धती सन २०२२ पासून राबविण्यास सुरुवात केली आहे.



**२०२३**

**प्रशासकीय भरती**
म.लो.आयोगाच्या कायक्षेत्रातील सर्वात मोठी प्रशासकीय भरती





२०२३
**ऑनलाइन केंद्रीय तपासणी व मॉडरेशन**
उमेदवारांच्या पारंपरिक उत्तरपत्रिकांचे संगणकीय व ऑनलाईन पद्धतीने केंद्रीय तपासणी व मॉडरेशन करण्याची पद्धती आयोगाने राबविण्यास नुकतीच सुरुवात केली आहे. या पद्धतीत उमेदवारांना त्यांच्या उत्तरपत्रिकेचे केलेले मूल्यमापन पाहता तर येईलच परंतु त्याची प्रतही प्राप्त करून घेता येणार आहे.



# आयोगाची संरचना, कार्ये व संबंधित बाबी

# आयोगाची संरचना




### अध्यक्ष व सदस्यांची नियुक्ती

संविधानातील अनुच्छेद-३१६ (१) अन्वये मा. राज्यपाल हे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या अध्यक्षांची व सदस्यांची नियुक्ती करतात. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची १ अध्यक्ष व ५ सदस्य अशी संरचना आहे.

### अध्यक्ष व सदस्यांचा पदावधी

भारतीय संविधानातील अनुच्छेद - ३१६ (२) अन्वये लोकसेवा आयोगाचे अध्यक्ष व सदस्य, ज्या दिनांकास ते आपले पद ग्रहण करतील तेव्हापासून ६ वर्षाचा अवधी किंवा त्यांच्या वयाची ६२ वर्षे पूर्ण होणे यापैकी अगोदर जे घडेल तोपर्यंत धारण करतील.

### आयोगाचे सचिवालय

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कार्यालयातील एकूण २६ संवर्गासाठी २७१ पदे मंजूर आहेत. आयोगाचे सचिव हे विभाग प्रमुख म्हणून काम पाहतात. आयोगाच्या कार्यालयाकरिता २ सहसचिव, ७ उपसचिव, १ विधी अधिकारी, १ परीक्षा संशोधन अधिकारी, १५ अवर सचिव, २५ कक्ष अधिकारी, ९६ सहायक कक्ष अधिकारी व ६४ लिपिक-टंकलेखक तसेच उच्च व निम्नश्रेणी लघुलेखक, वाहन चालक, चतुर्थश्रेणी कर्मचारी इ. पदे आहेत.

# आयोगाचे विविध विभाग व त्यांची कार्ये

संविधानाने आयोगाकडे सोपविलेली सांविधानिक व शासनाने सोपविलेली अन्य कार्ये पार पाडण्याकरिता कार्यालयाची खालील विभागात विभागणी केली आहे.

## आस्थापना विभाग

### आस्थापना

१. आयोगाच्या कार्यालयातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांच्या आस्थापना/ सेवाविषयक बाबी,
२. कार्यालयाचे संनियंत्रण.

### प्रशिक्षण

१. राज्य प्रशिक्षण धोरणानुसार अधिकारी व कर्मचारी यांचे प्रशिक्षण

### सांख्यिकी

१. सांख्यिकी अहवाल,
२. आयोगाचा वार्षिक अहवाल,
३. सांख्यिकीय संकलन व विश्लेषण

### देखभाल व भांडार

१. कार्यालयाची व वाहनांची देखभाल,
२. संपूर्ण कार्यालयाकरिता दैनंदिन स्टेशनरीचा पुरवठा,
३. खरेदी समितीचे नियंत्रण/ नियोजन

### नोंदणी व ग्रंथालय

१. कार्यालयाची मध्यवर्ती नोंदणी शाखा,
२. ग्रंथालय विषयक बाबी

### अभिलेख

१. सार्वजनिक अभिलेख कायदा २००५ मधील तरतुदींच्या आधारे कार्यवाहीची जबाबदारी,
२. कार्यालयातील सर्व अभिलेखांचे जतन, नोंदणी, इत्यादी,
३. कार्यनियमावली व विविध शासन आदेशांच्या आधारे अभिलेख जतनाविषयक कार्यवाही, तसेच या अनुषंगाने आयोगाच्या अधिकारी/ कर्मचाऱ्यांकरिता प्रशिक्षण आयोजित करणे

### लेखा

१. लेखाविषयक बाबी,
२. कार्यालयीन अंदाजपत्रक/ वित्तीय तरतूद,
३. अधिदान व लेखा कार्यालयाशी पत्रव्यवहार,
४. वित्तीय प्राधिकारासंदर्भात मार्गदर्शन,
५. सर्व विभागाकडून मंजूर आदेशासह प्राप्त देयकावरील पुढील कार्यवाही,
६. खर्चाचा ताळमेळ,
७. बँकिंग व्यवहार

# सेवा विभाग — माहिती तंत्रज्ञान — जाहिरात

### सेवा प्रवेश नियम व नियुक्ती

१. शासनाच्या सर्व विभागांकडून प्राप्त होणारे सेवाविषयक व सेवाप्रवेश नियम विषयक प्रस्ताव,
२. निवडसूची/नियुक्ती संदर्भातील प्रकरणे,
३. मुंबई महानगर पालिका व बेस्ट उपक्रमातील सेवा प्रवेश नियम, पदोन्नती/ नियुक्ती
४. आयोगाच्या कार्य नियमावलीतील सुधारणा,
५. आयोगाच्या सदस्यांमधील कामकाजाचे वाटप




### विभागीय चौकशी

१. शासकीय अधिकारी/ कर्मचाऱ्यांची विभागीय चौकशी/ शिक्षेच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने प्राप्त होणारे सर्व प्रस्ताव,
२. इजा निवृत्ती वेतन,
३. मुंबई महानगर पालिका व बेस्ट उपक्रमातील अधिकारी/ कर्मचाऱ्यांची विभागीय चौकशी/ शिक्षेच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने प्राप्त होणारे सर्व प्रस्ताव



### माहिती तंत्रज्ञान

१. संगणक यंत्रणा खरेदी, देखभाल व तदुषंगिक बाबी,
२. संगणकीय/तांत्रिक बाबींसंदर्भातील सेवा पुरवठादार संस्थांची नियुक्ती व पत्रव्यवहार,
३. बायोमेट्रिक, सीसीटीव्ही यंत्रणा इ.,
४. ऑनलाईन अर्ज प्रणाली व संकेतस्थळ इत्यादी,
५. उत्तरपुस्तिका/ उत्तरपत्रिका छपाईची व्यवस्था



### जाहिरात




१. सर्व पदभरती करिता मागणी संदर्भातील पत्रव्यवहार,
२. पद भरतीचे वेळापत्रक,
३. आयोगाचे जाहिरात धोरण,
४. सर्व पद भरतीकरिता जाहिरात/ अधिसूचना प्रसिद्ध करणे,
५. सर्व जाहिरातींच्या देयकांवरील कार्यवाही

## परीक्षापूर्व विभाग

**परीक्षापूर्व**

१. सर्व परीक्षांचे आयोजन व संनियंत्रण,
२. परीक्षेच्या आयोजनासंदर्भात जिल्हाधिकारी कार्यालयाशी पत्रव्यवहार



**परीक्षापूर्व**


१. परीक्षांच्या कामाकरिता लेखन सामुग्री छपाई व पुरवठा, उत्तरपत्रिका/ उत्तरपुस्तिकांचे पॅकिंग,
२. परीक्षेच्या आयोजनाकरिता मुंबईसह जिल्हाधिकारी कार्यालयास अनुदान वितरित करणे/ उपलब्धता,
३. वितरित करण्यात आलेल्या अनुदानाचा हिशोब.



## गोपनीय विभाग

**गोपनीय**

सर्व वस्तुनिष्ठ स्वरूपाच्या परीक्षांचे गोपनीय कामकाज



## जनसंपर्क व समुपदेशन

**जनसंपर्क व समुपदेशन**



१. उमेदवारांच्या दैनंदिन अडचणींकरिता मदत करणे, चौकशी, मार्गदर्शन व समुपदेशन,
२. वृत्तपत्र तसेच विविध समाजमाध्यमांद्वारे प्रसिद्ध होणाऱ्या बातम्यांच्या अनुषंगाने उचित कार्यवाही प्रस्तावित करणे,
३. आयोगाची जनमानसातील प्रतिमा सुधारण्याच्या दृष्टीने उपाययोजना सुचविणे



# समन्वय विभाग

**समन्वय**

१. आयोगाच्या बैठकीचे आयोजन, सर्व नियोजन, संकलन व बैठकीतील निर्णयाच्या अनुषंगाने आढावा,
२. आयोगाच्या बैठकीमध्ये सादर करावयाच्या प्रस्तावासंदर्भात कार्यालयातील सर्व कक्षांकडून माहिती प्राप्त करुन घेणे व आयोगाच्या बैठकीमध्ये सादर करण्याची व्यवस्था करणे,
३. आयोगाच्या बैठकीतील निर्णयाच्या अंमलबजावणी संदर्भात संबंधित कक्षाकडून पाठपुरावा व कार्यपूर्ती अहवाल,
४. विधीमंडळ कामकाजासंदर्भातील माहितीचे संकलन व शासनाशी पत्रव्यवहार,
५. मंत्रालयीन प्रशासकीय विभाग व आयोगाच्या कार्यालयाच्या प्रतिनिधींमध्ये आयोजित बैठकीच्या अनुषंगाने आवश्यक माहितीचे संकलन करणे, सर्व नियोजन व बैठकीतील निर्णयानुसार अंमलबजावणी संदर्भात पाठपुरावा,
६. कार्यालयातील सर्व विभागांच्या सह/ उप सचिवांकडून प्रलंबित प्रकरणांचा अहवाल मागवून घेणे, आढावा बैठकीच्या अनुषंगाने सर्व नियोजन, संकलन व बैठकीतील निर्णयानुसार अंमलबजावणी संदर्भात पाठपुरावा,
७. शासनाकडून प्राप्त एकापेक्षा अधिक कक्षांशी संबंधातील टपाल स्वीकारणे, माहितीचे संकलन, संस्करण व पत्रव्यवहार,
८. मुंबई बाहेरील आयोगाच्या तसेच अधिकारी/ कर्मचारी यांच्या दौऱ्याच्या अनुषंगाने संबंधितांच्या निवासाची व्यवस्था, दौऱ्यावरील अधिकारी/ कर्मचारी यांच्या दैनंदिन व प्रवास भत्याच्या देयकासंदर्भात कार्यवाही.

# परीक्षोत्तर राजपत्रित

**परीक्षोत्तर राजपत्रित**

१. महाराष्ट्र राजपत्रित तांत्रिक सेवा स्पर्धा परीक्षांच्या संपूर्ण निकालप्रक्रियेचे काम

**परीक्षोत्तर राजपत्रित**

१. राज्य सेवा परीक्षेच्या संपूर्ण निकालप्रक्रियेचे काम

**परीक्षोत्तर राजपत्रित**

१. दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग परीक्षेच्या संपूर्ण निकालप्रक्रिये-संदर्भातील काम,
२. सरळसेवा भरतीच्या सर्व चाळणी परीक्षांच्या निकाल प्रक्रियेसंदर्भातील कामे

**परीक्षोत्तर राजपत्रित**

१. सर्व राजपत्रित, अराजपत्रित तसेच चाळणी (लेखी) परीक्षांच्या निकाल प्रक्रियेसंदर्भातील न्यायालयीन प्रकरणांची हाताळणी



# अराजपत्रित दक्षता

### परीक्षोत्तर अराजपत्रित


१. सर्व अराजपत्रित गट-ब संवर्गाच्या स्पर्धा परीक्षांच्या संपूर्ण निकाल प्रक्रियेसंदर्भातील कामे,
२. पोलीस उपनिरीक्षक मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षेच्या संपूर्ण निकाल प्रक्रियेसंदर्भातील कामे

### परीक्षोत्तर अराजपत्रित

१. सर्व गट-क संवर्गाच्या स्पर्धा परीक्षांच्या संपूर्ण निकाल प्रक्रियेसंदर्भातील कामे,
२. अन्य सर्व मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षांच्या निकाल प्रक्रियेसंदर्भातील कामे.

### दक्षता

१. भरती प्रक्रियेसंदर्भात प्राप्त होणाऱ्या सर्व प्रकारच्या तक्रारीच्या अनुषंगाने करावयाची कार्यवाही,
२. तक्रार प्राप्त झालेल्या उमेदवार/व्यक्ती यांच्यावर करावयाची प्रतिबंधात्मक कार्यवाही,
३. प्रतिरोधित करण्यात आलेल्या उमेदवार/व्यक्ती यांची काळी यादी अद्ययावत ठेवणे,
४. गैरप्रकाराच्या प्रयत्नांच्या अनुषंगाने संबंधितांवर फौजदारी अभियोग दाखल करण्यासंदर्भातील कार्यवाही,
५. प्रतिरोधित करण्यात आलेल्या उमेदवारांकडून दाखल होणाऱ्या न्यायालयीन प्रकरणांच्या अनुषंगाने कार्यवाही,
६. परीक्षोत्तर कामकाजासंदर्भात प्राप्त होणाऱ्या तक्रारीच्या अनुषंगाने करावयाची कार्यवाही,
७. परीक्षेच्या वेळी गैरप्रकारास प्रतिबंध म्हणून सध्या अवलंबिण्यात येणाऱ्या कार्यपद्धतीच्या (उदाहरणार्थ बायोमेट्रिक उपस्थिती कार्यप्रणालीचा वापर, सीसी टिव्ही प्रणालीचा वापर, मोबाईल जॅमर इत्यादी) अनुषंगाने आवश्यक कार्यवाही तसेच विविध गैरप्रकाराचे प्रयत्न लक्षात घेऊन गैरप्रकारास प्रतिबंध करण्याच्या दृष्टीने नवीन कालानुरूप उपाययोजना सुचविणे.



# सरळसेवा निकाल - विधी - धोरण व संशोधन

### निकाल-१

१. कक्ष पंचवीस (छाननी-१) करिता नियत वाटप केलेल्या विभागांच्या जाहिरातीस अनुसरून प्राप्त अर्जांच्या छाननीनंतर मुलाखत प्रक्रिया व अंतिम निकालासंदर्भातील कामे
२. उपरोक्त विभागांच्या चाळणी परीक्षेच्या निकालानंतर मुलाखत प्रक्रिया व अंतिम निकालासंदर्भातील कामे

### निकाल-२

१. कक्ष सव्वीस (छाननी-२) करिता नियत वाटप केलेल्या विभागांच्या जाहिरातीस अनुसरून प्राप्त अर्जांच्या छाननीनंतर मुलाखत प्रक्रिया व अंतिम निकालासंदर्भातील कामे
२. उपरोक्त विभागांच्या चाळणी परीक्षेच्या निकालानंतर मुलाखत प्रक्रिया व अंतिम निकालासंदर्भातील कामे

### विधी

१. विविध न्यायालयीन प्रकरणांची हाताळणी,
२. विधीविषयक सल्ला व तद्नुषंगिक कामे,
३. शपथपत्र दाखल करणे,
४. न्यायालयीन प्रकरणांच्या सुनावणीच्या वेळी उपस्थित राहून संबंधित वकिलांना मदत करणे,
५. विविध न्यायालयीन व आयोगाच्या कार्यालयातील संबंधित कक्ष यांच्याशी समन्वय

### धोरण व संशोधन

१. कार्यालयाच्या कामाचा दर्जा वाढविणे, विविध टप्प्यांवरील दिरंगाई कमी करणे आणि सर्व विभागांच्या कामकाजामध्ये एकसूत्रता राखण्याच्या अनुषंगाने समन्वय, नियोजन व देखरेख करणे,
२. परीक्षा/ भरती प्रक्रिया आयोजित करणाऱ्या इतर संस्थांकडून कार्यपद्धतीमध्ये करण्यात येणाऱ्या सुधारणांचा सखोल अभ्यास करून त्याप्रमाणे आयोगाच्या कामकाजामध्ये सुधारणा करण्यासंदर्भातील कार्यवाही प्रस्तावित करणे,
३. संघ लोकसेवा आयोग व इतर राज्यांच्या लोकसेवा आयोगाशी पत्रव्यवहार,
४. राज्य लोकसेवा आयोगाच्या अध्यक्षांच्या राष्ट्रीय परिषदेच्या अनुषंगाने करावयाची कार्यवाही,
५. निवड प्रक्रिया संदर्भातील विविध बाबींवर आयोगाचे धोरण ठरविण्याच्या अनुषंगाने करावयाची कार्यवाही,
६. आरक्षण, पदभरती, सेवाविषयक बाबी इत्यादींमध्ये होणाऱ्या बदलाच्या तसेच कार्यपद्धतीमध्ये सुधारणा करण्याच्या अनुषंगाने करावयाची कार्यवाही, सर्व भरती प्रक्रियेच्या कामासाठी नियुक्ती करण्यात येणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांना अदा करावयाच्या मानधनाचे दर निश्चित करणे, त्याकरिता निकष विहित करणे,
७. शासनाकडून नवीन संवर्गाच्या पदभरतीकरिता प्राप्त होणाऱ्या प्रस्तावावरील कार्यवाही.

# सरळसेवा छाननी

### छाननी–१

१. पुढील मंत्रालयीन प्रशासकीय विभागांच्या जाहिरातीस अनुसरून प्राप्त अर्जांची छाननी: उच्च व तंत्रशिक्षण विभाग, कौशल्य विकास, रोजगार व स्वयंरोजगार विभाग, गृहनिर्माण विभाग, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, सार्वजनिक आरोग्य विभाग

२. चाळणी परीक्षेचा निर्णय झाल्यास संबंधित विभागास (परीक्षापूर्व) कळविणे

### छाननी–२




१. पुढील मंत्रालयीन प्रशासकीय विभागांच्या जाहिरातीस अनुसरून प्राप्त अर्जांची छाननी: गृह विभाग, नियोजन विभाग, जलसंपदा विभाग, विधी व न्याय विभाग, वित्त विभाग, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, (अल्पसंख्याक विभाग, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, सामान्य प्रशासन विभाग, मराठी भाषा विभाग, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, आदिवासी विकास विभाग, नगर विकास विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभाग, महिला व बालविकास विभाग, पर्यावरण विभाग, कृषि, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, सहकार, वस्त्रोद्योग व पणन विभाग, महसूल व वन विभाग, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका, बेस्ट, नव्याने निर्मित अथवा वर नमूद न केलेल्या विभागांव्यतिरिक्त इतर विभाग

२. चाळणी परीक्षेचा निर्णय झाल्यास संबंधित विभागास (परीक्षापूर्व) कळविणे

### न्यायालयीन प्रकरणे



१. अर्जाची छाननी, चाळणी परीक्षा, मुलाखत व अंतिम निकाल प्रकियेसंदर्भातील न्यायालयीन प्रकरणांची हाताळणी



# आयोगाची कार्ये

**लोकसेवा आयोगाची कार्ये**

भारतीय संविधानाने अनुच्छेद १६ (१) अन्वये राज्याच्या अखत्यारीतील सेवायोजन किंवा कोणत्याही पदावरील नियुक्ती या संबंधीच्या बाबींमध्ये सर्व नागरिकांस समान संधीचा मूलभूत अधिकार बहाल केला आहे. भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३१५ अन्वये महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची स्थापना करण्यात आली आहे. संविधानाच्या अनुच्छेद ३२० अनुसार राज्यांच्या सेवांमध्ये नियुक्ती करण्याकरीता परीक्षा घेणे आयोगाचे कर्तव्य आहे. तसेच संविधानाच्या अनुच्छेद ३२१ अनुसार राज्य शासनाने सोपविलेली कार्ये आयोगाकडून पार पाडण्यात येतात.

**भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३२० अन्वये राज्य लोकसेवा आयोगाकडे सोपविण्यात आलेली कार्ये:**

**राज्य शासनास पुढील बाबींवर सल्ला देणे:**

(अ) विविध सेवांमध्ये आणि पदांवर भरती करण्याच्या पद्धती संबंधीच्या सर्व बाबी.

(ब) या सेवांमध्ये नियुक्ती करताना उमेदवाराची अर्हता, पदोन्नती व एका सेवेतून दुसऱ्या सेवेत बदली करताना पालन करावयाची तत्वे.

(क) शासकीय कर्मचाऱ्यांसंबंधी शिस्तविषयक बाबी.

(ड) आपली कर्तव्ये पार पाडीत असताना शासकीय कर्मचाऱ्यांनी केलेल्या किंवा केल्या आहेत असे समजण्यात येणाऱ्या कृत्यांबाबत त्यांच्याविरुद्ध करण्यात आलेल्या वैध कार्यवाहीत बचावासाठी त्यांना करावा लागलेला खर्च परत मिळण्यासाठी करण्यात आलेल्या मागण्या.

(इ) शासकीय कर्मचारी सेवा करीत असताना इजा झाल्यास इजा निवृत्ती वेतन देण्याबाबतच्या मागण्या.

**राज्याच्या सेवांमध्ये नियुक्तीकरिता परीक्षा घेणे**

**सांविधानिक कार्याव्यतिरिक्त अनुच्छेद ३२१ अन्वये राज्यपाल निर्देशित अन्य कार्ये:**

**राज्याच्या सेवांमध्ये नियुक्तीकरिता परीक्षा घेणे**

**बृहन्मुंबई महानगरपालिका अधिनियमाच्या ८० (ब) कलमानुसार:**

(अ) बृहन्मुंबई महानगर पालिकेतील कार्यकारी अभियंता व त्यावरील दर्जाच्या पदांवरील नेमणुकांबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेस, व

(ब) बृहन्मुंबई विद्युतपुरवठा व परिवहन उपक्रमातील सचिव ग्रेड-अ (१) आणि त्यावरील श्रेणीच्या पदावरील नेमणुकांबाबत या उपक्रमास सल्ला देणे.

जीवन प्राधिकरण अंतर्गत नामनिर्देशान्वये भरावयाच्या सहायक अभियंता, गट-ब, श्रेणी-२, सहायक अभियंता, गट-अ, श्रेणी-१९ आणि सहायक कार्यकारी अभियंता, गट-अ या पदावरील भरतीकरिता स्पर्धा परीक्षा घेणे.



### कार्यपूर्तीचे वेळापत्रक

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत प्रसिद्ध होणाऱ्या विविध पदांच्या जाहिराती व त्या अनुषंगाने परीक्षा व मुलाखती यांचे वेळापत्रक दरवर्षी तयार केले जाते. या वेळापत्रकानुसार सर्व कार्ये पार पाडण्याचे उद्दिष्ट आयोगाकडून ठेवले जाते.

महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांचे बदल्यांचे विनिमयन व शासकीय कर्तव्ये पार पाडण्यास होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम-२००५ मधील प्रकरण क्रमांक-३ च्या कलम-११ मध्ये नमूद केलेल्या न्यायप्रविष्ट बाबी, लोकआयुक्त किंवा उप लोकायुक्त आणि अन्य घटनात्मक संस्था, आयोग, न्यायिक बाबी, केंद्र किंवा अन्य राज्य शासनांच्या संबंधातील प्रकरणे, विधी विधानातील संबंधित बाबी, मंत्रिमंडळास सादर होणाऱ्या धोरणात्मक बाबी इत्यादींना कार्यपूर्ती वेळापत्रकातून सूट देण्यात येते. आयोगामार्फत घेण्यात येणाऱ्या परीक्षा व मुलाखती यांच्या वेळापत्रकाबाबत आयोगाचा निर्णय अंतिम असतो.

### गाऱ्हाणी/ तक्रारी यांचे निराकरण

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून पार पाडल्या जाणाऱ्या विविध परीक्षा किंवा आयोगाशी संबंधित अन्य बाबी याबाबत काही तक्रारी असल्यास संबंधित अधिकाऱ्यांकडे तक्रार नोंदविता येईल व अशी तक्रार प्राप्त झाल्यानंतर ७ दिवसांत त्याची पूर्तता करण्याची जबाबदारी संबंधित अधिकाऱ्यांची राहील. यानंतरही नागरिकांचे समाधान न झाल्यास आयोगाच्या सचिवांकडे याबाबत तक्रार करता येते.

### आयोगाचे संकेतस्थळ

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत प्रसिद्ध होणाऱ्या विविध पदांच्या जाहिराती व त्या अनुषंगाने परीक्षा व मुलाखती तसेच शिफारस पात्र उमेदवारांची यादी इत्यादी सर्व बाबी https://mpsc.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहेत. उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज भरण्यासंदर्भात https://mpsconline.gov.in संकेत स्थळावर सर्व मार्गदर्शक सूचना उपलब्ध आहेत. उमेदवारांकरिता Helpline No. 7303821822 / 18001234275 आहे. आयोगाचे ट्विटर अकाऊंट @mpsc_office आहे.

### आयोगामार्फत लोकसेवा हक्क अधिनियमाखाली पुरविण्यात येणाऱ्या सेवा

१. उमेदवारांना प्रोफाईलमध्ये प्रवेशप्रमाणपत्रे उपलब्ध करून देणे. (संबंधित परीक्षेच्या ७ दिवस अगोदर)

२. स्पर्धा परीक्षांचे वार्षिक अंदाजित वेळापत्रक जाहीर करणे (प्रत्येक वर्षाच्या ३१ डिसेंबरपूर्वी)

३. स्पर्धा परीक्षेच्या वेळापत्रकाची सद्यस्थिती जाहीर करणे. (प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेपर्यंत)

४. पदे विज्ञापित करणे (परिपूर्ण मागणीपत्र होऊन आयोगास आवश्यक सर्व बाबींची पूर्तता झाल्यावर ३० दिवसांत)


५. शासनास शिफारस पत्रे पाठविणे (शिफारशींची पदसंख्या ५० पर्यंत असल्यास: निकालानंतर १५ दिवस. पदसंख्या ५१-१०० दरम्यान असल्यास: निकालानंतर २० दिवस व पदसंख्या १०० पेक्षा जास्त असल्यास निकालानंतर ३० दिवस)

# आयोगाचे सांख्यिकी विवरण


## दशकनिहाय शिफारस आढावा

मागील काही दशकातील दिव्यांग व अनुसूचित जमातींच्या शिफारशींचा आढावा घेतला असता शिफारशींच्या आकडेवारीत वाढ दिसून येते.


### एकूण




### दिव्यांग






### अनुसूचित जमाती




# गटनिहाय शिफारस आढावा

स्पर्धा परीक्षा व सरळसेवा यांद्वारे गेल्या तीन दशकांत आयोगातर्फे पुढील संख्येने
गुणवत्ता व कौशल्यपूर्ण अधिकारी व कर्मचाऱ्यांची निवड करण्यात आली





## महिला शिफारस आढावा

राज्याचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी सर्वच क्षेत्रात महिलांचा सहभाग समप्रमाणात असणे आवश्यक आहे. त्या दृष्टीने शासनाने निमशासकीय व शासन अनुदानित संस्थांमध्ये सन १९९४ पासून महिलांसाठी ३०% आरक्षण लागू केले आहे. परिणामी, मागील काही दशकांत महिलांच्या शिफारशींचे प्रमाण वाढताना दिसत आहे.




■ गट अ, ■ गट ब, ■ गट क

## एकूण शिफारशी





■ गट अ, ■ गट ब, ■ गट क

# आयोगाची प्रकाशने

## वार्षिक अहवाल :

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३२३(२) अनुसार आवश्यक असलेला महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचा कामकाजाचा वार्षिक अहवाल मा. राज्यपालांना सादर करणे आयोगाचे कर्तव्य आहे. त्यानुसार प्रत्येक आर्थिक वर्षाकरिता आयोगाकडून वार्षिक अहवाल मा. राज्यपालांना सादर करण्यात येतो. सदरचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर ज्या प्रकरणी आयोगाचा सल्ला स्वीकारण्यात आलेला नाही, अशा प्रकरणांच्या बाबतीत अस्वीकृतीची कारणे स्पष्ट करणाऱ्या निवेदनासह अहवालाची एक प्रत मा. राज्यपालांकडून राज्याच्या विधानमंडळासमोर ठेवण्याची व्यवस्था केली जाते.




## ई-न्यूजलेटर :

सन २०२३ पासून महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कामगिरीचा आढावा देणारे त्रैमासिक ई-न्यूजलेटर आयोगाच्या संकेतस्थळावर प्रकाशित करण्यात येते. सदर ई-न्यूजलेटरमध्ये तीन महिन्यात प्राप्त झालेली मागणीपत्रे, प्रसिद्ध करण्यात आलेल्या जाहिराती, प्रसिद्ध करण्यात आलेले अभ्यासक्रम, आयोजित स्पर्धा व चाळणी परीक्षा, आयोगामार्फत प्रसिद्ध करण्यात आलेल्या उत्तरतालिका, राजपत्रित व अराजपत्रित परीक्षांच्या मुलाखती व निकाल, सरळसेवेच्या छाननी, मुलाखती व निकाल याबाबतची माहिती तसेच आयोगामार्फत मान्य केलेल्या सेवाप्रवेश नियमांच्या माहितीसंदर्भातील आढावा प्रकाशित करण्यात येतो. यासोबतच आयोगास इतर मान्यवरांनी दिलेल्या भेटी, आयोगाच्या मान्यवरांनी इतर लोकसेवा आयोगास दिलेल्या भेटी, इतर महत्त्वपूर्ण घटना तसेच आयोगाने राबविलेले विशेष कार्यक्रम याबाबतची माहितीदेखील प्रकाशित करण्यात येते.





# एकविसाव्या शतकाकडे वाटचाल

# पत्र-तार ते ट्विटर



सरळ सेवाप्रवेश/ स्पर्धा परीक्षेसाठी अर्ज केलेल्या व निवड प्रक्रियेनुसार पात्र उमेदवारांच्या निवडीसाठी मुलाखती घेण्यात येतात. यापूर्वी मुलाखतीसाठी निवड झालेल्या उमेदवारांना साध्या पत्राद्वारे मुलाखतपत्र पाठवण्यात येत असे.

मुलाखतपत्रामध्ये पदाचे नाव, उमेदवाराचे नाव, मुलाखतीचा दिनांक, वेळ आणि स्थळ इत्यादी बाबी नमूद असत. तसेच उमेदवार मुलाखतीसाठी उपस्थित राहणार अथवा नाही याबाबत आयोगास कळवण्याबाबतही उमेदवारास अवगत करण्यात येत असे.

त्या काळी संपर्काची साधने आजच्या इतकी प्रगत नव्हती, मुलाखतीच्या एक दोन दिवस आधी, सर्व उमेदवारांना तारेने देखील ही बाब कळविण्यात येत असे. संपर्काच्या साधनांमध्ये प्रगती होत गेली, तसतशी ही पद्धत बंद पडली.

प्रथमतः पत्राने, तारेने, SMS द्वारे, ई-मेलद्वारे, आयोगाच्या वेबसाईटद्वारे आणि आता उमेदवारांच्या प्रोफाइलमध्ये उमेदवारांना मुलाखत पत्रं पाठवली जातात. आधुनिक संपर्काच्या साधनांपैकी एक म्हणजे ट्विटर. याद्वारे उमेदवारांना मुलाखतीसंबंधी व अन्य माहिती क्षणार्धात पुरवली जाते.

वरील पार्श्वभूमीवर केशवसुतांच्या 'तुतारी' या कवितेतील ओळी प्रकर्षाने नमूद कराव्याशा वाटतात.

जुने जाऊ द्या मरणा लागून,
जाळून किंवा पुरून टाका
सडत न एका ठाई ठाका,
सावध ऐका पुढल्या हाका...

**– शैलेश हिंदळेकर**
सहायक कार्यासन अधिकारी (नि.)
महाराष्ट्र लोकसेवा आयोग

# टेक्नॉलॉजी तस्मै नमः

## आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने घेतलेल्या पोलीस उपनिरीक्षक पदासाठीच्या शारीरिक चाचण्या







पोलीस उपनिरीक्षक हे पद आयोगाच्या कार्यकक्षेत आल्या नंतर १९७७-७८ पासून या पदासाठीची जाहिरात नियमितरित्या प्रसिद्ध करण्यात येऊ लागली.

या परीक्षेसाठी पूर्व परीक्षा, मुख्य परीक्षा, शारीरिक चाचणी आणि मुलाखत असे टप्पे असतात.

प्रथमतः या परीक्षेसाठी उमेदवारांची संख्या मर्यादित असे. पदसंख्या वाढल्याने दिवसेंदिवस या परीक्षेला उमेदवारांचा प्रतिसाद मोठ्या संख्येने मिळू लागला.

या पदाच्या शारीरिक चाचणी/ मुलाखतीसाठी प्रत्येक दिवशी प्रति समिती चाळीस याप्रमाणे उमेदवारांची संख्या मर्यादित असे. सहाजिकच ही प्रक्रिया फार वेळखाऊ होती. शारीरिक चाचणी व मुलाखतीचा कार्यक्रम किमान एक दोन महिने तरी चालत असे. त्यानंतर निकाल जाहीर केला जाई.

कालांतराने शारीरिक चाचणी/मुलाखतीसाठी उमेदवारांची संख्या वाढवून ती प्रथमतः ५० उमेदवार प्रति दिवस प्रति समिती त्यानंतर ६० उमेदवार प्रति दिवस प्रति समिती अशी निश्चित करण्यात आली.

तथापि, निकाल लवकर लावण्याच्या दृष्टीने यामुळे विशेष फरक पडला नाही.

मात्र अलीकडेच डिजिटल तंत्रज्ञानाचे साहाय्य घेतल्यामुळे, एका दिवशी एका समितीला ३०० उमेदवारांच्या शारीरिक चाचण्या घेणे शक्य झाले.

यामुळे मनुष्यबळ, श्रम, शासनाचा पैसा व समय याची मोठ्या प्रमाणात बचत झाली. निकाल लवकर लावण्याच्या दृष्टीनेही याचा खूप मोठा फायदा झाला.

हे पाहून नक्कीच म्हणावेसे वाटते,
अंगीकारुनी नवीन तंत्रज्ञान
करूया प्रवास वेगवान!

# आयोगाच्या परीक्षेचा (कोविड) काळ






चीनमधील वुहान शहरातून २०१९ च्या शेवटी कोविड-१९ या रोगाच्या प्रसाराला सुरुवात झाली. हळूहळू संपूर्ण जगाला या रोगाने आपल्या विळख्यात घेतले आणि जगातले व्यवहार ठप्प झाले. मार्चच्या दुसऱ्या आठवड्यापासूनच वातावरण भीतीयुक्त होते. भारतामध्ये २२ मार्च २०२० पासून संचारबंदी सुरू झाली. शाळा, कॉलेजेस बंद. हॉटेल्स, औद्योगिक कारखाने, खासगी कार्यालयेही बंद ठेवण्यात आली. खासगी वाहनांतून प्रवास, विमान सेवा, रेल्वे सेवा, सार्वजनिक परिवहन सेवा हे सर्व सामान्य जनांसाठी उपलब्ध नव्हते. संचारबंदीमुळे सर्वत्र शुकशुकाट होता. सारे जग जागीच थिजलेले, स्तब्ध होते.

मात्र या कालावधीत शासकीय, निमशासकीय सेवक आपली सेवा इमाने इतबारे बजावत होते. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे कार्यालय याला कसे बरे अपवाद असेल?

संचारबंदी पूर्वी काही आठवड्यांपासून राज्यसेवा (मुख्य) परीक्षेच्या मुलाखतींचा कार्यक्रम सुरू होता. मुलाखतीचा शेवटचा दिवस होता २१ मार्च २०२०. म्हणजेच संचारबंदीपूर्वीचा दिवस.

आता पुढील लक्ष्य होते राज्यसेवा परीक्षेच्या अंतिम निकालाचे. मुलाखती झाल्यावर निकालासाठी सर्व स्तरावरून दबाव येणार हे लक्षात घेऊन अंतिम निकाल जाहीर करण्यासाठी टाईम टेबल ठरवण्यात आले. संबंधित कक्षातील अधिकारी आणि कर्मचारी अंतिम निकालासाठी दररोज कार्यालयात उपस्थित राहत असत. मुंबईसारख्या शहरांमध्ये जिथे रेल्वेने येण्यासाठी एक दीड तास खर्च करावा लागतो, तेथे रस्ता मार्गे येण्यासाठी दोन-तीन तास सहज खर्ची पडत असत. तथापि, हाती घेतलेले काम विहित वेळेत पूर्ण होणे आवश्यक आहे, हे लक्षात घेऊन संबंधितांनी आपले योगदान देऊन सहकार्य केले.

जून २०२० मध्ये शासनाने संचारबंदीचे नियम अंशतः शिथिल केले आणि सर्व शासकीय कर्मचाऱ्यांना आठवड्यातील काही दिवस कार्यालयात उपस्थित राहणे अनिवार्य झाले. तसेच शासकीय कर्मचाऱ्यांसाठी वाहतुकीची साधने (विशेषतः रेल्वे सेवा) उपलब्ध करून देण्यात

**शासकीय कर्मचाऱ्यांसाठी वाहतुकीची साधने (विशेषतः रेल्वे सेवा) उपलब्ध झाल्यामुळे कामाला काही प्रमाणात गती आली.**






**कोविड काळातील परीक्षा नियंत्रण केंद्र**





सर्वांना मुखपट्ट्या बंधनकारक करून, सुरक्षिततेचे सर्व नियम पाळून परीक्षेचे यशस्वी आयोजन करण्यात आले.



आली. त्यामुळे कामाला काही प्रमाणात गती आली. दरम्यान, राज्यसेवा परीक्षा २०१९ चा निकाल प्रसिद्ध झाला. तसेच, राज्यसेवा (पूर्व) परीक्षा २०२० या पदासाठी जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली.

खरे आव्हान तर यापुढे होते. राज्यसेवा (पूर्व) परीक्षेचे आयोजन महाराष्ट्राच्या सर्व जिल्ह्यांमध्ये करण्यात येते. या परीक्षेच्या प्रश्न पुस्तिका/उत्तर पत्रिकांच्या सीलबंद गठ्ठ्यांचे जिल्हा निहाय वितरण करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर मनुष्यबळाची आवश्यकता असते. हे मनुष्यबळ एकत्रितरित्या काम करणार, त्यामुळे रोगाच्या फैलावाची भीती फार मोठ्या प्रमाणात होती. काम वेळेत व्हायला हवे तसेच कोणाही अधिकारी/ कर्मचाऱ्यांना रोगाची लागण नको याची टांगती तलवार वरिष्ठ अधिकाऱ्यांवर होती. या सर्वांवर मात करून आयोगाच्या अधिकारी/ कर्मचाऱ्यांनी परीक्षा पूर्व काम विहित वेळात पार पाडले.

राज्यसेवा (पूर्व) परीक्षा २०२० विहित वेळात पार पडणार अशी लक्षणे असताना, परीक्षेच्या आधल्या दिवशी राज्य शासनाने कोविड संसर्ग वाढलेला आहे, अशावेळी सर्वांनी मोठ्या प्रमाणावर एकत्र येणे गैर आहे, हे लक्षात घेऊन परीक्षा पुढे ढकलण्याचा आदेश काढला.

उमेदवारांच्या आरोग्याला, सुरक्षिततेला जास्त महत्त्व देऊन ही परीक्षा एकूण दोन वेळा पुढे ढकलण्यात आली.

तिसऱ्या वेळी उपकेंद्रांवरील परीक्षेसाठी नेमण्यात आलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना पीपीई किट पुरवून, सर्वांना मुखपट्ट्या बंधनकारक करून, सुरक्षिततेचे सर्व नियम पाळून परीक्षेचे यशस्वी आयोजन करण्यात आले.


कोविड काळामध्ये आयोगातर्फे सरळ सेवेच्या पदांसाठी आणि स्पर्धा परीक्षेच्या पदांसाठी सुरक्षिततेचे सर्व नियम पाळून मुलाखती देखील घेण्यात आल्या.

एकूणच, कोविड काळ हा सर्वांसाठीच कठीण काळ होता. विशेषतः आयोगाच्या कार्यालयासाठी परीक्षेचा काळ होता!



# संस्मरणीय क्षण

# रजत महोत्सव समारंभ



दिनांक १ एप्रिल १९६२ रोजी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने आपला रजत महोत्सव साजरा केला. त्यावेळी महाराष्ट्राचे राज्यपाल श्री. प्रकाश अध्यक्ष म्हणून, मा.यशवंतराव चव्हाण (मुख्यमंत्री) प्रमुख पाहुणे म्हणून, तसेच महाराष्ट्र शासनाचे मुख्य सचिव आयोगाचे निवृत्त सदस्य, सचिव, कर्मचारी वृंद आणि आमंत्रित पाहुणे उपस्थित होते.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या रजत महोत्सवाप्रसंगी उपस्थित मान्यवर डावीकडून : श्री. एन. एल. अहमद सदस्य श्री. यशवंतराव चव्हाण मा. मुख्यमंत्री श्री. श्रीप्रकाश. राज्यपाल श्री. पी एस लवाळे सदस्य व भाषण करताना ले.ज. एस.पी. पी. थोरात अध्यक्ष, महाराष्ट्र लोकसेवा आयोग



खुर्चीवरील (डावीकडून): श्री. एस एन माने, श्री. एन एल अहमद, ले.ज. एस पी पी थोरात (अध्यक्ष), श्री. पी एस लवाळे, श्री. एल एम पंडित

उभे असलेले (डावीकडून): श्री. जी के वागळे, श्री. जी. जी. तहलियानी, श्री. वाय. जी. सांगलीकर, श्री. असगर हुसेन, श्री. आर. ए. कोठारी (सचिव), श्री. एस एस काळे, श्री. एन. ए. प्रभुदेसाई

# सुवर्ण महोत्सव समारंभ



महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या सुवर्ण महोत्सव प्रसंगी माननीय राज्यपालांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले



उपस्थित मान्यवर डावीकडून: श्री. वाणी, श्री. चिटणीस, श्री. बापट, श्री. शिंदे (अध्यक्ष), डॉ. शिवारे, श्री. राजवाडे, श्री. मळेकर (सचिव)




डावीकडून: डॉ. एम. व्ही. सूर्यवंशी- अध्यक्ष, श्री. शंकरराव चव्हाण- मुख्यमंत्री, श्री. शंकर दयाळ शर्मा- राज्यपाल, ले. ज. एस. पी. पी. थोरात- माजी अध्यक्ष महाराष्ट्र लोकसेवा आयोग, श्री. एच. एस. ठक्कर- सदस्य महाराष्ट्र लोकसेवा आयोग



महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षाच्या कार्यक्रमांमध्ये महाराष्ट्र गीत सादर करताना आयोगाच्या महिला कर्मचारी

## ऐतिहासिक अभिलेख प्रकाशन सोहळा




महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचा ऐतिहासिक अभिलेख १९८७ ते १९९९ दि. १२ जुलै १९९९ रोजी प्रसिद्ध करण्यात आला. या प्रसंगी मा. अध्यक्ष श्री. बी.बी.शिंदे, मा.सदस्य टी.ए.शिवारे, मा.सदस्य अशोक चिटणीस, मा.सदस्य ग्यानचंद वर्मा, म.लो.आ. अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## सांस्कृतिक कार्यक्रम



सन १९९३ मध्ये झालेल्या सांस्कृतिक कार्यक्रमास उपस्थित माननीय सदस्य. तसेच आयोगाचे अधिकारी व कर्मचारी.

# विदेशी शिष्टमंडळाची भेट







दिनांक २ मे २००५ रोजी मॉरिशस लोकसेवा आयोगाच्या शिष्टमंडळाने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कार्यालयास भेट दिली

# महाराष्ट्र लोकसेवा आयोग संकेतस्थळाचा लोकार्पण सोहळा

माहिती आणि तंत्रज्ञान क्षेत्रामध्ये देशांमध्ये महाराष्ट्राचा नंबर अव्वल. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने आपल्या कामकाजासाठी माहिती तंत्रज्ञानाचा वापर केला नाही तरच नवल. ऑगस्ट २०१० मध्ये तत्कालीन मा. मुख्यमंत्री श्री. अशोक चव्हाण यांनी आयोगाच्या वेबसाईटचे उद्घाटन करून तिचे लोकार्पण केले. आयोगांच्या परीक्षांचे वार्षिक वेळापत्रक, स्पर्धा परीक्षांची जाहिरात प्रसिद्ध झाल्यावर उमेदवारांचे अर्ज ऑनलाइन स्वीकारणे, स्पर्धा परीक्षांसाठी उमेदवारांची प्रवेशपत्रे उमेदवारांच्या प्रोफाईल मध्ये देणे, स्पर्धा/ चाळणी परीक्षेनंतर प्रश्नपत्रिका आयोगाच्या वेबसाईटवर अपलोड करणे, उत्तर तालिका प्रसिद्ध करणे, स्पर्धा परीक्षांचा निकाल जाहीर करून उमेदवारांच्या प्रोफाईलमध्ये शिफारस पत्र/ ना शिफारस पत्र पाठवणे, सरळ सेवेने भरल्या जाणाऱ्या पदांसाठीच्या जाहिराती, या जाहिरातींद्वारे प्राप्त अर्जांची छाननी केल्यावर मुलाखतीचा कार्यक्रम प्रसिद्ध करणे, मुलाखत पत्र उमेदवारांच्या प्रोफाईलवर देणे, मुलाखतीनंतर निकाल जाहीर करून शिफारस पात्र ना शिफारस पात्र उमेदवारांना त्यांच्या प्रोफाईल मध्ये शिफारस पत्र/ ना शिफारस पत्र पाठवणे इ. बाबी आयोगाच्या वेबसाईटवर प्रसिद्ध होऊ लागल्या, मनुष्यबळाची मोठ्या प्रमाणावर बचत होऊ लागली. उमेदवारांना देखील राज्याच्या कानाकोपऱ्यातून घरबसल्या माहिती उपलब्ध होऊ लागली.



# राज्य लोकसेवा आयोगाच्या अध्यक्षांची १३ वी राष्ट्रीय परिषद




राज्य लोकसेवा आयोगाच्या अध्यक्षांच्या १३ व्या राष्ट्रीय परिषदेची बैठक मुंबई येथे दिनांक दि. ७ ते ९ जानेवारी २०११ रोजी संपन्न झाली.

# राज्य लोकसेवा आयोगाच्या अध्यक्षांच्या राष्ट्रीय परिषदेच्या स्थायी समितीची बैठक




राज्य लोकसेवा आयोगाच्या अध्यक्षांच्या स्थायी समितीची बैठक पुणे येथे दिनांक २३ डिसेंबर २०१७ रोजी संपन्न झाली.

# राज्य लोकसेवा आयोगाच्या अध्यक्षांची २४ वी राष्ट्रीय परिषद



दिनांक २२ व २३ एप्रिल २०२३ रोजी सर्व राज्यांच्या लोकसेवा आयोगाच्या मा. अध्यक्षांची २४ वी राष्ट्रीय परिषद लखनौ, उत्तर प्रदेश येथे आयोजित करण्यात आली होती.

परिषदेला उत्तर प्रदेशचे मा. मुख्यमंत्री श्री. योगी आदित्यनाथ तथा सर्व राज्यांच्या आयोगाचे मा. अध्यक्ष उपस्थित होते. या परिषदेचा मूळ उद्देश आयोगातील सर्वोत्तम कार्यपद्धती, नवीनतम/नावीन्यपूर्ण तंत्रज्ञानाचा वापर, धोरणात्मक सुधारणा यांबाबत सविस्तर चर्चा होऊन यांचे आपसात आदान-प्रदान करणे हा असतो.

# मा. राज्यपाल यांची भेट



महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे अध्यक्ष आणि सदस्यांनी दि. ३ मार्च २०२३ रोजी राज्याचे मा. राज्यपाल श्री. रमेश बैस यांची राजभवन मुंबई येथे भेट घेतली. यावेळी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे मा. अध्यक्ष श्री. किशोर राजे निंबाळकर, सदस्य डॉ. देवेंद्र शिंदे, डॉ. प्रताप दिघावकर, डॉ. दिलीप पांढरपट्टे, डॉ. अभय वाघ उपस्थित होते.

# मा. मुख्यमंत्री यांची भेट



आयोगाच्या अधिकाऱ्यांनी राज्याचे मा. मुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे यांची दि. ४ फेब्रुवारी २०२३ रोजी सह्याद्री अतिथीगृह येथे भेट घेतली.

# मान्यवरांच्या भेटी



मा. अध्यक्षा झारखंड लोकसेवा आयोग श्रीम. केरकेट्टा
यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाला भेट दिली.
त्यांचा सत्कार करताना आयोगाचे अध्यक्ष व सदस्य.



महाराष्ट्र शासनाचे माजी मुख्य सचिव श्री. सीताराम कुंटे तसेच
महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाचे माजी अध्यक्ष
श्री. के. पी. बक्षी यांच्या समवेत आयोगाचे अध्यक्ष व सदस्य

# म.लो.आ.च्या सदस्यांचे शपथविधी



महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे मा.सदस्य म्हणून डॉ.सतीश देशपांडे यांना आयोगाचे मा.अध्यक्ष श्री.किशोर राजेनिंबाळकर यांनी पद व गोपनीयतेची शपथ दिली. यावेळी आयोगाचे मा.सदस्य डॉ.प्रताप दिघावकर, मा.सचिव डॉ.सुवर्णा खरात व आयोगाच्या कार्यालयातील सर्व सहसचिव व उपसचिव उपस्थित होते.



महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे मा.सदस्य म्हणून डॉ.अभय वाघ यांना आयोगाचे मा.अध्यक्ष श्री.किशोर राजेनिंबाळकर यांनी पद व गोपनीयतेची शपथ दिली. यावेळी आयोगाचे मा.सदस्य डॉ.प्रताप दिघावकर, मा.सचिव डॉ.सुवर्णा खरात व आयोगाच्या कार्यालयातील सर्व सहसचिव व उपसचिव उपस्थित होते.



महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे मा.सदस्य म्हणून मा. डॉ. दिलीप ज्ञानेश्वर पांढरपट्टे यांना आयोगाचे मा.अध्यक्ष श्री.किशोर राजेनिंबाळकर यांनी पद व गोपनीयतेची शपथ दिली. यावेळी आयोगाचे मा.सदस्य डॉ.प्रताप दिघावकर, मा.सचिव डॉ.सुवर्णा खरात व आयोगाच्या कार्यालयातील सर्व सहसचिव व उपसचिव उपस्थित होते.

# म.लो.आ.च्या सचिवांची नियुक्ती



महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या नूतन सचिव श्रीम. सुवर्णा खरात यांनी मावळत्या सचिव श्रीम. स्वाती म्हसे-पाटील यांच्याकडून पदभार स्वीकारला. या प्रसंगी आयोगाचे मा.अध्यक्ष श्री. किशोर राजे निंबाळकर व मा.सदस्य डॉ. देवानंद शिंदे

# सत्कार समारंभ



श्रीम. मृदुला भटकर, माननीय अध्यक्ष, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण मुंबई, यांचा सत्कार आयोगाचे मा. अध्यक्ष श्री. किशोर राजे निंबाळकर यांच्या हस्ते करण्यात आला. त्यावेळी आयोगाचे मा.सदस्य, मा. सचिव व अधिकारी वर्ग उपस्थित होता.

# उद्‌घाटन समारंभ- प्रमुख पाहुण्यांचा सत्कार



महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या सीबीडी बेलापूर, नवी मुंबई येथील कार्यालयाच्या उद्घाटनाच्या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे श्री. नितीन गद्रे, अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांचा सत्कार आयोगाचे मा. अध्यक्ष श्री. किशोर राजे निंबाळकर यांच्या हस्ते करण्यात आला. त्यावेळी आयोगाचे मा.सदस्य, मा. सचिव व अधिकारी वर्ग उपस्थित होता.

# सदस्यांचा निरोप -समारंभ



मा.सदस्य श्री. राजीव जाधव यांच्या निरोप समारंभाच्या वेळी

# दळवी समिती अहवालाचे प्रकाशन



दळवी समितीचा अहवाल स्वीकारताना आयोगाचे अध्यक्ष व
सदस्य समितीच्या सदस्यांसमवेत

# सर्वाधिक पदांसाठीची जाहिरात प्रसिद्धी



राज्याच्या प्रशासकीय इतिहासातील सर्वात मोठी जाहिरात प्रसिद्ध (८,१०० पदांकरिता) केली त्या क्षणी उपस्थित अधिकारी व कर्मचारी...

# पोलीस अधिकारी भरती कार्यक्रम २०२१

पोलीस उपनिरीक्षक मर्यादित विभागीय स्पर्धा मुख्य परीक्षा २०२१ भरती
शारीरिक चाचणी कार्यक्रम








# अधिकाऱ्यांचे प्रशिक्षण २०२२



# अधिकाऱ्यांचे प्रशिक्षण २०२३



महाराष्ट्र लोकसेवा आयोग, उजळणी प्रशिक्षण कार्यक्रम दिनांक ३१ जुलै २०२३ ते ४ ऑगस्ट २०२३.
सहभागी प्रशिक्षणार्थींसमवेत प्रशिक्षक श्रीम. रेखा साळुंखे

# अधिकाऱ्यांचे प्रशिक्षण २०२३



# टीम एमपीएससी २०२३





# परीक्षा कक्ष









# उमेदवारांच्या मुलाखती








# महिला सांस्कृतिक कार्यक्रम २०२२



# आयोगाचे सुरक्षारक्षक





महाराष्ट्र शासन



# महाराष्ट्र लोकसेवा आयोग

प्लॉट क्र. ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई, महाराष्ट्र ४००६१४

MPSC OFFICE    official_mpsc    mpsc_office

Created By Media R&D (I) Pvt Ltd 9819907982